# महानगरपालिका औरंगाबाद

## सर्वसाधारण सभेचे  इतिवृत्तांत

**दिनांक २५-०१-२००० ते दिनांक २०-०४-२०००**

**रजिष्टर क्र.०९**

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दि.२५-१-२००० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त. दि. २०-१-२००० रोजी तहकुब करण्यात आलेली सर्वसाधारण सभा दि.२५-१-२००० रोजी सकाळी ११.३० वाजता मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली सुरु झाली.सभेची सुरुवात "वंदे मातरम्" या गिताने झाली.या सभेस महानगरपालिकेचे अधिकारी तसेच खालील स.सदस्य उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स.स.श्री.संजय किसनराव केनेकर | मा.उप-महापौर |
| २) | --//-- ढगे नरसिंग मुरलीधर | मा.सभापती |
| ३) | --//-- सुर्यवंशी महादेव पुंडलीकराव | --//-- |
| ४) | --//-- अफसरखाँन यासीनखाँन | --//-- |
| ५) | --//--सौ.लोखंडे रुख्मनबाई खंडेराव | --//-- |
| ६) | --//--सौ.साजेदा बेगम | --//-- |
| ७) | --//-- श्री.गैतम भागाजी खरात | --//-- |
| ८) | --//-- सौ.रजनी रमेश जोशी | --//-- |
| ९) | --//-- सौ.विमलबाई नंदकुमार मुंडलिक | --//-- |
| १०) | --//--सौ.शिलाताई सिताराम गुंजाळे | --//-- |
| ११) | --//-- श्री.भालेराव अभिमन्यू रामभाऊ | --//-- |
| १२) | --//-- श्री.नरेंद्र यादवराव पाटील | --//-- |
| १३) | --//-- कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | --//-- |
| १४) | --//--श्री.इंगळे रविंद्र बाबुराव | --//-- |
| १५) | --//-- सौ.पद्मा बाबुराव शिंदे | --//-- |
| १६) | --//-- श्री.मालानी प्रफुल्ल लालचंद | --//-- |
| १७) | --//-- श्रीमती पांचाळ चंपाबाई विश्वनाथ | --//-- |
| १८) | --//-- सौ.विसपुते धनश्री अशोक | --//-- |
| १९) | --//-- सौ.फरहदबानो भ्र.मो.नवाज | --//-- |
| २०) | --//-- अजीजखाँ गणीखाँ | --//-- |
| २१) | --//-- श्रीमती आबेदा बेगम मो.मुस्तफा | -//-- |
| २२) | --//-- श्री.मोहमद मुस्ताक अहेमद | --//-- |
| २३) | --//-- सौ.नुरजहॉ बेगम अ.रहेमानखाँन | -//-- |
| २४) | --//-- श्री.हाजी मोहसीन अहेमद हाजी बशीर अहेमद | --//-- |
| २५) | --//-- सौ.मोहसीना बिल्कीस विखारोद्दीन | --//-- |
| २६) | --//-- श्रीमती जाहेदा बेगम म.जमिर | --//-- |
| २७) | --//-- श्री.तुपे त्र्यंबक गणपतराव | --//-- |
| २८) | --//-- श्री.तुळशीबागवाले किशोर | --//-- |
| २९) | --//-- श्रीमती गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद | --//-- |
| ३०) | --//-- श्री.हमीदोद्दीन ताबा फसीयोद्दीन | --//-- |
| ३१) | --//-- श्री.स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतूबुद्दीन | --//-- |
| ३२) | --//-- श्री.प्रदीप शिवनारायण जैस्वाल | --//-- |
| ३३) | --//-- श्री.स.अली मिरा सलामी | --//-- |
| ३४) | --//-- श्री.रमेश दिपचंद लाहोट | --//-- |

| | | | |
|---|---|---|---|
| ३५) | --//-- | सौ.वाघमारे मुक्ताबाई सुदाम | --//-- |
| ३६) | --//-- | सौ.लता श्रीनिवास दलाल | --//-- |
| ३७) | --//-- | श्री.ओक जयवंत केशवराव | --//-- |
| ३८) | --//-- | श्रीमती अलका रमेश पाटील | --//-- |
| ३९) | --//-- | सौ.धांडे शंकुतला हरीदास | --//-- |
| ४०) | --//-- | श्री.अब्दुल रशिदखाँ (मामू) | --//-- |
| ४१) | --//-- | डॉ.कु.माया लिबांजी लाडवाणी | --//-- |
| ४२) | --//-- | सौ.सविता संजय आव्हाड | --//-- |
| ४३) | --//-- | श्री.विखारोद्दीन वि.खुदुबुद्दीन | --//-- |
| ४४) | --//-- | श्री.जैन विकास रतनलाल | --//-- |
| ४५) | --//-- | श्री.बारवाल गजानन रामकिशन | --//-- |
| ४६) | --//-- | श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग | --//-- |
| ४७) | --//-- | निकाळजे प्रकाश भाऊराव | --//-- |
| ४८) | --//-- | श्री.जोशी संजय रामदास | --//-- |
| ४९) | --//-- | श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर | --//-- |
| ५०) | --//-- | सौ.ज्योस्ना दौलतराव हिवराळे | --//-- |
| ५१) | --//-- | श्री.राजकुमार बचाटे (मामा) | --//-- |
| ५२) | --//-- | सौ.राधाबाई तळेकर | --//-- |
| ५३) | --//-- | श्री.विठ्ठल किसन जाधव | --//-- |
| ५४) | --//-- | श्री.मेहेर विजयकुमार गजानन | --//-- |
| ५५) | --//-- | सौ.काळुसे नंदा धनंजय | --//-- |
| ५६) | --//-- | सौ.सुनंदा उत्तम कोल्हे | --//-- |
| ५७) | --//-- | श्री.गांगवे बन्सी तुळशीराम | --//-- |

**संवाद :**

श्री.बारवाल गजानन : कोरम अभावी सभा तहकुब करण्यात यावी.

मा.महापौर : कोरम अभावी सभा १५ मिनिटांसाठी तहकुब करण्यात येते.
(वेळ ११.४० वाजता सभेला सुरुवात १२-१५ वाजता)

सौ.लता दलाल : आजच्या बैठकीत मा.आयुक्त उपस्थित नाही.आचासंहितेचा विचार करता किती संचिकेवर सहया करावयाच्या राहिलेल्या आहेत त्याची माहिती घ्यावयाची होती.परंतु मा.आयुक्तच सभेला उपस्थित नाही.सभागृहात इतरही अधिकारी उपस्थित नसतात.कायमस्वरुपी आयुक्त आपणांकडे दयावे अशी मागणी करण्यात यावी.

मा.महापौर : मा.आयुक्त नियोजन मंडळाच्या बैठकीसाठी गेलेले आहे.

श्री.गिरजाराम हाळनोर,सौ.लता दलाल : नवीन आयुक्तपदी पदभार स्विकारल्यानंतर त्यांनी कार्यालयात बसुन किती दिवस व किती तास कामे केले याची माहिती देण्यात यावी व किती संचिका निकाली काढल्या याची पण माहिती घ्यावी.

श्री.संजय जोशी : स्वेच्छानिधीतून पत्र दिल्यानुसार काही कामे होण्यासाठी त्या संदर्भात संचिका तयारही झालेल्या आहे.परंतु टेंडर व प्रशासकीय मंजुरीनुसार थांबलेल्या आहेत.५ फेब्रुवारी पासून आचारसंहिता लागणार आहे.स्वेच्छानिधीतील सर्व विकास कामे झाली पाहीजे.

श्री.महादेव सुर्यवंशी : ५ फेब्रुवारी पासून आचार संहिता लागणार असून संचिकेवर सहया न झाल्यास कामेही होणार नाही. सर्व स्वेच्छानिधीतील कामे असून योग्य ती माहिती मिळावयास पाहीजे.

डॉ.श्री.विजयकुमार मेहेर : ५ तारखेपासून आचार संहिता लागणार आहे.सध्या कधी होणार मिटींग थांबविण्यात येऊन मा.आयुक्तांना बोलाविण्यात यावे.

श्री.प्रकाश निकाळजे : मंत्रीमंडळाच्या बैठकीच्या संदर्भाने नियोजन मंडळाची बैठकीला मा.आयुक्त गेलेले असल्याने उपस्थित नाही असे मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो.

श्रीमती अलका पाटील : स्वेच्छानिधीतील कामे बाकी आहेत.मा.आयुक्तांना आजच्या बैठकीत बोलविण्यात यावे.

श्री.निकाळजे प्रकाश : यापुर्वी मा.आयुक्त नसतांना प्र.आयुक्त म्हणून उप-आयुक्त यांनी सभागृहाचे कामकाज केले.

मा.महापौर : स.सदस्यांच्या भावना मी समजू शकतो.मा.आयुक्त नियोजन मंडळाच्या बैठकीला गेलेले असल्यामुळे उपस्थित राहू शकले नाही.

श्री.प्रकाश निकाळजे,श्री.मोहसीन अहमद : ज्या संचिका सही विना पडून असतील मा.आयुक्तांना वेळ नसेल तर स्वेच्छानिधी संदर्भातील ज्या संचिका असतील त्या सर्व मा.उपआयुक्त यांच्याकडे सहीसाठी देण्यात याव्या तसे आदेश आपण करावे.

सौ.लता दलाल : मा.उपआयुक्ताकडे तसा चार्ज देण्यात यावा.व स्वेच्छानिधीतील सर्व कामे निकाली काढावीत.नंतर आचारसंहिता लागणार आहे.कामे होणार नाही.

श्री.जयवंत ओक : स्वेच्छानिधीतील ज्याही संचिका असतील त्याबाबत मा.आयुक्तांच्या जागेवर सभागृहात उपआयुक्त बसलेले आहेत.त्यांच्याकडे निर्णय व्हावा.तसे आदेश देण्यात यावे.

श्री.रशिदखॉंन (मामू) : ज्यावेळेस सभा आयोजित केलेली असते.त्यावेळी बरेच अधिकारी उपस्थित नसतात.तसेच मा.आयुक्तांच्या जागेवर उपआयुक्त चार्ज सांभाळतात.सभेच्या वेळी सर्व अधिकारी वर्ग यांनी उपस्थित राहणे गरजेचे असून विकास कामे व्हावीत एवढेच आमचे म्हणणे आहे.

नरसिंग ढगे : ५ फेब्रुवारी पासून आचारसंहिता लागणार आहे.या अगोदर २१ जानेवारी लागणार होती.त्यावेळी मी स्वतः मा.आयुक्तांना संचिकेबाबत कल्पना दिलेली होती.जवळ-जवळ तीन ते साडेतीन कोटींचे टेंडरची कामे मंजुर झालेले त्या संचिका मा.आयुक्तांकडे पडून आहे त्यावेळी आयुक्त परभणीला गेले,आल्यानंतर लगेच सध्या करतो असे सांगितले होते.त्यानंतर पुन्हा ते मुंबईला गेले सुदैवाने आचारसंहिता वाढलेली आहे.सर्व संचिका निकाली काढण्याबाबत पुन्हा त्यांना कळविले परंतु संचिकेवर त्यांनी सहया केलेल्या नाही.विकासाची कामे लवकर व्हावे व स.सदस्यांच्या स्वेच्छा निधीतील कामे ही लवकर व्हावे.

सौ.पद्मा शिंदे : महापालिका कार्यालय मा.आयुक्तांच्या भेटीसाठी आल्यास कधीही भेट होत नाही.उपआयुक्त श्री.कांबळे साहेबांकडे चार्ज देवून सर्व संचिका स्वेच्छानिधीतील निकाली काढण्यात माझ्याही वार्डातील कामे तशीच पडलेली आहे.एकाही संचिकेवर सही झालेली नाही.

श्री.अफसरखॉंन : मा.उपआयुक्त यांच्याकडे चार्ज देवून सर्व स्वेच्छानिधीतील संचिका निकाली काढाव्या आताच स.सदस्य श्री.ढगे यंनी सांगितले की ३ ते

साडेतीन कोटीची टेंडर मंजुर झाले.२८ तारखेला स्थायी समिती सभा होणार आहे.टेंडर बाबत संचिका असेल तर संचिकावर आजच्या आज सहया व्हाव्यात.जेणेकरुन येणाऱ्या स्थायी समितीमध्ये त्यास मंजुरी होईल व सर्व विकास कामाचे उद्‌घाटन होऊन कामे करता येतील.

श्री.नरेंद्र पाटील : आज औरंगाबाद जिल्हा नियोजन समितीची बैठक असून आणि त्या बेठकीमध्ये औरंगाबाद मनपाचे महापौर यांना बोलाविण्यात आलेले नाही.त्याबद्दल मी निषेध व्यक्त करतो.दुसरी बाब अशी की,मा.आयुक्ताच्या गैरहजेरीत आपणाला चर्चाकरावयाची असेल तर ते सभागृहात उपस्थित पाहिजे.आचार संहितेच्या अगोदर जी विकास कामे राहिलेली असेल त्या संदर्भात एक बैठक घेऊन सर्व विकास कामाबाबतची प्रकरणे निकाली काढून आजच्या बैठकीसाठी देण्यात आलेले अंजिठा वर चर्चा करुन विषय पत्रिकेवरील विषयाला मंजुरी देऊन लवकरात लवकर ही बैठक संपवावी अशी विनंती आहे.मा.आयुक्तांच्या विरोधात चर्चा होते असे नाही.कोणाच्या अनुपस्थित कोणासही त्यांच्या विरोधात बोलायचा अधिकार नाही. सर्व स. सदस्यांना विकास कामांची जाण आहे.नागरिकांनाही कळू द्या. कोणामुळे कामे थांबत आहेत.

श्री.संजय जोशी : मा.आयुक्तांचा चार्ज उपआयुक्तांकउे देण्यात यावा व सर्व संचिकांवर सहया होऊन तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

श्री.हमीदोद्दीन ताबा : काही संचिका अशा आहेत की त्यावर मा.आयुक्तांच्या सही शिवाय मंजुरी मिळू शकणार नाही.त्यावर तात्काळ कार्यवाही करावी व संचिका मंजूर करावी.

मा.महापौर : मागच्या वेळी मा.आयुक्त परभणीला गेले होते.त्यांनी कामावर रुजू झाल्यानंतर सर्व संचिका ११ तारखेला आल्यानंतर निकाली काढण्यात येईल असे सांगितले होते.आज पुन्हा त्यांच्याशी मी चर्चा करतो व ज्या ज्या स.सदस्यांच्या स्वेच्छानिधीतील व इतर विकास कामाबाबतच्या संचिकावर निर्णय घेण्यास सांगेल यानंतर त्यांना कल्पना देऊनसुध्दा कार्यवाही केली नाही तर एक तात्काळ बैठक घेऊन मा.आयुक्ताबाबत काय निर्णय घ्यावयाचा त्यावेळी घेण्यात येईल.

श्री.महादेव सुर्यवंशी : ११-०१-२००० चे इतिवृत्ताचा समावेश करण्यात यावा.

**विषय क्र. १७२/१ :**

दिनांक २०-१२-९९ ची तहकूब सभा २१-१२-९९ रोजी व दिनांक ११-०१-२००० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री. रशिद खॉन (मामू) : पृष्ठ क्र. २६ वर दि. ११-०१-२००० च्या इतिृत्तातील विषय क्र. १५०/३ मंजूर करून कमिटीकडे पाठवावा. विशेष बाब म्हणून मंजूर करावा.

सौ. लता दलाल : मंजूर करून कमिटीकडे पाठवणे योग्य नाही. नसता सर्वच नामातरांचे प्रस्ताव मंजूर करून कमिटीकडे पाठविण्यात यावे.

मा. महापौर : सदर प्रस्ताव कमिटीकडे पाठवण्यास मंजुरी देण्यात येते.

श्री. बारवाल गजानन : दि. ११-०१-२००० च्या इतिवृत्तातील पृष्ठ क्र. २९ वर मा. महापौर यांच्या वाक्यात "ठराविक काळासाठी ही इमारत देण्यात यावी" हे वाक्य

वगळण्यात यावे अशी दुरुस्ती करण्यात यावी. त्याचप्रमाणे ठरावात "माहेश्वरी ट्रस्ट" असे टंकलिखित झालेले आहे. त्या ऐवजी "माहेश्वरी सेवा ट्रस्ट" असे नमूद करण्यात यावे.

मा. महापौर : स. सदस्य श्री. बारवाल यांनी सुचवल्यानुसार दुरुस्ती करण्यात यावी.

श्री. मोहसिन अहेमद : पृष्ठ क्र. १६ वर विषय क्र. १२५/२३ संदर्भात सभागृहात चर्चा होऊन आपण रुलिंग दिलेले आहे की १५ तारखेस नामांतर समितीची बैठक घेण्यात येणार आहे. त्यात असे ठराव ठेवण्यात यावी. परंतु १५ तारखेला बैठक आयोजित करण्यात आलेली नव्हती. सदर रुग्णालयात नाव देण्या बाबतचा प्रस्ताव असून सदर रुग्णालयास इमारत ही नवीन आहे. या इमारतीस नाव द्यावयाचे आहे. नामांतर करावयोच नाही करिता प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : पृष्ठ क्र. १८ वर उस्मानपुरा येथील डांबरीकरण कामाचे टेंडर काढण्यात यावे असे आदेश देण्यात यावे अशी विनंती आहे.

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांनी स. सदस्य श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय यांनी मांडलेली सुचनेनुसार तात्काळ कार्यवाही करावी. पान क्र. ३२ वर २५% लोक वर्गणी न घेता अंबिकानगर जयभवानीनगर, प्रकाशनगर, राजीव गांधी नगर, संतोषीमाता नगर येथे सुध्दा मूलभूत सुविधा देण्यात यावे. अशी दुरुस्ती करण्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

दिनांक ११-०१-२००० रोजी संपन्न झालेल्या इतिवृत्तातील विषय क्र. १५३/६ मा. महापौरांनी दिलेल्या रुलींग मधील ठराविक काळासाठी ही इमारत देण्यात यावी हे वाक्य वगळण्यास आणि याच ठरावातील माहेश्वरी ट्रस्ट ऐवजी माहेश्वरी सेवा ट्रस्ट अशी दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

दिनांक ११-०१-२००० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तास वरील दुरुस्तीसह आणि दिनांक २०-१२-९९ ची तहकूब व दिनांक २१-१२-९९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १७३/२ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण -९ व कलम ९९ अन्वये प्रत्येक वित्तीय वर्षात २० फेब्रुवारी किंवा तत्पुर्वी मालमत्ता कराचे दर निश्चित करणे आवश्यक आहे. या नियमानुसार उपआयुक्त (म.) यांनी दिनांक १२-०१-२००० चे स्थायी समितीसमोर सन २००० ते २००१ या वित्तीय वर्षासाठी मालमत्ता कराचे खालील दर प्रस्तावित केले होते.

खालील दर हे कर योग्य मुल्यांवर नाकारले जातील.

**महानगरपालिकेचे दर :**

| अ. क्र. | कराचे नांव | सन ९९-२००० चे दर करयोग्य मुल्य | दर दर % | सन २०००-२००१ चे दर करयोग्य मुल्य | प्रस्तावित दर % |
|---|---|---|---|---|---|
| १ | सामान्य कर | कोणत्याही कर योग्य मुल्यांवर | | | |
| | | १ ते १००० | २३% | १ ते १००० | २३% |
| | | १००१ ते १०००० | २४% | १००१ ते १०००० | २४% |
| | | २०००१ ते ५०००० | २७% | २०००१ ते ५०००० | ३०% |
| | | ५०००१ ते १००००० | २४% | ५०००१ ते १००००० | ३५% |
| | | १००००० ते पुढे | २९% | १००००० ते पुढे | ३५% |
| | | | | | |
| २ | साफसफाई कर | कोणत्याही योग्य मुल्यवर | | | |
| | अ) निवासी वापर | -//- | ३% | -//- | ३% |
| | ब) निवासेत्तर वापर | -//- | ६% | -//- | ८% |
| ३ | वृक्ष कर | -//- | १% | -//- | १.५% |
| ४ | अग्निशमन कर | -//- | १% | -//- | १.५% |
| ५ | म.प. शिक्षणकर | -//- | १% | -//- | १.५% |
| ६ | पथकर | -//- | १% | -//- | २% |
| ७ | जलनि:सारण कर | -//- | १% | -//- | १.५% |
| ८ | जललाभ कर | -//- | १% | -//- | १.५% |
| ९ | मोकळ्या जागेचा कर | सामान्य कराच्या दराने आकारण्यात येतील | | | |
| | | | | | |

**ब)** तसेच राज्य शिक्षण कर रोजगार हमी उपककर, व मोठ्या निवासी क्षेत्रावरील कर शासन निर्णयाप्रमाणे व दराप्रमाणे कर योगय मुल्यांवर आकारण्यात येतील.

प्रस्तावित प्रस्तावावर सभागृहात चर्चा होऊन स्थायी समितीने ठराव क्र. ५२४/५ दिनांक १२-०१-२००० मालमत्ता व उपकरात वाढ करण्याचा प्रस्ताव सभागृहासमोर दाखल केला असता तरी हे सभागृह सन २०००-२००१ या वर्षासाठी मालमत्ता व उपकरात कोणत्याही प्रकारची वाढत न सुचविता सन १९९९-२००० या वर्षातील दरानेच आकारणी करण्यास सर्वानुमते मंजुरी देऊन सर्वसाधारण सभेत शिफारस केली आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री. बारवाल गजानन : मालमत्ता करात या वर्षासाठी कुठल्याही प्रकारची वाढ करण्यात येऊ नये कारण बरेचशे नागरिक कर भरण्या संदर्भात न्यायालयात गेलेले असून त्या केसेस निकाली लावल्या व ज्यांच्याकडे थकीत रक्कम आहेत ती वसूल करण्यात याची सभागृहाच्या सम्मतीने मी विनंती करतो की, मागील वर्षाप्रमाणेच मालमत्ता कराचे दर असू द्यावे.

श्री. अफसरखान : मागील वर्षाप्रमाणे जो मालमत्ता कर आकारण्यात येत असे त्याप्रमाणे निर्णय घेण्यात यावा कुठल्याही कराबाबत वाढ करण्यात येऊ नये.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : मागील वर्षाप्रमाणे जो मालमत्ता कर आकारण्यात येत असे त्याचीच वसुली बाकी आहे. ती वसुली करण्यात यावी. या वर्षासाठी कुठल्याही प्रकारची मालमत्ता कर आकारणीत वाढ करण्यात येऊ नये. प्रस्ताव जशाच तसा मंजूर करावा.

श्री. महादेव सुर्यवंशी : मालमत्ता करा संदर्भातील प्रस्तावात स्थायी समितीने कुठल्या प्रकारची या वर्षासाठी वाढ न करता सर्वसाधारण सभेकडे शिफारस केली आहे. स्थायी समितीच्या निर्णयाचीच अंबलबजावणी होण्यास सभागृहाने निर्णय घ्यावा.

श्री. रशिद खॉन (मामू) : या अगोदर १ ते १००० साठी २३% वरून २३% च ठेवण्यात आलेली होती. यामधील २७% वरून ३०%, २८% चे ३३%, २३%, चे ३५% वाढ मागील वर्षी केलेली आहे. त्याप्रमाणे मागील थकबाकी वसुली करावी. या वर्षासाठी कुठल्याही प्रकारची मालमत्ता कर वाढण्यात येऊ नये, स्थायी समिती सभेच्या निर्णयाची अंमलबजावणी व्हावी.

श्री. गौतम खरात : या प्रस्तावानुसारप्रशानाच्या निदर्शनास आणू देऊ इच्छितो की, मालमत्ता कराची मागील ३० कोटी वसुलीपैकी ३०% टक्केने वर वसुली झालेली नाही. चालू वर्षामधील वसुली १९ काटीची बाकी आहे. मागील वसुली पूर्ण होत नसतांना पुन्हा जनतेवर बोजा कशासाठी टाकावयाचा. महानगरपालिकेच्या तिजोरीत २० कोटीची वसुली येणे बाकी आहे. प्रशासनामार्फत योग्य उपययोजना केल्यास उद्दिष्ट पूर्ती साठी जी रक्कम नागरिकांकडे बाकी आहे. ती मिळण्यास अवघड नाही. तसेच प्रयत्न प्रशासनाच्या व्हावे. नुसते कादावर बजेट वाढवून उपयोग होणार नाही. तसे आदेश सभागृहाच्या वतीन प्रशासनास देण्यात यावे.

श्री. मेहेर विजयकुमार : मागील कित्येक वर्षापासून मालमत्ता धारकाकडे कर आहे अद्याप पर्यंत का वसूल करण्यात आलेले नाही. सभागृहाच्या जकात वसुली संदर्भातच फक्त चचर्र केली जाते. परंतु इतर मी वसुली आहे. उदा पाणीपट्टी, मालमत्ता कर यांचे ठरलेल्या उद्दिष्टाची रक्कम वसूल झाली पाहिजे. तसे प्रशासनाने नवीन काही उपाययोजना करता येईल ती करावी. वसुली झाल्यास विकास कामे करण्यासाठी अडचण येणार नाही.

श्री. महादेव सुर्यवंशी : कर वसुली जास्त प्रमाणात होण्या संदर्भात मा. उपआयुक्त यांच्याकडे नुकतीच झोन अधिकाऱ्या बरोबरच बैठक झालेली आहे. बैठकीच्या माध्यमातून पूर्ण विचारणा केल्यानंतर असे असे समजले की, कर वसुली संदर्भात न्यायप्रविष्ठ असे एकूण १३४२ प्रकरणे आहेत. अशी प्रकरणे न्यायालयामार्फत किंवा समझोता करून निकाली काढल्यास बरीच जास्तीची वसुली होण्यास मदत होईल. इतर महानगरपालिकामध्ये कर लावण्याच्या पध्दती वेगळ्या आहेत. महसूली उत्पन्न जमा करतांना शासनाचा जो कर्मचारी असतो तो नियमाप्रमाणे टॅक्स आकारतो परंतु तसा प्रकार या शहराच्या बाबतीत नाही. एकाद्या ठिकाणी एका बिल्डींगला १ हजार रु. टॅक्स असेल तर बाजुच्याच तशाच प्रकारच्या त्या पध्दतीच्या बिल्डींगला २०० रुपये कर आकरण्यात येतो. कर लावणारे जे इंजिनिअर आहेत ते वेगवेगळ्या पध्दतीने कर लावतात. याबाबत एक विशेष बैठक घेऊन टॅक्स लावण्याबाबत पध्दती बदलता येत असेल व नियमात बदल करता येत असेल तर विचार व्हावा. सोलापुर महानगरपालिकेचा विचार केल्यास त्याची टॅक्स वसुली करण्याची व टॅक्स लावण्याची पध्दती वेगवेगळ्या आहेत. त्याचेकडे आज रोजी जवळ जवळ ९०% कर वसुली झालेली आहे. त्या पार्श्वभूमीवर आपल्या महानगरपालिकेत नियमात बदल करून कार्यवाही करता येत असेल तर प्रशासनाने त्यांचा खुलासा करावा. झोनवाईज विचार

केल्यास बजेटच्या नुसार १३%, १४%, १७%, २१%, अशी वसुली झालेली दिसून येते.

श्री. नरेंद्र पाटील : प्रशासनामार्फत कर वाढी बाबत प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे. सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मागील थकबाकी ही २० कोटीची मालमत्ता धारकाकडे बाकी आहे. २० कोटीच्या थकबाकीवर वर्षाचे एकूण व्याजाचा विचार केल्यास ५० लाख रुपये व्याज येऊ शकते. जी वसुली बाकी आहे ती वसूल करण्याचे काय प्रयोजन करता येईल याचा विचार अगोदर व्हावयास पाहिजे. वसुली पूर्ण झाल्यास नवीन कर वाढीचा प्रस्ताव ठेवण्याचा प्रश्नच येत नाही.

२) नागरिकांकडून कर वसुली करण्या संदर्भात त्यांना सवलतीने टक्केवारीनुसार वर्षाला, दोन वर्षाला इतकी सवलत देण्यात येईल असा प्रस्ताव या सभागृहाने मंजूर ही केलेला आहे. परंतु त्यामुळे या २-३ वर्षात काहीच फरक पडलेला दिसत नाही. असा अनुभव येतो. खरोखरच मालमत्ता कर वसुली करावयाची असेल तर सिडको प्रमाणे जे की, एखाद्या व्यक्तीवर थकबाकी असेल तर त्या व्यक्तीकडून व्याजासहित रक्कम वसूल करण्यात येते. त्यास डिले पेमेंट चार्जेस म्हणतात असा उपक्रम राबविला तर नक्कीच पूर्ण ठरलेल्या उद्दिष्टाची रक्कम वसूल होईल. वारंवार कर वाढीचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस येत असतो. आम्हीही लोकप्रियतेच्या दृष्टीने त्यास कोणत्याही प्रकारची करवाढ होऊ नये म्हणून विरोध करतो यापुढे असा प्रस्ताव सभागृहाच्या मंजुरीसाठी येऊ देऊ नये व मागील कर वसुली कशी करता येईल याबाबत प्रशासनानेच धोरण ठरवावे. व वरील मी केलेल्या सूचनाप्रमाणे प्रशासनाने अंमलबजावणी केली तर थकबाकी वसूली होण्यास काहीही कठीण जाणार नाही.

श्री. प्रदिप जैस्वाल : प्रस्तावाच्या माध्यमातून प्रशासनाकडून खुलासा घेऊ इच्छितो की, मागील ३ वर्षापासून १६०० च्या वर प्रकरणे न्यायालयात प्रलंबित होत्या त्यापैकी गेल्या तीन वर्षात पावणे दोनशे ते २०० लोकांची प्रकरणे निकाली काढण्यात आली व उर्वरित १३८२ लोकांची प्रशासनाच्या माध्यमातून सुनावणी झालेली होती काय? झालेली असल्यास त्यावर का निर्णय घेण्यात असलेला नाही. याचा खुलासा प्रशासनाने करावा.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : स. सदस्य श्री. नरेंद्र पाटील यांनी केलेल्या सुचनेनुसार शहरामध्ये अशा काही नागरिक आहेत की, ते मुळ मालमत्तेवरील कर भरू शकत नाही तर ते व्याजा सहित थकबाकीची रक्कम कसे भरू शकतील ज्याचे उत्पन्न जास्त प्रमाणात आहे अशा लोकांना रिबेट (सवलत) द्यावी म्हणजे मालमत्ता कर भरतील.

श्री. बारवाल गजानन : मालमत्ता कर भरण्या संदर्भात मागील अनेक वर्षापासून न्यायालयात केसेस दाखल झालेल्या आहेत अशा केसेसच्या बाबतीत मी महापौर असतांना असा निर्णय घेतलेला होता की, जिल्हा न्यायालयाकडे या केसेस संदर्भात दाद मागविली होती त्यांनी असे आदेशित केले होते की, महानगरपालिकेच्या संदर्भातील केसेस करिता एक स्वतंत्र लोक न्यायालय भरवून निर्णय घेतला तर योग्य होईल. व न्यायालयास संपूर्ण सहकार्य मिळेल असे कळविले होते. याबाबतीत पत्रकार परिषद घेऊन जिल्हा

न्यायालयास कळवावे व लोकन्यायालय भरवून केसेस निकाली लागत असेल तर नक्कीच जास्तीची कर वसुली होईल यात शंका नाही.

२) स सदस्य श्री. नरेंद्र पाटील यांनी केलेली सूचना की, ज्यांचेकडे कर बाकी आहे अशी वसुली होण्यासाठी दंडासहित रक्कम वसूल करावी. असे प्रकार प्रशासनाने अंमलात आणू नये. नागरिकांना सवलतीच्या दराने व न्यायालयाचे निर्णयानुसार वसूली करण्यात यावी. सोलापुर महानगरपालिकेसारखे टॅक्स वसुली करण्याची व लावण्याची जी पध्दतीचा अंमलबजावणी करता येत असेल तर तसे प्रयत्न प्रशासनाने करावे.

श्री. गिरजाराम हाळनोर : १९९६-९७ ला श्री. राजपुत हे करमूल्य निर्धारण विभागात असतांना यांनी प्रस्ताव कर बाबत प्रत्येक लोकांचे एक काडे बनविण्यात यावे असे केल्यास कुणी कधी व किती व कोणत्या वर्षी कर भरला हे समजून येईल व लोकांच्या तक्रारी पण येणार नाही. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ अशाच प्रकारची अंमलबजावणी करते म्हणून त्यांना वसुली करण्यात जास्त कठीण जात नाही. त्याप्रमाणे आपल्या महानगरपालिकेत कार्यवाही करण्यात यावी.

श्री. स. अली मिरा सलामी : मागील वसुली बाकी असतांना कर वाढी बाबत प्रस्ताव मंजुरीसाठी येणे योग्य वाटत नाही. अर्थसंल्पाच्या वेळी आणला जातो. स. सदस्य श्री. जैस्वाल यांनी थकबाकी दरांच्या सुनावणी बाबत खुलासा मागविलेला आहे. त्यांचा खुलासा व्हावा. सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सांगावेसे वाटते की, शहरातील बऱ्याच ठिकाणी दोन जवळ-जवळ असलेल्या एकाच पध्दतीच्या बिल्डींगला वेगवेगळै टॅक्स आकारण्यात आलेले आहेत. यामुळे बरेच लोक न्यायालयात गेले व वसुली जास्त प्रमाणात होऊ शकली नसेल. एका कुटुंबातील आई व मुलांमध्ये १९९० ला घराची वाटणी झाली त्यांची मुले अलक निघाल्याने संबंधित मुळ मालकास व त्याच्या तीनही मुलास टॅक्स लावण्यात आले. आज आई व मुलांच्या नांवे एकाच मिळकतीचे मालमत्ता कर आकारण्यात येत आहे. त्या संदर्भात निवेदन सादर केलेले असून चर्चा करून प्रकरण निकाली काढावे असे सांगितले असतांना कार्यवाही झालेली नाही. प्रशासनाने कामकाज नियोजन बध्द असावे जास्तीचे टॅक्स लावण्यात येऊ नये. प्रकरणे निकाली काढून वसुली जास्तीत जास्त कशी होईल याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे. सध्याची वसुली कशी प्रकारे होते याची माहिती सभागृहाला द्यावी.

श्री. महादेव सुर्यवंशी : प्रकरण २६ मध्ये कलम ४०६ ई नुसार एकाद्या करा विरुध्द केलेल्या अपीलाच्या बाबीतत अपील दाखल केलेला तारखे पर्यंतची अपील अपील कारकाकडून मागणी केलेली निवादग्रस्त करावी रक्कम किंवा अपील दाखल करण्याच्या तारखेपर्यंत निवादग्रस्त कर योग्य मुल्याच्या आधारे आकारणी योग्य करावी रक्कम अपील दाराने मा. आयुक्तांकडे जमा केलेली नसेल तर असे अपील विचारार्थ स्विकारता कामा नये असे नियमात असतांना बरेच करधारक वरील प्रमाणे कार्यवाही न करता डायरेक्ट न्यायालयात जातात वरील नियमाप्रमाणे कार्यवाही केल्यास वसुली जास्त प्रमाणात होऊन जे लोक अपील करतात त्याचे प्रमाण कमी होईल त्याबाबत निर्णय घेऊन अंमलबजावणी करावी.

श्री. गजानन बारवाल : एखाद्या कर धारकाला आकारण्यात आलेला कर मान्य नसेल तर त्यांनी प्रथम अंडर प्रोटेस्ट रक्कम जमा करावी व नंतरच अपील करावे. हा कायदा लागू करावा या नंतर सर्व केसेस अशा पध्दतीने हाताळण्यात यावेत असे केल्यास जास्तीची कराची वसुली होऊ शकेल.

श्रीमती मोहसीना बिल्कीस : शहरातील बऱ्याच नागरिकांकडे मागील कराची रक्कम बाकी आहे. शहारातील मोठमोठ्या इमारतींना वेगवेगळ्या प्रकारचे टॅक्स आकारण्यात आले आहे. ज्यांना कमी कर आकारण्यात येतो त्यात कर्मचाऱ्यांना ओळखीचे किंवा नातेवाईक असतात. ज्यांना जास्त लावण्यात आलेले आहे असे लोक कर भरण्यास धजावत नाही. नातेवाईक राहतात किंवा भाडेकरू राहतात याची शाहीनशाह करून घ्यावी. मातीचे घर व आर.सी.सी. चे घर या दोन्ही घरांना सारखेच टॅक्स आकारण्यात आले आहे. जे कर्मचारी वसुलीसाठी जातात ते पूर्ण वसुली करत नाही. सर्वांनाच नियमाने टॅक्स लावण्यत येऊन गरीबावर अन्याय होणार नाही याची प्रशासनाने दक्षता घ्यावी. प्रस्तावातील कराचे दर दाखविण्यात आलेले आहे ते पूर्वीप्रमाणेच ठेवावे कुठल्याही प्रकारची वाढ करण्यात येऊ नये.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : भाड्याच्या रक्कमेवर करयोग्य मुल्या ठरवतात जे खाजगी वापरांसाठी आकारणी होते तीच आकारणी भाड्याने दिलेल्या इमारतीसाठी ठेवावी. त्यामुळे लोक न्यायालयात जातात. खाजगी वापरांतील क्षेत्रात जी आकारणी होते तीच भाड्याने दिलेल्या इमारतीस केल्यास लोकांना भाडे लावण्याची गरज पडणार नाही.

२) ज्या न्यायालयात केसेस आहेत त्या बाबत विधी सल्लागार यांनी लक्ष द्यावयास पाहिजे. न्यायालयात वेळोवेळी केसेस चालवण्याची जी वेळ मर्यादा दिलेली असते त्या त्या वेळी न्यायालयात उपस्थित राहणे गरजेचे असून परंतु आपले वकील एकदा वकील पत्र देऊन टाकल्यानंतर न्यायालयातील केसेस चालविण्याबाबत टाळाटाळ करतात. व त्यामुळे अनुपस्थित राहल्यामुळे महानगरपालिकेच्या विरोधात निकाल लागले जातात. व त्याचा परिणाम कर वसुलीवर होतो. त्याचप्रमाणे कायद्याचे नविन नियमानुसार केसेस हाताळण्याचे काम विधी सल्लागार यांचे असून कटाक्षाने त्यांनी त्याची अंमलबजावणी केली पाहिजे. न्यायालयीन प्रकरण योग्य प्रकारे चालविल्यास कमीत कमी १/३ वसुली होऊ शकते.

श्री. विठ्ठल जाधव : झोनवाईज किती वसुली झालेली आहे याची माहिती देण्यात यावी. झोनमध्ये वसुली कमी झालेली आहे. त्याचे कारण काय? ३ वर्षापूर्वी एक ठराव मंजूर केला होता. "घर ते कर" प्रत्येक घरांना कर का आकारण्यात येत नाही.

सौ. लता दलाल : कर वसुली संदर्भातच मागील बैठकीत चर्चा झालेली होती. त्यानुसार झोन वाईज माहिती देण्यात आली परंतु ज्या झोनची वसुली कमी झाली याबाबत असे सांगितले गेले की, ज्या वेळेस मालमत्ता करा संदर्भात प्रस्ताव सादर होईल. त्यावेळी खुलासा करण्यात येईल असे सांगितले गेले होते. अे.बी.सी. डी प्रमाणे आपण टॅक्स लावण्याचे दर आकारलेले आहेत त्याप्रमाणे का लावण्यात येत नाही. लावण्यात येत असेल तर वसुली का होत नाही. त्याची कारणे काय? योग्य ती वसुली व योग्य त्या वेळी झाल्यास मालमत्ता कराचे दर वाढवण्यासाठी येणाऱ्या त्या त्या पुढील

वर्षासाठी निर्णय घेऊ शकतो. ज्या भागामध्ये वसुली चांगल्या प्रकारे होते त्या ठिकाणी पुन्हा पुन्हा वसुली करण्यास कर्मचारी जातात. ज्या ठिकाणी वसुली होत नाही, वर्षानुवर्ष वसूली बाकी असून लोक भरण्यास तयार नाही. त्यांच्या बाबतीत प्रशासन काहीही कार्यवाही करत नाही. ठराविक लोकांचीच वसुली केली जाते. ज्यांचे दोन वर्षापासून नळपट्टी बाकी असेल त्यांचे नळ कनेक्शन तोडले जातात. यासाठी प्रशासनाने कर वसुली तसेच कर लावण्याची पध्दती सुधारली पाहिजे. अशी आमची मागणी आहे.

श्री. अभिमन्यु भालेराव : ३ वर्षापूर्वी ज्या ५२ झोपडपट्ट्या घोषित झाल्या त्या अगोदर वॉर्ड क्र. १४ मध्ये टॅक्स लावण्याबाबत संपूर्ण कागदपत्र प्रशासनाकडे सादर केलेली आहे. त्यानुसार ४ वर्षापासून जी झोपडी व घरे आहेत त्यांना ५०० रु. टॅक्स लावण्यात आलेला असून काहीचे काहीच नसतांना त्यांच्या नावाने टॅक्स आलेला आहे. या संदर्भात ती पत्र दिलेले होते. त्यानुसार असे सांगितले गेले की, प्रत्यक्ष पाहणी करून निर्णय घेण्यात येईल. वॉर्डातील ७०० घरांना अद्याप टॅक्स लावलेला नसून टॅक्स लावण्यात यावा असे मा. आयुक्तांना वारंवार सांगितले गेले परंतु अद्याप टॅक्स लावण्यात आलेला नाही. ज्यांनी टॅक्स भरलेले नाही अशा काही लोकांनी प्रॉपर्टी जप्त होते. आणि माझ्या वॉर्डात ७०० घरांना टॅक्स लावण्यात यावा अशी विनंती केलेली असतांना तशी कार्यवाही होत नाही. जे टॅक्स भरण्यास तयार आहे. त्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होते असे दिसून येते. तरी या घरांना टॅक्स लावण्यात यावा व ज्यांना टॅक्स जास्तीचा लावण्यात आलेला आहे तो कमी करण्यात यावा.

सौ. शिलाताई गुंजाळे : बरेच नागरिक मनपाकडे कर भरण्यासाठी येतात परंतु आपले अधिकारी त्यांना सहकार्य करत नाही. जो पर्यंत अधिकाऱ्यांकडे पैसे देत नाही तोपर्यंत कर लागतच नाही. तसेच सरकारी जागेवर कुणीही रबर स्टॅम्प व इतर पूर्ततेची कागदपत्रे तयार करून अनाधिकृत प्लॉटींग केलेली आहे. आपल्या अधिकाऱ्यांने अशा जागेवर टॅक्स लावले आहे. असे असेल तर अधिकारी यांच्यावर कार्यवाही झाली पाहिजे. तसे आदेश आपण द्यावे. व जे कर भरण्यास तयार आहेत त्यांचाही विचार प्रशासनाने करावा.

सौ. फरहदबानो : वॉर्डात बऱ्याच ठिकाणी कर आकारण्यात आलेले नाही. काही मालमत्ता धारकांना जास्तीचा टॅक्स लावण्यात आलेला आहे. ज्या कर्मचाऱ्यांनी जास्तीचा कर लावला आहेत अशा कर्मचाऱ्यांवर कार्यवाही झाली पाहिजे. व जे कर भरण्यास तयार आहेत. अशा घरांना कर लावण्यात यावा.

सौ. पद्मा शिंदे : झोन नं. ७ मध्ये भोगे साहेब असतांना काही लोकांनी विना परवानगीने नळ कनेक्शन घेतलेले आहेत. त्याबाबत अधिकाऱ्यांनी अद्याप कार्यवाही केली नाही. अनाधिकृत नळ कनेक्शन ताडतोब तोडण्यात यावे.

मा. महापौर : प्रशासनामार्फत सादर केलेला कर वाढ संदर्भातील प्रस्ताव त्यानुसार सभागृहातील स. सभासदांच्या भावना लक्षात घेता मालमत्ता करामध्ये कुठल्याही प्रकारची वाढ न करता हा ठराव मंजूर करण्यात येतो.

२) ज्या ज्या झोनमध्ये वसुली कमी होते ती का कमी होते त्यांचे नेमके कारण काय? जे कर भरण्यासाठी लोक येतात त्यास अधिकारी प्रतिसाद देत नसतील तर अशा अधिकाऱ्यांवर प्रशासनामार्फत कडक कार्यवाही करण्यात यावी.

३) तसेच या विभागामध्ये संबंधित पद जे की, करमुल्य निर्धारण संकलन अधिकारी म्हणून शासनाची पद मंजुरी झालेली आहे. त्याप्रमाणे ताबडतोब पद भरण्यात यावे पद भरल्यास ज्या तक्रारी येतात. त्या सोडण्यास मदत होईल. तसेच ज्या १३०० तक्रारी प्राप्त णालेल्या त्या सोडवण्यास मदत होईल

४) सर्वसाधारण सभेमध्ये झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी प्रशासनाने ताबडतोब करावयास पाहिजे. एक उदा. द्यावयाचे झाल्यास जून मध्ये बीपीएल तसेच सीटीसी शिक्षक पद भरणे बाबत निर्णय घेतलेला असतांना अद्याप प्रशासनाने त्यावर कुठलीही कार्यवाही केली नाही याचा अर्थ प्रशासन सभागृहाच्या विरोधात चालते.

५) ज्या प्रभागात टॅक्स लावण्यात आलेला नाही त्या तक्रारी नागरिक स्वत:हून आपल्या विभागाकडे अर्ज करून मागणी करतात. कळवितात अशा भागातील लोकांना टॅक्स लावण्याची.

६) कर ाकारणी करतांना वेगवेगळ्या प्रकारे कर आकारण्यात येऊ नये. नियमाने कर आकारावे. जास्तीचा कर आकरण्यात आला अशी कुणाची तक्रार असेल तर त्याबाबत प्रशासनाच्या माध्यमातून तात्काळ कार्यवाही व्हावी. असे केल्याने महानगरपालिकेच्या तिजोरीत भर पडेल.

श्री. प्रदिप जैस्वाल : कर मुल्यनिर्धारण संकलन अधिकाऱ्याचे पद भरणार नंतर त्यांच्या सोबत पाहणी होईल त्यास वेळ लागेल. मागील बैठक आपण कर वसुली होत नाही म्हणून तहकूब केली. १६०० केसेस पैकी काही प्रकरणे निकाली काढण्यात आली. परंतु त्यातील १३८२ लोकांची प्रकरणाबाबत हेरींग झालेली होती. त्यानुसार तक्रारदार व प्रशासन त्यांच्यात समझोता होऊन कर भरण्याची त्या लोकांनी संम्मती दर्शविली असतांनाही अद्यापर्यंत प्रशासनाने त्या लोकांना कर भरण्या बाबतची नोटीस दिलेली नाही. ती का देण्यात आलेली नाही याचा खुलासा प्रशासनाने करावा. आपण झोनवाईज पाणीपट्टी वसुली बाबत विचार केल्यास १००% वसुली व्हावयास पाहिजे ती झोन वाईज विचार केल्यास ३१,३४,३७,३८% चे वर दिसून येत नाही. याबाबत प्रशासनाने सविस्तर वरील सर्व सुचनाचा खुलासा करावा.

श्री. गौतम खरात : या विषया संदर्भात आपण रुलींग दिलेली असतांना पुन्हा चर्चा होत आहेत.

मा. महापौर : माझी रुलींग अजून पूर्ण झालेली नसून महत्वाच्या विषयावर स. सदस्या श्री. जैस्वाल यांनी मागणी केल्यानुसार परवानगी दिलेली आहे.

श्री. महादेव सुर्यवंशी : मी पत्र देऊन तीन महिने झाले त्याचे उत्तर प्रशासनाने अद्याप दिलेली नाही. त्याचाही खुलासा व्हावा.

प्र. मा. आयुक्त (उप. आ. (प्र.)) : मालमत्ता कराबाबत एकूण ३०% वसुली झालेली असून ती का कमी झाली याबाबत बैठक घेऊन प्रशासनाने माहिती घेतलेली आहे. यात २ ते ३ महत्वाचे मुद्दे उपस्थित होतात.

१) जुन्या शहरामध्ये बऱ्याचशा इमारती पडलेल्या आहेत त्या पडलेल्या असून सुध्दा आपण टॅक्स आकारण्यात आलेला आहे.

२) सारख्या पध्दतीच्या इमारती आहेत. भाडेकरू तेच भाडे देतात. टॅक्समध्ये फरक आहेत. त्यामुळे अशा प्रकरणाच्या बाबतीत ही तक्रारी आहेत.

३) काहींनी घर विकलेले असून नवीन घर खरेदी करणारा मधल्या कालावधीतील टॅक्स भरण्यास तयार नाही. म्हणून तक्रारी आहेत. जुना मालक भरण्यास तयार नाही. नवीन जो येतो तोही भरण्यास तयार नसतो. तो टॅक्स कसा वसूल करावा याबाबत प्रशासन योग्य ते प्रयत्न करत असून जप्ती, तसेच नळ कनेक्शन तोडणे याबाबतही प्रशासनाची कार्यवाही चालू आहे. जास्तीत जास्त वसुली कशी करता येईल. त्याबाबत प्रशासन प्रयत्न करत आहे.

४) जे १३०० प्रकरण न्यायप्रविष्ट आहेत. त्या बाबत २ वर्षापूर्वी झोनवाईज सुनावणी झालेली होती. दुर्दैवाने अंमलबजावणी झाली नाही. ते तपासून घेण्यात येईल.

५) करमुल्य निर्धारण करतांना एकदा ठरवण्यात आलेले कर योग्य मुल्य (एन आर. व्ही) बदलता येत नाही.

स. सदस्य श्री. सुर्यवंशी यांनी केलेल्या सुचनेनुसार, एखाद्या मालमत्तेवर एकदा कर लावण्याची नवीन कार्यवाही करतांना करयोग्य मुल्य ठरविलेले संबंधितास मान्य नसेल तर तेस अपील मा. आयुक्तांकडे त्यांनी केले पाहिजे. अपीलाची सुनावणी करावयाची असेल तशी पूर्ण रक्कम मनपाकडे जमा करावी लागते. परंतु ही प्रकरणे १५-१५ वर्षाचे पूर्वीचे असून ज्या वर्षाची रीटेबल व्हेल्यू असेल त्याच वर्षासाठी कराच्या बाबतीत त्यांना तक्रार करता येते. यात काही लोकांकडे १०-१० वर्षाचे टॅक्स बाकी असून अद्याप सुनावणी केलेली नसून सुनावणी करावयाची असेल तर त्या संबंधित थकबाकीदारांस १० वर्षाची पूर्ण रककम महानगरपालिकेला तात्काळ भरावी लागे. अशा प्रकारची तयारी संबंधित नागरिकांची असेल तर प्रशासन त्या प्रमाणे कार्यवाही करेल.

श्री. प्रदिप जैस्वाल : मी जी. सूचना मांडली त्याबाबत योग्य खुलासा केलेला नाही. माझे म्हणणे असे होते की, १६०० कर धारकांशी हेरींग झाल्यानंतर त्यातील १७५-२०० लोकांची प्रकरणे निकाली काढली. बाकीची का काढली गेली नाही. आयुक्तांनी केलेला खुलाश्यानुसार असा कोणताही नागरिक नाही की तो आपणांकडे सुनावणीसाठी पूर्ण १०-१० वर्षाची थकबाकी अगोदर भरेल. या प्रकरणाबाबत त्या लोकांचे म्हणणे ऐकूण घेऊन प्रशासनाने निर्णय घ्यावा. असे मागील एका सर्वसाधारण सभेमध्येही निर्णय झालेला होता. तरी कार्यवाही केली नाही. तीन वर्षापूर्वी निर्णय झालेला असतांना १३८२ प्रकरणाची कार्यवाही प्रशासनाने का केली नाही.

डॉ. श्री. मेहेर विजयकुमार : आतापर्यंत ३०% वसुली झालेली आहे. उर्वरित ७०% वसुली येत्या दोन महिण्यामध्ये होणार आहे काय? प्रशासनाच्या निष्काळजीपणाने वसुली होत नसून आताच आयुक्तांनी केलल्या खुलासा पैकी १०-१० वर्षाची थकबाकी भरल्यासच संबंधित कर धारकालामा. आयुक्तांकडे अपील करून सुनावणी करता येईल केवळ सुनावणी साठी कुणीही व्यक्ती १० वर्षा थकबाकी भरू शकणार नाही. अशा प्रकाणातील संबंधित व्यक्ती न्यायालयात जाऊन कमी पैशामध्ये स्टे आणतात. मालमत्ता कर तसेच पाणीपट्टी वसुली ही पूर्ण व्हावयास पाहिजे. कारण एम.एस.ई.बी. ला आपणाकडून दर महिण्याला पाटी बिलापौअी रक्कम भरण्यात येते. वसुली बाबत प्रशासनानेच गांभीर्याने करावयास पाहिजे.

श्री. नरेंद्र पाटील : आताच मा. आयुक्त साहेबांनी खुलासा केला, न्यायालयात एवढ्या मोठ्या प्रमाणात केसेस जाण्याचे एकमेव कारण म्हणजे एखाद्या ठिकाणी २०X३० शेडसाठी २ हजार रु. कर आकारला असेल तर त्यांच्याच बाजूला सारख्याच शेडसाठी ३ हजार रुपये टॅक्स लावला आहे. त्यापलीकडे गेल्यास आणखी जास्तीची रक्कम आकारण्यात आलेली आहे. त्यामुळे कर आकारणी बाबत तफावत असल्यामुळे लोक कर भरण्यास नकार देतात. व नाविलाजाने कोर्टात जातात. व वसुलीवर परिणाम होतो. कमी जास्त कर का आकारले जातात. यांची नोंद सभागृहाच्या माध्यमातून प्रशासनाने घ्यावी. एम. आय. डी. सी. सारख्या येरीयामध्ये २० शेड असून वेगवेगळे टॅक्स आकारण्यात आलेले आहे. कर आकरतांना नियमाने आकारण्यात आले तर वसुली होऊन प्रशासनाचा होणारा त्रास कमी होईल असे माझे मत आहे.

श्री. महादेव सुर्यवंशी : दोन वर्षापूर्वी न्यायप्रविष्ठ केसेसमध्ये कर धारक व प्रशासन यांच्या वाटाघाटी होऊन कर धारक कर भरण्यास तयार झाले. परंतु प्रशासनाने काय्रवाही केलेली नाही. अशी कबुली मा. आयुकत यांनी दिली. स्वतःची चुकीची कबुली प्रशासन देते आहे. निर्णय झालेला असतांना प्रशासनाने का कार्यवाही केलेली नाही. तर याचा अर्थ काय? प्रशासनातील संबंधित अधिकाऱ्यांना महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीची जाणीव नाही काय? हे प्रशासनाचे धोरण योग्य वाटत नाही. बरेच कर्मचारी वसुली बाबत नेमलेले असतांना सुध्दा ते २-२, ४-४ दिवस कुणाच्या घरी जात नाही. कुणी १०० रुपये दिले तर त्याचेकडून वसुली बाबत कार्यवाही करत नाही. अशी परिस्थिती आजच्या घडीला निर्माण झालेली आहे. दुसरे असे की, जो कर आकारण्यात येतो तो वेगेवगळ्या पध्दतीने आकारण्यात येऊन त्यामुळे बरेच लोक कर भरण्यास तयार नसतात व न्यायप्रविष्ट प्रकरणे होते. व न्यायालयीन केसेस चालवण्यास महापालिकेला पैसे आणखी खर्च होतो. जो पर्यंत कर आकरणीच्या पध्दतीत बदल करणार नाही तोपर्यंत अशा केसेस होत राहणार असून प्रकरणे चालावण्यासाठी किती पैसा खर्च होतो तसेच आपणांकडे एकूण किती केसेस सध्या चालू आहेत व कोणत्या भागातील कुणाच्या नावाने आहे यांची माहिती जर विधी सल्लागार यांना विचारली तर ती सुध्दा माहिती आपणाला देऊ शकणार नाही अशी परिस्थिती आजच्या घडीला निर्माण झालेली आहे. मी दिलेल्या पत्रानुसार मा. आयुक्तांनी योग्य खुलासा केलेला नसून वरील सर्व सूचना केल्यानुसार आज प्रशासनाने खुलासा करावा. अशी मी सभागृहाच्या वतीने विनंती करतो.

श्री. गौतम खरात : दोन वर्षापूर्वी न्यायप्रविष्ट असलेल्या केससेच्या बाबतीत प्रशासन निर्णय घेऊ शकत नाही व घेतला सुध्दा नाही. अशी प्रशासनानेच कबुली दिली. परंतु मी सूचना मांडू इच्छितो की,संपूर्ण शहरामध्ये जवळपास १ लाख प्रॉपर्टीज कार्यान्वित असून १ लाख पैकी १० ते १२ टक्के म्हणजेच १० ते १२ हजार मालमत्तेचे कर आकारणी बाबत वाद असतील परंतु बाकीच्या ९० हजार प्रॉपर्टीजची वसूली प्रशासनाने १००% केलेली आहेत काय सभागृहात वसुली बाबत चर्चा होतांना प्रशासन डिसपूट प्रॉपर्टी बाबतच नेहमी खुलासा करतात. व सभागृहाची दिशाभूल करतात. महापालिका प्रशासनाकडे सर्व सोयी सुविधा पोलिस वर्ग, कर्मचारी वर्ग, तसेच कायदे व नियम प्रशासनाकडे असून सुध्दा ९० हजार प्रॉपर्टीमधून फक्त आतापर्यंत ३०%

वसुली होते. आणखी दोन महिण्यात प्रशासन किती वसुली करतात. कमीत कमी न्यायप्रविष्ठ प्रकरणे सोडून उर्वरित ७५% टक्के वसुली व्हावयास पाहिजे. आतापर्यंत ३०% वसुली झाली. प्रशासन सक्षम असेल तर ती कार्यवाही होऊ शकते. पण प्रशासनाने मनावर घेतले पाहिजे. नसता १० वर्षाचीच काय आणखी २०-२० वर्षाचे कर लोक भरणार नाही व असे प्रकार हे वारंवार होतच राहणार असून यासाठी प्रशासनाने पावले उचलली पाहिजे. वसुली झाल्यास विकास कामे करता येईल याबाबत महापौर यांनी प्रशासनास येत्या दोन महिण्यात जेवढी जास्तीत जास्त वसुली करता येईल त्यासाठी सक्षम करावे प्रशासन सक्षम नाही असे आम्ही म्हणू शकत नाही. परंतु प्रशासनाने योग्य त्या वेळी प्रकरणे हाताळली तर निश्चितपणे ७५% तरी वसुली उद्दिष्टाच्या इतपत होऊ शकते. दोन महिण्याच्या काळात किती वसुली प्रशासन आणखी करू शकेल याची माहिती देण्यात यावी.

श्री. मोहसीन अहेमद : आताच काही स. सदस्यांनी दोन वर्षापूर्वी झोनवाईज झालेल्या सुनावणी बाबत सूचना मांडल्या, त्यानंतर झोनमध्ये अधिकारी यांची बदल केली जाते. त्यामुळे नविन अधिकारी यांना त्या केसेस बाबत माहिती घेण्यास वेळ लागतो झोन क्र. ३ व ८ संदर्भात मी बोलू इच्छितो या झोनमध्ये ६-६ महिण्याने अधिकारी यांच्या बदल्या केल्या जातात काही नागरिक पैसे भरण्यास तयार असतांना एवढे-एवढे पैसे भरावे लागणार अशा प्रकारचे अधिकारी यांनी दबाव टाकून अनेक लोकांकडून पैसे घेतलेले असून परंतु ज्या सुनावणी झालेल्या प्रकरणापैकी अद्यापही निर्णय प्रशासनाच्या माध्यमातून झालेला नाही. सिमेंट काँक्रेट व एक मातीचे घर अशा दोन्ही प्रॉपर्टीला एक टॅक्स लावण्यात येतो. म्हणून ज्यांना जास्तीचा कर आकारण्यात आला ते लोक न्यायालयात जातात. दुसरे असे की, आपल्याकडे जे विधी सल्लागार पद अद्यापपर्यंत भरलेले नाही. प्रभारी अधिकाऱ्याकडे चार्ज दिल्यास योग्य त्या वेळी व तत्परतेने केसेस निकाली लागत नाही. त्यामुळे वसुलीवर परिणाम होतो या सर्व बाबींचा प्रशासनाने विचार करावा. व आजच्या बैठकीत विधी सल्लागार हे पद भरण्याबाबत निर्णय घेण्यात यावा.

श्री. विठ्ठल जाधव : कर आकारणी विभागातील कर्मचारी हे पैसे घेऊन कमी जास्त कर आकरणी करतात एकाच भागात जवळ-जवळ असलेल्या घरावर एकाला जास्त कर व एका घर मालकास कमी कर आकारण्यात येतो. ज्यांनी कर्मचाऱ्याला पैसे दिले त्या घर मालकास वर्षाचे २ हजार रुपये आकारण्यात येतात. व ज्यांनी पैसे न दिल्यास त्या घर मालकावर ५ वर्षाचे २५ हजार रुपये आकारण्यात येतात तसेच १०-१२ वर्षाची थकबाकी काढतात. त्यामुळे कर आकारणी करताना तफावत येऊन ज्या व्यक्तींला कर जास्त लावण्यात आलेला आहे. असे लोक कर भरण्यास तयार नसतात. व ते नाविलाजाने कोर्टात जातात. यासाठी प्रशासनाच्या माध्यमातून अशा कर्मचाऱ्यावर कडक कार्यवाही करण्यात यावी. व जे घराला कर लागू करण्याबाबत विनंती करतात अशा लोकांच्या घराला टॅक्स लावण्याची विनंती करण्यात येते.

सौ. नुरजहाँ बेगम : नुस्तीच चर्चा होत आहे. निर्णय घेवून विषय क्र. १ वर चर्चा करण्यात यावी.

मा. महापौर : एक महत्वाचा विषयावर चर्चा चालू आहे. ज्यांना चर्चेत सहभाग घ्यावयाचा नसेल व ऐकावयाची नसेल त्यांनी बाहेर जावे. आजची सभा १० मिनिटासाठी तहकूब करण्यात येते. (वेळ १.४५ वाजता सभेला सुरुवात २.१५ वाजता)

श्री. गजानन बारवाल : महत्वाच्या विषयावर चर्चा चालू असून स. स. श्री. महादेव सुर्यवंशी यांनी आपणाकडे जी माहितीची प्रत दिलेली आहे त्याबाबत सभागृहात खुलासा व्हावा.

सौ. गुंजाळे शिलाताई : हर्सूल भागाता काही सरकारी जमिनी असून आपल्या अधिकारी मागील वर्षी संबंधित व्यक्तींनी खोटे कागदपत्र तयार करून त्यावर कर आकारणी केलेली आहे. व सर्रास त्या जागेवर प्लॉटींग होत असतांना अधिकाऱ्यांवर सूचना केल्यास संबंधिताने न्यायालयाचा स्टे आणलेला आहे. असे सांगतात ज्या सरकारी जमिनीवर प्लॉटींग होत आहे. ती थांबवावी व कर आकारणी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कडक कार्यवाही करावी अशी विनंती आहे.

श्री. महादेव सुर्यवंशी : कर आकारणी विभागामध्ये कर लावण्याची जी पध्दती आहे ती बदलावी त्यामुळे न्यायप्रविष्ठ केसेस होणार प्रत्येक वेळेस घरमालकाला विचारले जाते किराया दिलेल्या रुम किती त्याला भाडे किती ते घरमालक रु. ५०० भाडे असेल तर २०० सांगतात १००० असेल तर ३०० सांगतात त्यामुळे योग्य ती कर आकरणी व्हावयास पाहिजे. त्यासाठी प्रत्यक्ष भाडे विचारात घेणे ऐवजी त्या त्या भागातील शासनाने ठरवून दिलेल्या जागेची किंमत प्रत्यक्ष बांधकामाचा वापर व बांधकामाचा प्रकार विचारात घेवून कर आकारणी केल्यास योग्य होईल.

श्री. रशिदखॉन (मामू) : बऱ्याच ठिकाणी घरमालक स्वत: राहत नसून घर भाड्याने दिलेले आहे. २०-२५ वर्षाचा विचार केल्यास ६०-६५ रुपये एका रुमला किराया आहे त्या ठिकाणचे कर आकारणी जागेच्या मुल्यांकनावर केल्यास कर धारक कर भरणार नाही याचाही विचार व्हावा.

मा. महापौर : प्र. मा. आयुक्त यांनी खुलासा करावा.

मा. आयुक्त : कर आकारणी करण्याची पध्दत बदलाची व मुद्द्यावर सभागृहात चर्चा चालू आहे. याबाबतीत आपणांस दोन गोष्टीचा विचार करावा लागेल कर मुल्यांबाबत ज्या तरतूदी दिलेल्या आहेत त्यांचे पालन करणे आवश्यक आहे.

१) एकदा कर योग्य मुल्य निश्चित झाल्यानंतर ते आपणांस बदलता येणार नाही जे काही कमी जास्त झालेले आहे ते योग्य झालेले आहे.
२) ज्या नवीन प्रॉपर्टीज झालेल्या आहेत, त्या बाबत आपणांस विचार करता येईल.

श्री. महादेव सुर्यवंशी : एखाद्या घरमालकाने किरायांने घर दिल्यानंतर त्याप्रमाणे कर आकारण्यात येतो परंतु तेच घर त्याने निवास वापरासाठी ठेवल्यानंतरही तोच कर आकारला जातो. त्यानंतर संबंधिताने अर्ज केल्यानंतर कर आकारणी केलेली कमी होते. यासाठी ज्या त्या येरीयामध्ये शासनाने ठरवून दिलेले किंमतीप्रमाणे कर आकारणी करण्यात यावी.

श्री. प्रदिप जैस्वाल : बऱ्याच जुन्या शहरामध्ये १००-८० वर्षापासूनचे भाडेकरू राहतात. आजच्या परिस्थितीचा विचार केल्यास त्या घराचे भाडे २००० हजार रुपये आहे. परंतु ते जुने किरायादार आहेत अशा जुन्या भागातील शासनाने

ठरवून दिलेली किंमतीप्रमाणे कर आकारल्यास योग्य होईल काय याचा प्रशासनाने विचार करावा. व नवीन ज्या प्रॉपर्टीज होतील त्यांच्या बाबतीत कर आकारणी करण्यात बदल केल्यास योग्य आहे असे माझे मत आहे.

श्रीमती अलका पाटील : टपऱ्या पाणीपट्टी, घरे, जागा यांना किती कर आकारावा हे ठरवून घ्यावे व त्यानुसार कर आकारणी करण्यात यावी.

मा. महापौर : आपण केलेली सुचनेप्रमाणे आपण कशाला किती कर लावावा या बाबत दर निश्चित केलेले आहे. त्याप्रमाणेच वसुली होत आहे.

श्री. गजानन बारवाल : या प्रस्तावा संदर्भात खूप चर्चा झालेली असून निर्णय देण्यात यावा.

मा. महापौर : मालमत्ता कराच्या संदर्भात सभगृहात भरपूर चर्चा झालेली असून प्रशासनाला मी खालील प्रमाणे सूचना करतो की...

१) मालमत्ता कराची एकूण ३०% वसुली आज पावेतो झालेली असून येत्या दोन (२) महिण्यामध्ये जास्तीत जास्त कर वसुली कशी प्रभावीपणे करता येईल तशी कार्यवाही प्रशासनाने करावी.

२) कर आकरणी विभागाच्या संदर्भाने जे शासनाकडून कर मुल्यांकन अधिकारी वर्ग-१ चे जे पद मंजूर होऊन आलेले आहे. ते तात्काळ भरण्याची कार्यवाही प्रशासनाने करावी त्यामुळे ज्याही केसेस आहे त्या निकाली काढल्या जातील.

३) झोनवाईज ज्या १३८२ केसेस सुनावणी होऊन, ज्या केसेस न्यायप्रविष्ठ आहेत त्या तात्काळ प्रशासनाने निकाली काढून वसुली वाढवण्याचे प्रयत्न करावे. यात ज्यांच्या कर भरण्या बाबत तक्रारी आहे त्यांचाही समावेश करण्यात यावा.

४) विधी सल्लागार हे पद वृत्तपत्रात जाहिरात देवून तात्काळ भरण्यात यावे.

५) ज्या कर धारकाला कर आकारणी करतांना नियमाच्या व्यतिरिक्त जास्त प्रमाणात केलेली आहे. अशा कर्मचारी / अधिकारी यांच्यावर प्रशासनाने कार्यवाही करावी.

६) जे प्रॉपर्टी धारक होऊन कर भरण्यास तयार असेल व अधिकारी साथ देत नसतील तर अशा अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात यावी.

७) स. सदस्या सौ. गुंजाळे यांनी सांगितल्याप्रमाणे ज्यासरकारी जमिनीवर आपले अधिकारी कर आकारणी करत असतील तर अशा अधिकाऱ्यावर कार्यवाही करावी.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रशासनाने सन २०००-२००१ या वित्तीय वर्षासाठी मालमत्ता करात प्रस्तावित वाढ सुचविली असली तरी हे सभागृह सन २०००-२००१ या वित्तीय वर्षासाठी मालमत्ता व उपकरात कोणत्याही प्रकारची वाढ करता खालील दर्शविल्याप्रमाणे सन १९९९-२००० या वर्षातील दराने सन २०००-२००१ या वर्षासाठी मालमत्ता कराची आकारणी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ. क्र. | कराचे नांव | करयोग्य मुल्य | सन २०००-२००१ चे दर करयोग्य मुल्य |
|---|---|---|---|
| १ | सामान्य कर | कोणत्याही कर योग्य मुल्यांवर | |
| | | १ ते १००० | २३% |

| | | | |
|---|---|---|---|
| | | १००१ ते १०००० | २४% |
| | | १०००१ rs २०००० | २५% |
| | | २०००१ ते ५०००० | २७% |
| | | ५०००१ ते १००००० | २८% |
| | | १००००० ते पुढे | २९% |
| २ | साफसफाई कर | कोणत्याही योग्य मुल्यवर | |
| | अ) निवासी वापर | -//- | ३% |
| | ब) निवासेत्तर वापर | -//- | ६% |
| ३ | वृक्ष कर | -//- | १% |
| ४ | अग्निशमन कर | -//- | १% |
| ५ | म.प. शिक्षणकर | -//- | १% |
| ६ | पथकर | -//- | १% |
| ७ | जलनिःसारण कर | -//- | १% |
| ८ | जललाभ कर | -//- | १% |
| ९ | मोकळ्या जागेचा कर | सामान्य कराच्या दराने आकारण्यात येतील | |

**ब)** तसेच राज्य शिक्षण कर रोजगार हमी उपकर, व मोठ्या निवासी क्षेत्रावरील कर शासन निर्णयाप्रमाणे व दराप्रमाणे कर योग्य मुल्यांवर आकारण्यात येतील.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७४/३ :**

औरंगाबाद शहर प्रारुप विकास योजनेनुसार आरक्षण क्र. ८७ प्राथमिक शाळा या आरक्षणाने बांधित मिळकत न.भु.क्र. २०७२२/पैकी चे मिळकत धारक श्री. जयराम नथु साळुंके यांना शासनास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचनाचे अधिनियम १९६६ चे कलम ४९ अन्वये दिलेले खरेदीसूचना पत्र क्र. टिपीएस-३०९९/२१ प्र.क्र. १०३/९९/नवि-३० दिनाक १६-११-९९ नुसार नगर विकास विभागा मंत्रालय, मुंबई यांनी कायम केलेली आहे. त्यामुळे सदर आरक्षणा खालील जमिनीचा भूसंपादन प्रस्ताव खरेदी सूचना नुसाररचे क्षेत्रासाठी मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे एक वर्षाचे आत पाठविणे आवश्यक आहे. सदर प्रस्ताव एक वर्षाचे आत न गेल्यास आरक्षणाखालील सदर जमिन आरक्षणातून वगळली जाऊन त्यांचे लगत असलेला वापर देय होतो.

करिता सदर खरेदी सुचनेनुसार जमिन मालक श्री. जयराम नथू साळुंके यांचे नावे असलेले न. भु. क्र. २०७२२/-पैकी क्षेत्र ५०००.०० चौ. फुट (४६४.६८ चौ. मी.) आरक्ष्ज्ञण क्र. ८७ "प्राथमिक शाळा" साठी भूसंपादन अधिनियम १९६६ चे कलम - ४९ अन्वये संपादन करणेसाठी तसेच भसंपादनासाठी लागणाऱ्या खर्चासह भूसंपादन प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री गजानन बारवाल : या प्रस्तावाबाबत सविस्तर खुलासा व्हावा.

उप संचलक नगररचना : महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम अन्वये खरेदीसूचना शासनास बजावली खरेदी सूचना कायम करावयाची किंवा नाही हे शासन ठरवत दि. १६-११-९९ नुसार शासनाने खरेदी सूचना कायम केल्याने तेव्हांपासून १ वर्षात भूसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवावयाचा असतो. प. भू. क्र. २०७२२ पैकी काही क्षेत्र भूसंपादन

करण्यासाठी प्रकरण माननीय जिल्हाधिकारी यांचेकडे एक वर्षाचे आत पाठवणे गरजेचे असून मुदत संपल्यानंतर ते आरक्षणातून व्यपगत होते.

श्री. गजानन बारवाल : भूसंपादना बाबत या अगोदर बऱ्याच वेळा चर्चा होऊन शहरातील रस्ता रुंदीकरणासाठी जागा भूसंपादन करण्यात याव्या असे निर्णय झालेले असतांना प्रशासनाने कार्यवाही केलेली नाही. प्रशासनाचे याकडे लक्ष नाही काय? जो प्रस्ताव सादर केला आहे त्यात योग्य ती माहिती नमूद केलेली नाही.

उप संचालक नगररचना : ज्या ज्या जागा संबंधी भू-संपादन करण्याची कार्यवाही सर्वसाधारण सभेने घेतलेल्या निर्णयानुसार केलेली आहे. जवळ-जवळ ९०% प्रकरणे मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे आपण पाठविलेली आहेत.

श्री. अ. रशिदखॉन (मामू) : प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर शासनाकडे पाठविण्याची कार्यवाही झाल्यानंतर मंजुरीसाठी प्रशासन कार्यवाही करत नाही. बऱ्याच लोकांचे जागा घेऊन भूसंपादन केलेल्या असून त्या लोकांना पैसे अद्याप दिलेले नाही.

सौ. लता दलाल : उपसंचालक नगररचना यांनी केलेला खुलासा बरोबर वाटत नाही. बऱ्याच लोकांनी जागा दिलेल्या असून अद्याप त्यांना त्याचा मोबदला दिलेला नाही.

श्री. गजानन बारवाल : विकासनगर येथील जागा १० वर्षापासून घेऊन तेथील लोकांना पैसे दिले नाही.

मा. महापौर : प्रस्ताव मंजूर करण्यात येतो. यापुढे प्रस्ताव सादर करतांना सविस्तर माहितीसह सभगृहात ठेवावा. कुणी तक्रार करणार नाही यांची संबंधित अधिकारी यांनी दक्षता घ्यावी. ज्याचे जागा भूसंपादन केलेल्या आहेत व अशा लोकांना पैसे मिळालेले नसतील त्यांना मोबदला देण्याची कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहर प्रारुप विकास योजनेनुसार आरक्षण क्र. ८७ प्राथमिक शाळा या आरक्षणाने फुट क्षेत्र. म.प्रा. व ना. र. अ. १९६६ चे कलम ४९ अन्वये खरेदी सूचना दिल्याने सदर मिळकतीचे रितसर भूसंपादन करणेसाठी तसेच भूसंपादनासाठी लागणाऱ्या खर्चासह भसंपादन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७५/४ :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी पस्ताव सादर केला आहे की, एन-११ के २८ ते ४२, एन-११ एफ १८ ते २२ एकूण गाळे २८२ येथील नागरिकांनी वरील घरांना १९८५ ते १९९३ पर्यंत पाणी येत नव्हते. म्हणून वरील कालावधीची पाणीपट्टी कमी करण्याबाबत विनंती केलेली आहे.

सप्टेंबर १९८५ ते मार्च १९९३ या कालावधीची थकबाकी एकूण रक्कम रुपये ३,५५,३२० एवेढी आहे. सदरील विनंती अर्ज ऑगस्ट १९९५ मध्ये मुख्य कार्यालयास सादर केलेला आढळून आला. सन १९८५ पासून हा पाणी पुरवठा सिडको कडून महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झाला व तेंव्हा पासून महानगरपालिका सिडको भागास

पाणी पुरवठा करीत आहे. नागरिकांनी पाणीपुरवठा झालाचा नाही अशा प्रकारे महानगरपालिकाकडे तगादा लावला आहे.

विभागीय अधिकारी, जलगृह अभियंता-२ (सिडको) यांच्या शिफारशीनुसार संपूर्ण संचिकेचे व वेळोवेळी नागरिकांनी दिलेल्या अर्जाचाी पडताळणी करून मुख्य लेखाधिकारी व मुख्य लेखापरिक्षक यांचे मार्फत लेखा परिक्षण केले असता पाणीपट्टी माफ करता येणार नाही असे मत प्रगट केलेले आहे.

तरी प्रकरण अंतिम निर्णयास्तव सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**संवाद :**

श्री. गजानन बारवाल : सिडको हडकोतील नागरिकांच्या तक्रारी आलेल्या असतील तर तशी प्रशासनाने कार्यवाही करावी.

श्री. रशिदखॉन (मामू) : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे त्या भागातील लोकांची पाणीपट्टी माफ करण्याचे अधिकार सर्वसाधारण सभेला आहे काय? निर्णय घेतल्यास त्याची अंमलबजावणी होईल काय? प्रशासनाने खुलासा करावा.

मा. महापौर : या कालावधीत पाणी मिळाले नाही असे तेथील नागरिकांचे म्हणणे आहे पणीच दिलेले नसेल तर माफ करण्यास हरकत नसावी.

श्री. काशिनाथ कोकाटे : पाणीपट्टी माफ व्हावी या बाबत प्रशासनाकडे तेथील नोकांनी अनेक वेळा तक्रारी दिलेल्या आहेत. परंतु प्रशासन मार्फत अद्यापर्यंत काहीही कार्यवाही झालेली नाही. २२ एम.एल.डी. पाणी लागते व यात एकूण २० हजार नळ कनेक्शन आहेत. २० ते २२ एम.एल.डी. पाणी मिळते. तेथील नागरिकांना २५ ते ९३ पर्यंत अद्याप पाणी पुरवठा झालेला नाही. एन-७ भागातील दुर्बल घटकातील जी घरे आहेत अशांना स्टॅण्डपोस्टद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत होता. १९८५ नंतर पाणीपुरवठ्याचा कारभार महानगरपालिकाकडे आलेला असून ९७ नंतर नवीन पाईपलाईन दुर्बलघटाकासाठी टाकण्यात आलेली आहे. तेंव्हा पासून पाणीपट्टी आकारण्यात यावी अशी विनंती आहे. १९९६ पर्यंत या लोकांना पाणीच दिलेले नव्हते या संदर्भात नागरिकांनी निदर्शनेही केलेली होती. तसेच दि. १२-०१-२००० च्या स्थायी समितीमध्ये १९९६ पर्यंतची यात एम-२ जे-१ जे-२ भागातील पाणीपट्टी माफ करण्यात संदर्भात निर्णय झालेला असून त्याच धरतीवर आजच्या सभेत निर्णय घेण्यात यावा. अशी विनंती आहे.

श्री. प्रदिप जैस्वाल : स. सदस्य सौ. मुंडलिक यांना झोन अधिकारी यांनी दि. २२-०३-९६ ला त्यांनी दिलेल्या पत्रानुसार खुलासा केला की, एन-११ एम एन-११, एफ, ए, ई, घराची ८५-९० या कालावधीतील पाणीपट्टी बील माफ करण्यात येईल व ९०-९६ पर्यंत बील भरावे असे झोन अधिकारी यांनी स. सदस्य तसेच येथील नागरिकांना कळविलेले आहे. याचा अर्थ येथील लोकांना ८५-९० या कालावधीत पाणी मिळाले नाही. ९१-९६ पर्यंतची बीले भरण्यास येथील रहिवाशी तयार होते. तरी या भागातील लोकांना ८५-९० या कालावधीत जर पाणीच दिलेले नाही तर त्यांना आकारण्यात आलेले पाणीपट्टी बिले माफ करण्यात यावी.

श्री. गजानन बारवाल : याच प्रस्तावाच्या अनुषंगाने बोलत आहे. ज्यांना पाणीच मिळालेले नाही त्याची पाणीपट्टी माफ करण्यात यावी. पाईपलाईन टाकण्याच्या कालावधीतीपासून बिले आकारण्यात यावी.

श्री. अफसरखॉन : पाणीपट्टी माफ करता येणार नाही असे प्रशानाने मत मांडलेले आहे. माफ करावयाची असेल तर संपूर्ण शहराचाच विचार करणार काय?

श्री. गजानन बारवाल : स. सदस्य श्री. विठ्ठल जाधव यांच्या वर्गामध्ये एक दिवसाआड पाणी देण्यात येते तेथील लोकांनी अशी
मागणी केली की, आम्हाला एक वर्षा ऐवजी ७ महिन्याचे बील आकारण्यात यावे.

मा. महापौर : या संदर्भात सिडको हडको भागातील बऱ्याच नागरिकांनी तक्रारी केलेल्या होत्या. ८५-९० या काळात पाणी मिळत नाही. या संदर्भात तेथील नागरिकांनी निदर्शने ही प्रशासनाकडे केलेली आहे. त्यानंतर सुध्दा बिले आकारण्यात आली हा प्रश्न संपूर्ण सिडकोचा नसुन २४० घरांचा प्रश्न आहे. मा. भोगे साहेब असतांना सुध्दा हा प्रश्न उपस्थित केलेला होता. स्वत: तत्कालीन मा. आयुक्त, श्री. भोगे साहेबांनी सुध्दा तपासणी करुन संचिकेमध्ये रिमार्क केले होते. जर पाणी मिळत नसेल तर, पाणीपट्टी माफ करण्यात येईल. वसुली करण्यात येऊ नये असे तत्कालीन मा. आयुक्त भोगे साहेबांनी सुध्दा सागितले होते. ८५-९० या कालामध्ये ज्या नागरिकांनी पाणी मिळाले नाही. याची तपासणी करुन पाणी पट्टी माफ करण्यात येते आणि ज्या तक्रारी आलेल्या असतील अशा लोकांचाही यात सहभाग करुन घ्यावा व स्टॅण्ड पोस्टची जी बीले हाती ती माफ करण्यात यावी हा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सन १९८५ चे १९९३ या काळात एन ११ के २८ ते ४२, एन-११ एफ-१८ ते २२ या एकूण २८२ गाळेधारकांना वरील कालावधीत पाणी पुरवठा झाला नसल्याने या सन १९९५ ते १९९० या कालावधीची पाणीपट्टी संबंधित गाळे धारकांना माफ करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

याशिवाय सन १९९५-९० या काळात या भागातील नागरिकांचे पाणी न मिळाल्याबाबत अर्ज आलेले असतील अशा अर्जाचाही यात समावेश करुन अशा गाळेधारकांना माफ करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## पुरवणी विषय

**विषय क्र. १७६/१ :**

महानगरपालिका उद्यान " लालबहादूर शास्त्री उद्यान " येथे शास्त्रीचा अर्धाकृती पुतळा बसविणे.

सुचक : सौ. राधाबाई तळेकर

अनुमोदक : श्री. नरसिंग ढगे, श्री. कचरु नवपुते, श्री. विकास जैन, सौ. लता दलाल.

श्री. प्रदिप जैस्वाल : पुरवणी विषय पत्रिकेवरील सर्व विषय संस्थेला जागा देण्याबाबतचे असून, या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात येऊ नये. पुढील बैठकीमध्ये सादर करण्यात यावे अशी विनंती आहे.

मा. महापौर : पुरवणी विषय पत्रिकेवरील सर्व विषय प्रशासनामार्फत पुढील सर्वसाधारण सभेमध्ये सादर करावे.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव प्रशासनातर्फे सभागृहासमोर मांडण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १७७/२ :**

जवाहर कॉलनी येथे जवाहर गृहनिर्माण संस्थेच्या मालकीचे मोकळी जागा महानगरपालिका विकसित करण्यास १५ वर्षापुर्वी दिली होती. परंतु संरक्षित भिंती व्यतिरिक्त येथे काहीही करण्यात आलेले नाही.

करीता सदरील जागा तेथील सेवानिवृत्त संघटनेचे लोक सार्वजनिक उपक्रमांसाठी व जनहितासाठी ती जागा विकसित करण्यासाठी इच्छुक आहेत करीता सदरील जागा सेवानिवृत्त संघटनेस देण्यात यावी, करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : सौ. राधाबाई तळेकर
अनुमोदक : सौ. सविता आव्हाड, श्री. व्ही. व्ही. देशमुख, सो. लोखंडे रुख्मणाबाई

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव प्रशासनातर्फे सभागृहासमोर मांडण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १७८/३ :**

सार्थक बहुउद्देशीय कल्याण संस्था, औरंगाबाद ही संस्था नोंदणीकृत असून सामाजिक कार्य करणारी संस्था आहे. सदरच्या संस्थेची स्वत:च्या मालकीची जागा शहरामध्ये नाही. करीता सदरच्या संस्थेस बसैय्येनगरच्या पूर्व बाजूस असलेली अनुज्ञेय क्षेत्रफळाची व्यकंटेशनगर येथील महानगरपालिकेची खुली जागा लिजवर देणे बाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. प्रफुल्ल मालाणी
अनुमोदक : श्री. गौतम लांडगे, डॉ. कु. माया लाडवाणी

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव प्रशासनातर्फे सभागृहासमोर मांडण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १७९/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दृष्टी प्रतिष्ठाण ही नोंदणीकृत संस्था असून, सामाजिक कार्य करणाची संस्था आहे. या संस्थेस समाज कार्य करण्याकरीता तसेच स्वत:चे कार्यालयासाठी शहरामध्ये संस्थेच्या मालकीची जागा नाही. संस्थेची उद्दीष्टे व सामाजिक कार्य लक्षात घेऊन या संस्थेस महानगरपालिकेच्या समर्थनगर येथील रॉयल हेरीटेज अपार्टमेंटच्या बाजूला असलेली अनुज्ञेच क्षेत्रफळाची जागा लिजवर देणे बाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. प्रदिप जैस्वाल
अनुमोदक : डॉ. कु. माया लाडवाणी

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव प्रशासनातर्फे सभागृहासमोर मांडण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १८०/५ :**

" जागृती महिला मंडळ " औरंगाबाद हे संस्थेकडून महिलांना प्रशिक्षण देणे बालवर्ग चालविणे इत्यादी कामे करण्यात येतात मात्र संस्थेला स्वतःची जागा नसल्याने सदरील कामे करण्यास अडचण येते तरी या संस्थेची कामे चांगल्यारितीने करण्यासाठी या संस्थेला औरंगपुरा येथील नाल्याची जमीन भाडे पट्टयावर देण्यास प्रस्ताव विचारार्थ सादर. नोंदणी क्र. महा/१७६/९५/एफ/३२८६ ( औ.बाद ) दिनांक. १२-०९-९५

सुचक : सौ. नुरजहॉ बेगम

अनुमोदक : सौ. साजेदा बेगम

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव प्रशासनातर्फे सभागृहासमोर मांडण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १८१/६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शाहबाजार चाऊस कॉलनी येथील नालावर गरीब लोकांसाठी एक शादी खाना बांधण्यात यावे. या संदर्भात नाला " एकवायर " ( ताब्यात ) करुन त्यावर शादीखाना बांधून द्यावा, करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्रीमती मोहसिना बिलकीस

अनुमोदक : श्री. गौतम खरात

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव प्रशासनातर्फे सभागृहासमोर मांडण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १८२/७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, ज्योतीनगर येथे नुकतेच बॅडमिंटन हॉलचे उद्‌घाटन झालेले आहे. महानगरपालिकेने यापूर्वीच महापालिकेच्या अशा इमारतीत स्थानिक नागरिकांच्या नोंदणीकृत संस्थाना चालविण्यास देण्याचा निर्णय घेतलेला आहे. ज्योतीनगर भागातील ज्योतीनगर डेव्हलपमेंट फाऊडेंशन ही नोंदणीकृत संस्था याच भागातील आहे. सदरील बॅडमिंटन हॉल हा या संस्थेस चालविण्यास देण्यात यावा करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर

अनुमोदक : श्री. महादेव सुर्यवंशी

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव प्रशासनातर्फे सभागृहासमोर मांडण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १८३/८ :**

महानगरपालिका नविन बांधण्यात आलेल्या प्रसुतीगृह न्यु कॉलनी रोशन गेट सदरील कॉलनीमध्ये श्री. इसाकमिया पिता मुन्नुमिया यांची स्वतःची जागा सिटी सर्वे नं. १२०८९ सिट नं. ३२९ रोड मध्ये गेलेली आहे. सदरील जागेच्या मोबदला देण्याकरीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. मोहसीना अहमद

अनुमोदक : श्रीमती अल्का पाटील, श्री. हमीदउल्लीन ताबा

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव प्रशासनातर्फे सभागृहासमोर मांडण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १८४/९ :**

महानगरपालिका वाचनालय कैसर कॉलनी रोडला स्व. श्रीमती सलीमाबी मोहमद चाऊस रोड नाव देणे तसेच त्याच्या शेजारी रोडला स्वत. मेहराज अहमदखॉन अलहाज गुला अहमद खॉन खातीवर रोड असे नांव देण्याकरीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. मोहसीन अहमद
अनुमोदक : श्रीमती अल्का पाटील, श्री. हमीदद्दीन ताबा

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव प्रशासनातर्फे सभागृहासमोर मांडण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १८५/१० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, रुग्ण श्रीमती मोहरुन्नीसा बेगम भ्र वाजेद खॉन रा. सिल्कमिल कॉलनी औरंगाबाद यांना ब्रेनटयुमर झालेला असून, त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाक्याची आहे, महानगरपालिका स्वेच्छा निधी नियमावली प्रमाणे हृदयरोगी हयांना अर्थसाहय देण्याची तरतुद आहे. तरी सदर नियमावलीत सुट देवून विशेष बाब म्हणून सदर रुग्णास रुपये १५ हजार पर्यंत स. सदस्यांच्या स्वेच्छा निधीमधून अर्थ साहय करण्यास नियमात शिथिलता देवून प्रस्ताव मंजुरीसाठी सादर.

सुचक : श्री. मो. विखारोद्वीन
अनुमोदक : श्री. हमीदोद्वीन ताबा, श्री. अजीजखॉ गणीखॉ, श्री. तुपे त्र्यबंक गणपतराव

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव प्रशासनातर्फे सभागृहासमोर मांडण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १८६/११ :**

मोहल्ला बायजीपुरा भागात नोंदणीकृत बालाजी मंदिर मोठया प्रमाणावर जागा असून या नोंदणीकृत संस्थेची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असल्याने जागेचा विकास करणे नोंदणीकृत संस्थेस शक्य होत नाही. अशा परिस्थितीत या जागेचा विकास व्हावा या दृष्टीने मनपातर्फे या मंदिराच्या विकासाचे दृष्टीने संस्थेच्या जागेस संरक्षित भिंत विदयुत व्यवस्था आणि उद्यान विकसीत केल्यास या भागातील जनतेला त्याचा योग्य तो उपयोग घेता येईल. मंदिराच्या जागेचा विकास करण्यासाठी ट्रस्टचे अध्यक्ष यांनी आवश्यक ते नाहरकत प्रमाणपत्रही दिले आहे. ( सोबत मुल पत्र ) प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : सौ. नुरजहॉ बेगम
अनुमोदक : डॉ. कु. माया लाडवाणी

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव प्रशासनातर्फे सभागृहासमोर मांडण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १८७/१२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकाचे शाखा अभियंता श्री. के. आर. कुलकर्णी यांना महानगरपालिकाचे कामाची देखरेख करीत असतांना दि. २५-०९-९६ रोजी अपघात होऊन त्यांच्या उपचारासाठी झालेल्या खर्चापैकी ऐंशी टक्के रक्कम देण्यात आली आहे. औषध उपचारासाठी झालेल्या खर्चापैकी ऐंशी टक्के रक्कम परतावा म्हणून अदा करण्याचा नियम असला तरी संबंधित शाखा अभियंता हे महानगरपालिकेच्या कामाची देखरेख करीत असतांना अपघात होऊन जख्मी झाले आहेत. ही बाब लक्षात घेता शाखा अभियंता श्री. के. आर. कुलकर्णी यांना उपचारासाठी झालेल्या खर्चाची १००% रक्कम अदा करण्यात यावी. तसेच यापुढे बहुतांश कर्मचारी हे महानगरपालिकेच्या कामासाठी शहराचे विविध भागात वेळोवेळी नियमतपणे जात असतात अशा कर्मचाऱ्यांना महानगरपालिका कामाची देखरेख करीत असतांना अपघात झाल्यास या अपघाताच्या उपचारासाठी येणाऱ्या खर्चाची १००% रक्कम अदा करण्यात यावी. प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : श्री. नरसिंग ढगे
अनुमोदक : श्री. संजय केनेकर
श्री. संजय जोशी

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव प्रशासनातर्फे सभागृहासमोर मांडण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १८८/१३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सौ. वैशाली देविदास चौधरी र. एन ११ हडको यांचा अपघात होऊन हात व चेहरा भाजला गेला आहे. त्यांच्यावर उपचारासाठी रुपये ६०,०००/- ( साठ हजार ) खर्च होणार आहे. त्याची आर्थिक परिस्थिती नाजुक आहे. करीता ज्या नगरसेवकांच्या जे काही स्वेच्छा निधी शिल्लक आहे. त्यातून रुपये २५,०००/- हजार विशेष बाबत म्हणून मंजुर करावे. प्रस्ताव विचारार्थ सादद.

सुचक : श्री. राजू इंगळे, श्री. राजकुमार बचाटे
अनुमोदक : सौ. विमलताई मुंडलीक, श्री. गांगवे मामा.
दिनांक : २०-०१-२०००

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सौ. वैशाली देविदास चौधरी एन -११ हडको यांना उपचारासाठी नगरसेवक स्वेच्छानिधीतून रु. २५,०००/- ची आर्थिक मदत देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

श्री. प्रदिप जैस्वाल : मागील बैठकीत चर्चा झाली होती. जकात बाबत.
अहवाल दाखल करणार असे ठरले होते. त्या चर्चेप्रमाणे जकात बाबतचा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात यावा.

श्री. बारवाल गजानन : जकात बाबत आता सविस्तर चर्चा होत आहे. गेल्या तीन मिटींगपासून जकात बाबत चर्चा होते.

श्री. जैस्वाल प्रदिप, श्री. बारवाल गजानन : मागील सर्वसाधारण सभेत उपमहापौर यांनी दिलेल्या जकात संदर्भातील निवेदनानुसार चर्चा होऊन कमिटी नेमून आजच्या बैठकीत अहवाल सादर करण्यात येणार होता त्या संबंधी माहिती दयावी.

श्री. अफसरखान : लक्ष्मी एजन्सी कडून योग्य तो जकात वसुल करण्यात आलेली नव्हती या संदर्भात मागील बैठकीत मी माहिती मागविली होती. त्या बाबत आपण संबंधित अधिकारी श्री. गिरी व त्या विभागातील ३ वर्षाहून अधिक सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत बदली करण्याचा निर्णय दिलेला होता. अदयाप पर्यंत प्रशासनाने त्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या का केलेल्या नाही. याची माहिती देण्यात यावी तसेच लक्ष्मी उदयोजक मालकाकडून ७५ लाखाची मशिनरी असतांना त्यांचे मुल्यांकन १५ लाख रुपये लावून जकात वसुली करण्यात आली याचे कारण काय संबंधित अधिकाऱ्यांकडून याबाबत खुलासा घ्यावा यात मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला दिसून येतो.

श्री. गजानन बारवाल : विरोधी पक्ष नेता यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्यात गंभीर असा स्पष्ट आरोप केलेला आहे तो सत्य आहे काय याचा खुलासा देण्यात यावा.

मा. महापौर : जकात अधिक्षक यांनी लक्ष्मी उदयोजक यांच्या मशिनरी संदर्भात किती जकात वसुली केली त्याची माहिती व सदर मशीनरीच मुल्यांकन काय होते सवितस्तर माहिती दयावी.

जकात अधिक्षक : लक्ष्मी उदयोग यांचा चार गाडयामध्य माल ( मशीनरी ) जकात नाक्यावर आलेला होता प्रत्येक वाहनासोबत बिल होते. बील झेरॉक्स केलेले होते. प्रत्येकाचे बिलाप्रमाणे मुल्य रु. १ कोटी पर्यंत जाते. मुळ बील पाहून मा. आयुक्तांची परवागनी घेवूनच जकात काढली.

श्री. अफसरखान : मशिनरीची किंमत एकूण ७५ लाख असतांना ती किंमत कमी करुन जकात आकारण्याचे कारण काय ?

श्री. बारवाल गजानन : संबंधित केस मा. उपआयुक्तांकडे येईपर्यंत जकात अधिक्षक काय करत होते. त्या मशिनरीची नेमकी किंमत काय याची माहिती जकात अधिक्षक यांना नसावी का? ७५ लाखाहून १५ लाख किंमत लावून जकात वसुल करणे योग्य नाही. मा. आयुक्तांच्या परवानगीन केले हे काय प्रकरण आहे समजत नाही.

जकात अधिक्षक : संबंधितास त्या मशिनरीचे व्हॅल्यूशन सांगितल्यानंतर तेवढा कर भरण्यास नकार दिल्यामुळे प्रकरण मा. आयुक्ताकडे संबंधिताने विनंती अर्ज केला व त्याच्या अर्जानुसार शासन मुल्यांकन करुन १५ लाखाचे मशिनरीज दाखविल्याने त्याप्रमाणे जकात वसुल करण्यात आलेली आहे.

श्री. अफसरखान : संबंधितास व्यक्तीला मुल्यांकन सांगितल्यानंतर संबंधित अधिकारी यांनी त्या व्यक्तीला प्रशासनाकडे विनंती करावयास लावली व ७५ लाखाचे मुल्यांकनावर १५ लाखाचे मुल्यांकन लावून जकात वसुल केलेली आहे. या प्रकरणात १.२० लाखाचा भ्रष्टाचार झालेला आहे. याप्रमाणेच ९७-९८ सालचे किमतीचे प्लाऊड बाबत त्या वेळच्या रेट प्रमाणे जकात आकारलेली असून, त्यातही भ्रष्टाचार झालेला आहे.

श्री. महादेव सुर्यवंशी : चार गाडयामध्ये माल आणलेला होता. प्रत्येक गाडीसाठी एक झेरॉक्स प्रत १ कोटी रुपयाप्रमाणे मुल्यांकन केलेली होती. असा अधिकारी यांनी खुलासा केलेला आहे. जकात आकारणी करतांना चार गाडयातील

प्रत्येक मशीनरीचे मुल्यांकन काढण्यात आलेले नाही काय? वरीष्ठ अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार जकात कमी करता येते काय? चार गाडयातील मालाची किंमत किती होते याचा खुलासा व्हावयाला पाहिजे. किती टक्के जकात आकरली जाते. ७५ लाखाची आकारणी केल्यानुसार जकात का वसुल करण्यात आली नाही. त्याचप्रमाणे विरोधी पक्ष नेता यांनी उघडपणे १.२० लाखाचा भ्रष्टाचाराचा आरोप केलेला आहे. उदया कुणी म्हणेल माझ्या मालाची किंमत एवढीच आहे तर त्याप्रमाणे त्यांच्या विनंती अर्जानुसार आपण जकात कमी लावणार काय? असे होत असेल तर योग्य नाही आपण जे उद्दीष्ट ठेवलेले आहेत ते पुर्ण होणार नाही. याबाबतचा सविस्तर खुलासा करण्यात यावा.

जकात अधिक्षक : सविस्तर खुलासा करण्यासाठी संपूर्ण संचिकातील कागदपत्राची पाहणी करुनच खुलासा देत येईल.

श्री. महादेव सुर्यवंशी : १५ मिनिटासाठी सभा तहकुब करुन सविस्तर माहिती मागवून घ्यावी.

श्री. प्रदिप जैस्वाल : चार गाडयामध्ये माल होता एकाच मशीनचे वेगवेगळे पार्ट करुन एकाच गाडीमध्ये बसत नसल्यामुळे वेगेवगळया गाडयामध्ये आणलेला होता. प्रत्येक गाडीमागे १ कोटीचे मुल्यांकन पावती असतांना त्यावर नियमाप्रमाणे जकात वसुल व्हावयला पाहिजे होती पण ७५ लाखाचे मुल्यांकन कशाच्या आधारावर संबंधित अधिकारी यांनी लावले त्याच प्रमाणे ७५ लाख रुपये मुल्यांकन लावल्यानंतर संबंधितास मान्य न झाल्यामुळे मा. आयुक्ताकडे त्यांनी अपील केले. त्यानुसार चर्चा होऊन उप आयुक्त किंवा जकात अधिक्षक यांनी ७५ लाखाच्या ऐवजी १५ लाखाचे मुल्यांकन करण्यात आले कशाच्या आधारावर १५ लाखाचे मुल्यांकन केले यांचा खुलासा व्हावा.

जकात अधिक्षक : चार गाडयामध्ये माल आयात झाला होता ७५ लाखाचे १५ लाख मुल्यांकन गव्हरमेंट व्हॅल्यू करण्यात आल्यानंतर जकात आकारण्यात आलेली आहे. पाच दिवस गाडया उभ्या राहिल्या, प्रकरणात अंतिम निर्णय झाल्यावर जकात वसुली केली.

श्री. महादेव सुर्यवंशी : १ कोटी रु. मुल्यांकनाच्या मशीनरीज वर २ १/२ ( अडीच टक्के ) प्रमाणे २.५० लाख रुपये जकात जमा झाली असती एका गाडीवर २० लाखाचा माला प्रमाणे कमीत कमी ८० लाखाच्या मुल्यांकनावर जकात आकारावयास पाहिजे होती. १.२० लाखाचा भ्रष्टाचाराचा विरोधी पक्ष नेता यंनी आरोप केलेला आहे. याचा सविस्तर खुलासा करावा.

जकात अधिक्षक : संबंधिताने ७५ लाखाचे मुल्यांकनावर जकात आकारली म्हणून जकात भरण्यास तयार नव्हते म्हणून मा. उपआयुक्ताकडे त्यांनी मुल्यांकन कमी करण्यास विनंती केली व शासन मुल्यांकन १५ लाखाचे दाखविल्यावरुन त्यानुसार जकात आकारण्यात आलेली आहे.

सौ. लता दलाल : चार गाडयावर व्हावायास पाहिजे. नेमका जकात कशावर लावण्यात आली. जकात अधिक्षक यांच्यावर १.२० लाखचा आरोप केलेला आहे. योग्य खुलासा व्हावा.

जकात अधिक्षक : बील एक होते ४ गाडयामध्ये ( मशीन ) माल आलेला होता. सगळया बीलाची एकत्र किंमत काढली व ७५ लाख रुपये मालाची किंमत होते असे संबंधितास सांगितल्यानंतर एवढी किंमत या मालावर होऊ शकत नाही.

म्हणून मा. आयुक्त यांच्या निदर्शनास ही बाब आणून देऊन मा. उप आयुक्त यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन गर्व्हमेंट व्हॅल्युनुसार त्या मालाची किंमत काढली व त्या प्रमाणे जकात आकारण्यात आलेली या कारणामुळे सदर गाडया ६ दिवस नाक्यावर उभ्या होत्या.

सौ. लता दलाल : आपण काढलेली किंमत जास्त होती असे संबंधितास वाटतो काय? की संबंधिताने आणलेली बिले चुकीची होती असे आपणास वाटले. आपण काढलेली ७५ लाखाचे किंमत कोणत्या बेसीसवर काढली.

जकात अधिक्षक : आपण काढलेली मुल्यांकन ७५ लाखाचे संबंधितास चुकीचे वाटले व एवढी किंमती होत नाही असे सांगितल्यावरुन मा. उपआयुक्तांनी पाहणी करुन शासन किंमत आकारणी झाल्यानंतर जकात आकारली गेली.

श्री. महादेव सुर्यवंशी : यात जकात अधिक्षक यांनी खुलासा केलेला असून, समाधानकारक वाटत नाही. मा. उपआयुक्त यांनी खुलासा करावा.

मा. महापौर : उपआयुक्त ( प्र. ) यांनी खुलासा करावा.

उप आयुक्त ( प्र. ) : लक्ष्मी उदयोगाच्या मशीनरी आलेल्या होत्या जकात अधिक्षक यांनी त्यांना एकूण किंमत सांगितल्यानंतर संबंधित मशीन मालकाने सांगितले की, ७५ लाख रुपये किंमत होऊ शकत नाही. त्याची किंमत सुमारे १ कोटी होईल. असे त्यांना दाखविण्यात आले नंतर आपल्या संबंधित अधिकाऱ्याने ७५ लाखाची किंमत सांगून जकात आकारण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी सांगितले एवढी किंमत होऊ शकत नाही. म्हणून त्यांनी मा. आयुक्तांकडे अर्ज केला की, आमच्या कडील पावत्या हया डबल प्रती झालेल्या असून, याबाबत आपण पडताळणी करावी गाडया कुणी आडवतील म्हणून आम्ही त्याप्रती प्रत्येक गाडीसोबत ठेवलेल्या होत्या असे संबंधितंनी सांगितले. त्यांच्या पावतीवरील किंमत व आपण दाखविलेली किंमत यात खूपच तफावत येत असल्याने सदर मशीनची किंमत नेमकी किती आहे. यासाठी गव्हरमेंट व्हल्युअर कडून व्हॅल्युअशेन केल्यानंतर त्यांची किंमत १५ लाख असल्याचे कळविल्यानुसार मा. आयुक्तांनी मंजुरी दिली व त्यावर जकात आकारणी करण्यात आली.

श्री. अजीज खान : जकात अधिक्षक यांनी त्या व्यक्तीला मा. आयुक्तांकडे यावयाचे सांगितले व या प्रकरणामध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला असून, ७५ लाखाची किंमत संबंधित अधिकाऱ्याने दाखविलेली असतांना फक्त १५ लाखाची मशिनरी आहे असे निष्पन्न केले. यात मोठया प्रमाणात तफावत झालेली दिसून येते.

मा. महापौर : मागील बैठकीत जकात विभागावर चर्चा होऊन चौकशीसाठी एक कमीटी नेमण्यात आलेली होती. त्या कमीटीने या सभागृहासमोर अहवाल सादर केलेला आहे व अहवालातील जे नमुद केलेले आहेत. त्याची प्रशासनाने तात्काळ अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. तसेच आजच्या या मशीनरीच्या बाबतीत जकात कमी आकारण्या संदर्भात ४-५ दिवसांनी पुन्हा सभा घेण्यात येणार आहे. त्या बैठकीपर्यंत या प्रकरणात पाच पदाधिकाऱ्यांची कमीटी नेमून त्यात मुख्यलेखाधिकारी राहतील व सदर मशीनची प्रत्यक्ष त्या ठिकाणी जाऊन योग्य किंमत काय आहे याची पडताळणी करुन यात उपआयुक्त जकात अधिक्षक कुणी जरी दोषी असेल तर, त्यांच्यावर

निलंबणाची कर्यवाही करण्यात यईल. जो अहवाल सादर करण्यात आलेला आहे त्यात खालील प्रमाणे निर्णय नमुद केलेले आहे.

## जकात वसुली बाबतचा अहवाल

जकात वसुली बाबत सन १९९९-२००० या आर्थिक वर्षातील आढावा घेण्यात आला असता जकात वसुलीत फार मोठया प्रमाणात घट निर्माण झालेली दिसून येते. तद्ववतच जकात वसुलीच्या रक्कमेवर महानगरपालिकेची आर्थिक उलाढाल अललंबून असल्यामुळे जकात विभागाच्या कार्यपध्दतीत खालील प्रमाणे बदल करणे आवश्यक आहे.

१) जकात विभागात जे कर्मचारी / अधिकारी तीन वर्षापेक्षा जास्त काळ कार्यरत आहेत अशा कर्मचाऱ्यांना त्वरीत बदल्या करण्यात याव्यात. जकात अधिक्षक याची त्वरीत बदली करणे.

२) प्रत्येक येणाऱ्या गाडयांची ओपन डिलिव्हरी चालु करण्यात यावा.

३) जकात नाक्यांची रेंज वाढविण्यात यावी.

४) जकातीचे खाजगीकरण करण्यात यावे.

उपरोक्त प्रमाणे बदल केल्यास जकात वसुलीमध्ये उल्लेखनीय वाढ होऊ शकते.

| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
|---|---|---|---|---|
| विरोधी पक्षनेता | सभागृहनेता | सभापती | उपमहापौर | महापौर |

## औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

मा. महापौर : वरील चार मुद्दे कमीटीने ( समितीने ) सादर केलेले असून, प्रशासनाने तात्काळ अंमलबजावणी करावी आणि जो पर्यंत पाच पदाधिकारी तसेच मुख्यलेखाधिकारी या सहा जणांची कमीटी स्थापन केलेली आहे ही कमीटी प्रत्यक्ष त्या मशिनची पाहणी करुन किंमत काढले व याची चौकशी पूर्ण होईपर्यंत श्री. गिरी, जकात अधिक्षक यांची बदली करण्यात येऊ नये. कारण चौकशीची माहिती घेण्यासाठी श्री. गिरी यांची आवश्यकता भासणार आहे.

श्री. रशिद खॉन ( मामू ) : जकातीचे खाजगीकरण करावयाचे असेल तर, याबाबत सभागृहात चर्चा होणे आवश्यक आहे जेथे जेथे खाजगीकरण झाले तेथे नुकसान झालेले आहे.

श्री. गजानन बारवाल : आपण ठरवलेल्या उद्दीष्ठाचा २०% जास्तीची जकात वसुली मिळत असेल तर खाजगीकरण करण्यात यावे.

श्री. अ. रशिदखॉन मामू : शासनास अहवाल पाठवावा. खाजगीकरणास माझा विरोध आहे.

मा. महापौर : मागील बैठकीत या विषयावर चर्चा झालेली होती त्या बैठकीतही आपण जकातीच्या एकूण उद्दीष्टापैकी २०% रक्कम कुणी जास्तीची देत असेल तर, खाजगीकरण करण्यास हरकत नाही. खाजगीकरण करतांना शासनाने पण यात नाव आहेत.

तात्काळच याबाबत आपणास निर्णय घेता येणार नाही. या संदर्भात अगोदर सभागृहास चर्चा होईल. नंतरच निर्णय होईल.

सौ. नुरजहॉ बेगम : जकात विभागातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या बाबत कमीटीने दिलेल्या अहवालावर आजच त्या कर्मचाऱ्यांच्या दिल्या करण्यात याव्यात. असा आताच निर्णय सभागृहाने घ्यावा अशी विनंती आहे.

श्री. अफसरखॉन : श्री. गिरी यांची तात्काळ बदली करण्यात यावी असे आदेश आपण दयावे.

मा. महापौर : ठिक आहे. समितीने दिलेल्या अहवालानुसार सर्व मुद्दयावर प्रशासनाने तात्काळ अंमलबजावणी करावी.

या बरोबरच जण गण मण या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव, | मा. महापौर, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक ०३-०२-२००० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त गुरुवार दिनांक. ०३-०२-२००० रोजी मा. महापौर श्री. सुदाम रामदास सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील" कै. प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहात येथे दुपारी ३.०० वाजता " वंदे मातरम् " या गिताने सुरु झली. सभेला अधिकारी वर्ग तसेच खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | स. स. श्री. संजय किसनराव केनेकर | मा. उपमहापौर |
| २. | स. स. श्री. ढगे नरसिंग मुरलीधर | स.सभासद |
| ३. | स. स. श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलीकराव | -//- |
| ४. | स. स. श्री. अफसरखॉन यासीनखॉन | -//- |
| ५. | स. स. सौ. लोखंडे रुख्मणबाई खंडेराव | -//- |
| ६. | स. स. श्री. विधाते प्रभाकर सिताराम | -//- |
| ७. | स. स. सौ. साजेदा बेगम | -//- |
| ८. | स. स. श्री. गौतम भागाजी खरात | -//- |
| ९. | स. स. सौ. रजनी रमेश जोशी | -//- |
| १०. | स. स. सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलीक | -//- |
| ११. | स. स. सौ. शिलाबाई सिताराम गुंजाळे | -//- |
| १२. | स. स. श्री. लांडगे गौतम लिंबाजी | -//- |
| १३. | स. स. श्री. भालेराव अभिमन्यू रामभाऊ | -//- |
| १४. | स. स. श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | -//- |
| १५. | स. स. श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | -//- |
| १६. | स. स. सौ. पद्मा बाबुराव शिंदे | -//- |
| १७. | स. स. श्री. टाकळकर सुभाष भिकाजी | -//- |
| १८. | स. स. श्री. मालानी प्रफुल्ल लालचंद | -//- |
| १९. | स. स. श्रीमती पांचाळ चंपाबाई | -//- |
| २०. | स. स. सौ. विसपुते धनश्री अशोक | -//- |
| २१. | स. स. श्री. फजलऊल्लाखान अजमतऊल्लाखान | -//- |
| २२. | स. स. श्री. अजीजखॉ गणीखॉ | -//- |
| २३. | स. स. श्रीमती आबेदा बेगम मो. मुस्तफा | -//- |
| २४. | स. स. श्री. महमंद मुश्ताक अहेमद | -//- |
| २५. | स. स. सौ. नुरजहॉ बेगम अ. रहेमान खॉन | -//- |
| २६. | स. स. श्री. देशमुख वसंत विनायक | -//- |
| २७. | स. स. श्री. हाजी मोहसीन अहेमद हाजी बशीर अहेमद | -//- |
| २८. | स. स. सो. मोहसिना बिल्कीस विखारोद्दीन | -//- |
| २९. | स. स. श्रीमती जाहेदा बेगम म. जमीर | -//- |
| ३०. | स. स. श्री. तुपे त्र्यबंक गणपतराव | -//- |
| ३१. | स. स. सौ. वाडकेर यशोदा धनंजय | -//- |
| ३२. | स. स. श्री. तुळशीबागवाले किशोर | -//- |
| ३३. | स. स. श्रीमती गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद | -//- |

३४. स. स. श्री. हमीदोद्दीन ताबा फसीयोद्दीन -//-
३५. स. स. श्री. म.अ. रऊफ म. अ. माबुद -//-
३६. स. स. श्री. स.अ. इकबालोद्दीन स. मो. कुतुबोद्दीन -//-
३७. स. स. श्री. प्रदिप शिवनारायण जैस्वाल -//-
३८. स. स. श्री. स. अली. मिरा सलामी -//-
३९. स. स. श्री. रमेश दिपचंद लाहीट -//-
४०. स. स. सौ. वाघमारे मुक्ताबाई सुदाम -//-
४१. स. स. सौ. लता श्रीनिवास दलाल -//-
४२. स. स. श्री. ओक जयवंत केशवराव -//-
४३. स. स. श्रीमती अल्का रमेश पाटील -//-
४४. स. स. सौ. धांडे शंकुतला हरीदास -//-
४५. स. स. श्री. अब्दुल रशिदखॉन (मामू) -//-
४६. स. स. डॉ. कु. माया लिंबाजी लाडवाणी -//-
४७. स. स. श्री. डॉ. कराड भागवत किसनराव -//-
४८. स. स. सौ. सविता संजय आव्हाड -//-
४९. स. स. सौ. निर्मला विठ्ठल कांबळे -//-
५०. स. स. श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग -//-
५१. स. स. श्री. विखारोद्दीन पि. खुद्बोद्दीन -//-
५२. स. स. श्री. जैन विकास रतनलाल -//-
५३. स. स. श्री. बारवाल गजानन रामकिसन -//-
५४. स. स. श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग -//-
५५. स. स. श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव -//-
५६. स. स. श्री. जोशी संजय रामदास -//-
५७. स. स. श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर -//-
५८. स. स. सौ. ज्योत्सना दौलतराव हिवराळे -//-
५९. स. स. श्री. राजकुमार बचाटे ( मामा ) -//-
६०. स. स. सौ. राधाबाई तळेकर -//-
६१. स. स. श्री. विठ्ठल किसन जाधव -//-
६२. स. स. श्री. मेहेर विजयकुमार गजानन -//-
६३. स. स. सौ. काळुसे मंदा धनंजय -//-
६४. स. स. सौ. सुनंदा उत्तम कोल्हे -//-
६५. स. स. श्री. गांगवे बन्सी तुळशीराम -//-
६६. स. स. श्री. घडामोडे भगवान देविदास -//-

**संवाद :**

श्री. अफसरखान : ५ फेब्रुवारी पासुन महानगरपालिका निवडणूकीची आचार संहिता लागणार आहे. स्वेच्छानिधीतून, कामा संदर्भातील बऱ्याच संचिका मा. आयुक्तांकडे सही विना पडून आहेत. मा. आयुक्त आठ दिवस नाही असे समजते जनतेच्या कामासाठी स्वेच्छा निधी वापरत आहोत. संचिका मंजूर होण्याबाबतची कार्यवाही कधी होणार याची माहिती देण्यात येवून याबाबतचा निर्णय आजच्या सभेतच घेण्यात यावा.

श्री. मेहेर विजयकुमार : मा. आयुक्त रजेवर गेलेले असले तरी, त्यांनी त्यांच्या पदभार दुसऱ्या अधिकाऱ्यांकडे दिलेला नाही काय?

श्री. विधाते प्रभाकर : मा. आयुक्त यांना महापाल्किेत एक महिनाही झाली नाही. एक महिण्याच्या कालावधीत ते रजेवर गेले. शहराच्या विकास कामाकडे दुर्लक्ष होत आहे असे दिसून येते बऱ्याच कामाबाबत टेंडर मंजूर होऊन ठेकेदारांना २% अनामत र. भरुन २-२ महिने झालेले आहे. कार्य आदेशासाठी कामे थांबलेली आहेत.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : मागील बैठकीत १० लक्ष रुपयाचे एका डांबरीकरणाच्या कामा संदर्भात ताबडतोब टेंडर काढावे अशी आपण रुलींग दिलेली होती. लेखाधिकारी यांनी संचिका थांबवून ठेवली जोपर्यंत बजेटच्या बाबतीत निर्णय होत नाही. अशा कामाबाबतच्या संचिका मान्य करता येत नाही असे सांगितले. अशा विकास कामाबाबतच्या किती संचिका पेंडिंग आहेत. मा. आयुक्त रजेवर गेलेले आहे. त्यांचे अधिकार शिंदे साहेबांकडे देण्यात यावे व सर्व विकास कामाबाबतच्या संचिका निकाली काढण्यात यास सभागृहा समंती देईल. ५ तारखेपासून आचारसंहिता लागणार असून, कामे थांबून राहतील. याबाबत प्रशासनामार्फत सविस्तर खुलासा व्हावा.

मा. महापौर : आपल्या सर्वांची मागणी एकच आहे की, विविध प्रभागातील विकास कामा बाबतच्या स्वेच्छानिधीतून होणाऱ्या कामाबाबतच्या संचिका पडून आहे. माझ्या माहिती प्रमाणे नगरसेवकांच्या निधीतून विकास कामाच्या ११० संचिका व इतर विविध कामाच्या १४७ संचिका मा. आयुक्तांकडे पडून आहेत. त्यावर सध्या झालेल्या नाहीत. मा. आयुक्त साहेब सुट्टीवर गेलेले आहेत. ५ तारखेला आचार संहिता लागणार असून सर्व सभासदांच्या मागणी नुसार विकास कामाच्या संचिका निकाली काढण्याबाबत कोण कार्यवाही करणार याबाबत उप आयुक्त ( म. ) श्री. शिंदे साहेब यांनी खुलासा करावा.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : काही कामेवर्क ऑर्डर मुळे थांबून राहिलेली आहे. वर्क ऑर्डर तात्काळ देणार आहे किंवा याचाही खुलासा व्हावा तसेच वर्क ऑर्डर देवून ताबडतोब कामे सुरु करण्याचे आदेश द्यावेत.

उप आयुक्त ( म. ) : मा. आयुक्त रजेवर गेलेले असून, त्यांनी मला पत्र दिले आहे की, दि. ०४-०२-२००० ते ०८-०२-२००० पर्यंत मी नैमितीक रजेवर जात आह या कालावधीत आपण मुख्यालयात उपस्थित रहावे व महत्वाच्या कार्यालयीन कामकाजाच्या बाबतीत योग्य ती कायदेशीर कार्यवाही करावी. तसेच या कालावधीत जर स्थायी समिती सभा व सर्वसाधारण सभा असल्यास तर या बैठकांना आयुक्तांच्या वतीने आपण उपस्थित रहावे त्यानुसारच आताच आपण स्वेच्छानिधीमधील इतर विकास कामाच्या सर्व संचिका निकाली काढण्यात अशी सूचना मांडलेली आहे. याबाबत मी कालच मा. आयुक्तांशी संपर्क साधला व आजही माझी त्यांच्याशी बोलणी झालेली आहे. त्यांनी मला स्वेच्छानिधी संदर्भात असलेल्या सर्व संचिका नियमानुसार निकाली काढण्याचे अधिकार दिलेले आहे.

श्री. अफसरखॉन : कायदेशीर व नियमानुसार आपण काही संचिका मंजूर करणार नाही. नेमक्या कोणत्या संचिका निकाली काढणार याची माहिती दयावी उपआयुक्त यांनी जो खुलासा केलेला आहे तो गोलमोल वाटतो.

मा. महापौर : आताच उपआयुक्त (म) यांनी खुलासा केलेला आहे. मा. आयुक्त रजेवर जाणार याची कल्पना मिळाली स्थायी समितीची परवानगी घेवूनच रजेवर जावयास पाहिजे होते. दुसरे असे की, मा. आयुक्त यांच्या दालनात स. सदस्य श्री. खरात तसेच इतर स. सदस्य व मी गेलो होतो व सर्व स्वेच्छानिधीच्या संचिका निकाली काढण्याबाबत विनंती केली त्यांनी आश्वासन दिले की, सर्व फाईल्स, निकाली काढतात. त्यानंतर ते सिडको कार्यालयात गेले त्यांनी फक्त ४-५ संचिकावर सहया केल्या व तसेच ते एअरपोर्टवर बाहेरगावी जाण्यासाठी निघून गेले अशी माहिती मला मिळाल्यानंतर मी उपआयुक्त यांना सुचना केली की, स्वेच्छानिधीच्या संचिका पेंडींग आहेत.मा. आयुक्तांना आपण योग्य ती माहिती घेवून चार्ज घेण्यात यावा व संचिका निकाली काढल्या त्यानंतर श्री. शिंदे साहेब मा. आयुक्तांना भेटले व मा. आयुक्त यांनी फक्त त्यांना कामकाजा संबंधीचे पावर दिले. ५ तारखेपर्यंत उद्‌घाटणे ही होणार आहे. मा. आयुक्तांनी सांगितले की, स्वेच्छानिधी हा नगरसेवकांचा नसतो महापालिकेचा असून, जनतेसाठी असतो असे शब्द मा. आयुक्तांनी वापरल्याबद्दल या सभागृहातर्फे मी त्यांचेवर नाराजी व्यक्त करतो. काल पुन्हा उपआयुक्त (म.) यांनी त्यांच्याशी संपर्क साधून सर्व संचिका निकाली काढण्याबाबतचे अधिकार मा. आयुक्तांनी त्यांना दिले. त्यानुसार त्यांना नेमके कोणते अधिकार दिले व कोणत्या संचिका निकाली काढणार व किती वेळात काढणार या संबंधीची सविस्तर माहिती त्यांनी दयावी. माहिती मिळणार असेल तर, सध्या १० मिनिटासाठी तहकुब करता येईल. प्रभारी आयुक्तांनी सर्व कामे मंजुर होत असेल तर, त्यासंबंधीचा खुलासा करावा.

श्री. नरसिंग ढगे : मा. आयुक्त यांना फक्त ३ हजार रुपयापर्यंतचे टेंडर मंजूर करण्याचा अधिकार असून, मा. आयुक्त रुजू होऊन १ महिना झाला ६ महिण्या पुर्वीच्या संचिका पेंडींग पडून आहेत. उदा. दयावयाचे झाल्यास ८८ लाख रुपयाचे एम एस पाईपलाईन एन-७ ते एन११ मध्ये ३५ लक्ष क्षमतेचे जलकुंभाचे कामाची कार्यवाही झालेली नाही त्याच चिकलठाणा झाल्टा येथील एस. टी. पी. प्लॅन्टचे १ कोटी ३५ लाख रुपयाचे काम असून, अशी ठळकठळक कामे मा. आयुक्तांकडे पेंडींग पडलेली आहे. या संदर्भात मी. मा. आयुक्तांना विनंती केली की, पाणी प्रश्न आहे. त्वरीत अशा संचिका निकाली काढाव्या परंतु आयुक्तांनी कुठल्याही प्रकारची कार्यवाही केलेली दिसत नाही. या संबंधीचाही खुलासा व्हावयास पाहिजे.

श्री. हमीदोद्यीन ताबा : २-२ ते ३-३ हजार रुपयापर्यंतच्या कामाच्या संदर्भात वर्क ऑर्डर केले नाही म्हणून मा. आयुक्ताकडे १५ दिवसापासून संचिका पडून आहे. कार्यवाही झालेली नाही. खाजा अमिनोद्यीन यांच्या पत्नीच्या उपचारार्थ अर्थसाहय देण्याची संचिका २ महिनेपासून प्रलंबित आहे.

श्री. संजय जोशी : मा. आयुक्त रुजू झाल्यापासून त्यांच्या दालनात फक्त ६ दिवस बसलेले आहे. त्या सहा दिवसात त्यांनी पेंडींग एकही संचिका निकाली काढलेली दिसत नाही असे वाटते. आजच्या घडीला त्यांच्या दालनात विकास कामा संदर्भात ११० फाईली पडून आहे. आताच स. सदस्य श्री. ढगे यांनी सांगितल्याप्रमाणे उन्हाळयामध्ये पाण्याचा प्रश्न उपस्थित होतो. एन-११ मध्ये या सर्वसाधारण सभेने इ. एस. आर. मंजूर करुन दिलेला असून, काम झाले

तर नक्कीच त्या भागामध्ये पाणी प्रश्न सुटेल. परंतु सभागृहाने मंजूरी दिलेली असतांना प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे ते काम होण्याबाबत अदयाप कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही. त्यासाठी आताच सभागृहाने निर्णय घेवून मा. आयुक्ताकडील सर्व संचिका उप आयुक्त (म.) शिंदे साहेबांकडे मंजूरीसाठी देण्याची कार्यवाही व्हावी व उर्वरीत सर्व विकासाची कामे त्वरीत व्हावी.

मा. महापौर : उपआयुक्त (म.) यांनी योग्य खुलासा करावा तोपर्यंत १५ मिनिटासाठी सभा तहकुब करण्यात येते. ( वेळ ४.१५ वा. सभेला सुरुवात ५.४५ वाजता )

श्री. अफसरखान : आजची बैठक तहकुब करुन उपआयुक्त यांनी सर्व विकास कामा बाबतच्या संचिका निकाली काढाव्या व तशी माहिती उदया बैठक ठेवून त्यात देण्यात यावी.

श्री. काशीनाथ कोकाटे : गेल्या आर्थिक बजेटमध्ये चिकलठाणा झाल्टा येथील ऑक्सीडेशन प्लॅन्टसाठी १ कोटीचे तसेच सिडकोमध्ये पाणीप्रश्न सुटण्यासाठी २ कोटीची योजनेसाठी तरतुद केलेली होती. या दोन्हीही योजनावर बजेट ठेवलेले असतांना अधिकारी यांनी डोळेझाक केली आहे. पाण्या संदर्भात बऱ्याच लोकांनी आयुक्त, तसेच पदाधिकारी यांच्याकडे तक्रारी दिलेल्या आहेत. बजेटमध्ये तरतुद केली असतांना पर्याय म्हणून एन-७ भागामध्ये २२ लाख लिटर क्षमतेचे जी. एस. आर. बांधावयाचे होते. याचे आपल्या अध्यक्षतेखाली उद्घाटन सुध्दा झालेले आहे ते माझ्याच वार्डामध्ये येत असल्याने अदयापपर्यंत संपगृह चालु झालेले नाही. खेदाने सांगावेसे वाटते. एकूण ७५ लाख रुपये खर्च त्या भागातील लोकांना त्वरीत सुरळीत पाणी पुरवठा व्हावा या हेतुने केलेले आहे. २ कोटीला सभागृहाने मंजूर दिलेली असून, निविदा निघालेल्या असून, अदयाप प्रशासनाने का पुढील कार्यवाही केलेली नाही. याचा खुलासा व्हावा.

श्री. हमीदोद्यीन ताबा : सभा तहकुब केली होती. काय चर्चा झाली त्याचा खुलासा व्हावा.

मा. महापौर : मा. आयुक्तांचे अधिकार उपआयुक्तांना आहेत. ज्या ज्या स्वेच्छानिधीतून विकास कामाबाबतचा संचिका आहेत त्या सर्व निकाली काढणार आहे.

श्री. अफसरखान, श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : उप आयुक्त हे कोणत्याही संचिका निकाली काढणार नाही असे वाटते. त्यांनी आजच्या आज सर्व संचिका मा. आयुक्तांनी अधिकार दिल्यानुसार सहया कराव्या तो पर्यंत आजची सभा तहकुब करण्यात यावी व उदया सकाळी सभा आयोजीत करुन तसा रिपोर्ट १० वाजेपर्यंत त्यांनी दयावा ज्या ज्या पाणी प्रश्ना संदर्भात संचिका आहेत. त्याही निकाली काढाव्यात. विकास कामा बाबतच्या किती संचिका व कोणकोणत्या अधिकाऱ्यांच्या टेबलावर पडून आहेत. त्याही मागवून घेवून याबाबतही निर्णय घेण्यात यावा. ज्यांनी संचिका थांबवून ठेवल्या त्या अधिकाऱ्याचे सी. आर. खराब करण्यात यावे.

श्री. बारवाल गजानन : स्वेच्छानिधीतून होणाऱ्या विकास कामाबाबतच्या सर्व संचिका निकाली काढाव्या तसेच स. सदस्य श्री. कोकाटे यांनी अतिशय चांगल्या प्रकारे पाणी प्रश्न तसेच झाल्टा येथे एस. टी. पी. प्लॅन्ट बाबत सूचना केली अशा प्रकारचे महापालिकेने मोठमोठाले प्रकल्प हाती घेतलेले आहे. १५% पासून ५०% पर्यंत बऱ्याच कामे अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराने देण्यात आलेले आहे. त्याची कारणे वेगवेगळे असू शकतात. त्या टेक्नीकली

बाब निर्माण होत असतील सभागृहात चालू असलेल्या चर्चेनुसार सर्व विकास कामाबाबतचा संचिका आजच्या आज निकाली काढून कार्यवाही करावी व विषय क्र. १ व चर्चा सुरु करावी.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : सर्व विकास कामाच्या संचिका आज मंजूर करण्यात याव्या व विषय क्र. १ वर ही उदयाच्याच बैठकीमध्ये चर्चा होऊन निर्णय व्हावा.

श्री. स. अली. मिरा सलामी : स्वेच्छा निधीतील विकास कामा बाबतच्या सर्वच संचिकेवर आज सहया व्हाव्यात तशी माहिती उदया प्रशासनाने दिल्यानंतरच विषय क्र. १ वर चर्चा करावी.

सौ. गुंजाळे शिलाताई : आताच स. सदस्य श्री. कोकाटे यांनी पाणीप्रश्नाबाबत सूचना मांडली त्या कामाची वर्क ऑर्डर व्हावयाची बाकी असून, संचिका मा. आयुक्तांच्या सही विना पडून आहेत. मा. आयुक्तांचा संपूर्ण अधिकार मा. उपआयुक्त यांचेकडून देवून सर्व विकास कामाबाबतच्या संचिका निकाली काढाव्या अशी विनंती.

मा. महापौर : मा. उपआयुक्त (म.) श्री. शिंदे साहेब यांनी शहरातील विविध प्रभागात स. सदस्यांना स्वेच्छानिधीतून होणाऱ्या विविध कामाबाबतच्या सर्व संचिका आजच्या आज निकाली काढून तसा रिपोर्ट उदया सभागृहात दयावा आजची सभा उदया ११.३० वाजता घेण्यात येईल. तो पर्यंत सभा तहकुब करण्यात येते.

या बरोबरच " जण गण मन " या राष्ट्रगिताने आजची सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव, | मा. महापौर, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक ०४-०२-२००० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त गुरुवार दिनांक. ०३-०२-२००० रोजीची तहकुब सभा शुक्रवार दिनांक ०४-०२-२००० रोजी मा. महापौर श्री. सुदाम रामदास सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची मुख्य कार्यालयातील "कै. प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहात येथे सकाळी ११.५५ वाजता " वंदे मातरम् "या गिताने सुरु झली. सभेला अधिकारी वर्ग तसेच खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | स. स. श्री. संजय किसनराव केनेकर | मा. उपमहापौर |
| २. | स. स. श्री. ढगे नरसिंग मुरलीधर | स.सभासद |
| ३. | स. स. श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलीकराव | -//- |
| ४. | स. स. श्री. अफसरखॉन यासीनखॉन | -//- |
| ५. | स. स. सौ. लोखंडे रुख्मणबाई खंडेराव | -//- |
| ६. | स. स. श्री. विधाते प्रभाकर सिताराम | -//- |
| ७. | स. स. सौ. साजेदा बेगम | -//- |
| ८. | स. स. श्री. गौतम भागाजी खरात | -//- |
| ९. | स. स. श्री. ॲड गणेश किसनराव वानखेडे | -//- |
| १०. | स. स. सौ. रजनी रमेश जोशी | -//- |
| ११. | स. स. सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलीक | -//- |
| १२. | स. स. सौ. शिलाबाई सितराम गुंजाळे | -//- |
| १३. | स. स. श्री. भालेराव अभिमन्यू रामभाऊ | -//- |
| १४. | स. स. श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | -//- |
| १५. | स. स. श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | -//- |
| १६. | स. स. सौ. पद्मा बाबुराव शिंदे | -//- |
| १७. | स. स. श्री. टाकळकर सुभाष भिकाजी | -//- |
| १८. | स. स. श्री. मालानी प्रफुल्ल लालचंद | -//- |
| १९. | स. स. श्रीमती पांचाळ चंपाबाई | -//- |
| २०. | स. स. श्री. फजलऊल्लाखान अजमतऊल्लाखान | -//- |
| २१. | स. स. श्रीमती आबेदा बेगम मो. मुस्तफा | -//- |
| २२. | स. स. सौ. नुरजहॉ बेगम अ. रहेमान खॉन | -//- |
| २३. | स. स. श्री. देशमुख वसंत विनायक | -//- |
| २४. | स. स. श्रीमती जाहेदा बेगम म. जमीर | -//- |
| २५. | स. स. श्री. तुपे त्र्यबंक गणपतराव | -//- |
| २६. | स. स. श्री. तुळशीबागवाले किशोर | -//- |
| २७. | स. स. श्रीमती गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद | -//- |
| २८. | स. स. श्री. हमीदोद्यीन ताबा फसीयोद्यीन | -//- |
| २९. | स. स. श्री. म.अ. रऊफ म. अ. माबुद | -//- |
| ३०. | स. स. श्री. स.अ. इकबालोद्यीन स. मो. कुतुबोद्यीन | -//- |
| ३१. | स. स. श्री. प्रदिप शिवनारायण जैस्वाल | -//- |
| ३२. | स. स. श्री. स. अली. मिरा सलामी | -//- |

| | | |
|---|---|---|
| ३३. | स. स. श्री. रमेश दिपचंद लाहोट | -//- |
| ३४. | स. स. श्री. फैय्याज अहेमद म. हाजी कुरैशी | -//- |
| ३५. | स. स. सौ. लता श्रीनिवास दलाल | -//- |
| ३६. | स. स. श्री. ओक जयवंत केशवराव | -//- |
| ३७. | स. स. श्रीमती अल्का रमेश पाटील | -//- |
| ३८. | स. स. सौ. धांडे शंकुतला हरीदास | -//- |
| ३९. | स. स. श्री. अब्दुल रशिदखॉन (मामू) | -//- |
| ४०. | स. स. डॉ. कु. माया लिंबाजी लाडवाणी | -//- |
| ४१. | स. स. श्री. डॉ. कराड भागवत किसनराव | -//- |
| ४२. | स. स. सौ. सविता संजय आव्हाड | -//- |
| ४३. | स. स. सौ. निर्मला विठ्ठल कांबळे | -//- |
| ४४. | स. स. श्री. अ. रशिद अ. सत्तार | -//- |
| ४५. | स. स. श्री. विखारोद्यीन पि. खुद्बोद्यीन | -//- |
| ४६. | स. स. श्री. जैन विकास रतनलाल | -//- |
| ४७. | स. स. श्री. बारवाल गजानन रामकिसन | -//- |
| ४८. | स. स. श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग | -//- |
| ४९. | स. स. श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव | -//- |
| ५०. | स. स. श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर | -//- |
| ५१. | स. स. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव | -//- |
| ५२. | स. स. सौ. ज्योत्सना दौलतराव हिवराळे | -//- |
| ५३. | स. स. श्री. राजकुमार बचाटे ( मामा ) | -//- |
| ५४. | स. स. सौ. राधाबाई तळेकर | -//- |
| ५५. | स. स. श्री. विठ्ठल किसन जाधव | -//- |
| ५६. | स. स. श्री. मेहेर विजयकुमार गजानन | -//- |
| ५७. | स. स. सौ. काळुसे मंदा धनंजय | -//- |
| ५८. | स. स. सौ. सुनंदा उत्तम कोल्हे | -//- |

संवाद :

मा. महापौर : गणपुर्ती अभावी सभा १५ मिनिटसाठी तहकुब करण्यात येते. दु. १२.०० वाजता तहकुब झालेली सभा पुन्हा दु. १२.३५ वा. मा. महापौर यांचे अध्यक्षतेखाली सुरु झाली.

श्री. अफसरखान : शासनातर्फे महानगरपालिकेला ५ कोटी रुपये देऊ केलेले आहे. त्याबद्दल ठराव घेऊन अभिनंदन करण्यात यावे. तसेच पुढील प्रत्येक वर्षासाठी शासन १० कोटी देणार आहे.

श्री. गिरजाराम हाळनोर : शासनाने महानगरपालिकेस अनुदान दिल्याचे घोषित केले. आहे. प्रत्यक्ष अर्थसाहय मिळाल्यानंतर अभिनंदन करावे. आता धन्यवाद द्यावे.`

मा. महापौर : या अगोदरही शासनाकडून आपणांस विकास कामासाठी अनुदान मिळालेले होते. शासनाकडे आपण १५ कोटीची मागणी केली होती ५ कोटी मंजूर केले. त्याबद्दल सभागृहातर्फे अभिनंदन करण्यात येते.

श्री. अफसरखान : या अगोदरचे अनुदान उपयोग्य रित्या खर्च झालेले आहे. हे सर्वानीच माहिती आहे. कधी शासनाकडून आले व केव्हा खर्च केले माहिती पडले नाही.

श्री. गिरजाराम हाळनोर : या अगोदरच शासनाने दिलेल्या अनुदानातून भरपूर विकास कामे केलेली आहे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : ५ कोटीची रक्कम घोषित केलेली असून, लवकरच देणार आहे. अनुदान मिळाल्यानंतर प्रशासनाने लवकरात लवकर खर्च करावे. प्रशासनाला आचार संहिता नाही.

श्री. गिरजाराम हाळनोर : शासनाने फक्त घोषणा केलेला असून, अदयाप महानगरपालिकाकडे अनुदान प्राप्त झालेले नाही. याची जाणीव सभागृहाने ठेवावी.

मा. महापौर : अनुदान मिळण्यासाठी आपण शासनाकडे १५ कोटीची मागणी केली त्यानुसार शासनाने ५ कोटी देण्याचे मान्य केले. सदर रक्कम मनपाकडे आल्यानंतर ती कशी कशा पध्दतीने खर्च करावयाची व तसेच ५ कोटीचे अंदाजपत्रक तयार करावे लागणार असून, एक बैठक घेऊन त्यात चर्चा करुन निवडणूक आयोगाकडे आपणांस मागणी करावी लागेल की जी आचारसंहिता ६५ दिवसांची लागू केलेली आहे. ती ४५ दिवसांची ठेवावी असे केल्यास येणार ५ कोटी रुपये विकास कामासाठी योग्य त्या वेळी खर्च करता येईल.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : ५ कोटी रुपये कसे खर्च करावयाचे आहे. याबाबत आजच्या आज प्रशासनाने तसा ठराव आणावा. सदर रक्कम ३१ मार्च पर्यंत येणारच आहेत.

श्री.रशिद खॉन (मामू) : आज आपण याबाबत ठराव मंजूर करावा व प्रशासनाला काम करावयाचे आहे ते करु द्यावे.

मा.महापौर : ५ कोटीची अनुदान पोटी रक्कम शासनाकडून महानगरपालिकेस प्राप्त झ ाल्यानंतर कोणती विकास कामे करावयाची याबाबत अंदाजपत्रक तयार करावे लागणार असून या संबंधीचा प्रशासनाकडून खुलासा घ्यावा लागणार आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : प्रशासनामार्फत खुलासा घेण्यांत यावा.

मुख्यलेखाधिकारी : शासनाने ५ कोटीची रक्कम देण्याबाबत घोषणा केलेली असून रक्कम अद्याप महानगरपालिकेस मिळालेला नाही. शासनाचे अध्यादेश निघाल्यानंतर कोणत्या पध्दतीने खर्च करावयाचे त्याबाबतची माहिती देतील. त्यात महानगरपालिकेचा हिस्सा समाविष्ट असावा किंवा नसावा या संबंधीचे सर्व मार्गदर्शन आपल्याकडे देण्यांत येईल. प्रत्यक्ष अध्यादेश प्राप्त झाल्यानंतरच आपण कृती आराखडा तयार करता असतो. येणारे ५ कोटी रुपये अद्याप अप्राप्त असून त्यामुळे आपणांस कोणताही कृती आराखडा तयार करता येत नाही.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : शासकीय अनुदानातून शहरातील आवश्यक ती विकास कामे करण्याबाबत सन्मान निर्णय आपण घेऊ शकतो अधिकारी यांनी चुकीची माहिती दिलेली आहे. या अनुदानातून मा.महापौर यांच्या कार्यकाळात विकास कामे, व्हावीत अशी आमची मागणी आहे. त्यांचा मार्गी लागतील. ५ कोटीमधून आणखी कोणती कामे करता येतील. कोणत्या कामासाठी वापरला जाईल यासाठी प्रशासनाने तसा ठराव आजच्या आज सभागृहाच्या मंजूरीसाठी आणावा व त्यानुसार पुढील कार्यवाही करावी.

श्री.गिरजाराम हाळनोर : मुख्य लेखाधिकारी यांनी आताच खुलासा केलाला असून करता येत नाही, असे सांगितले आहे.

श्री.खरात गौतम : शासनाने ५ कोटी देण्याबाबत घोषणा केली. त्याबद्दल सभागृहातर्फे अभिनंदनही केले परंतू मुद्दा असा आहे की, जी पाच कोटी रुपये मंजूर केले आहे. त्यात असे ही नमूद केले आहे की सदर रक्कम ही मार्च अखेर खर्च करावी. शासनाकडे या अगोदर अमुक अमुक अनुदानाची माहिती पाठविली होती काय? नसेल तर मार्च अखेर ही रक्कम प्रशासन कोणकोणत्या कामासाठी खर्च करणार आहे याची माहिती द्यावी अशी शंका निर्माण होते की, या अगोदर प्रशासनाने जी जी कामे केलेली आहेत तीच यावी शासनाकडे पाठविलेली आहे असे वाटते. असा काही प्रकार झालेला आहे काय? याबाबतचाही सविस्तर माहिती देण्यांत यावी.

श्री.विधाते प्रभाकर : आताच स.सदस्य श्री.गौतम खरात यांनी योग्य अशी सूचना मांडली आहे. शासनाने देऊ केलेले ५ कोटी रुपये कोणकोणत्या कामासाठी खर्च करणार तसेच नेहमी आयुक्तांच्या बदल्या होत आहे. आचार संहिता लागू होणार असून अंदाजपत्रकास मंजूरी कशी होणार मा.आयुक्तांना तसे अधिकार दिल्यास सर्व ५ कोटीची रक्कम खर्च करणार आहे काय? किती किती लाखाचे अंदाजपत्रक तयार करणार याबाबत सविस्तर माहिती देण्यांत यावी.

श्री.सुर्यवंशी महादेव : ड्रेनेज, पाणी व इतर आवश्यक सुविधा बाबतचे प्रस्ताव निधी अभावी आजही पेंडींग आहेत. बऱ्याच प्रस्तावाचे इस्टिमेंटस तयार होऊन पडलेले आहेत. या ५ कोटी रुपये खर्च करावयाचे असे तर नवीन इस्टिमेंटस तयार करण्याची आवश्यकता भासणार नाही अशी माझी शंका आहे. ५ कोटी रुपये ३१ मार्च पर्यंत खर्च करण्याचे शासनाचे निर्देश दिलेले आहेत, निधी अभावी जी जी कामे प्रलंबित आहेत. अशा प्रकारचे प्रस्ताव तात्काळ सभागृहासमोर मान्यता होण्यासाठी मांडता येतील का याचा खुलासा प्रशासनाकडून व्हावयास पाहिजे.

श्री.भागवत कराड : शासनाकडून जे ५ कोटीची अनुदान येईल त्यात जे कामाबाबतचे प्रस्ताव मंजूर होऊन निधी अभावी पडून आहे. अशांचाच विचार व्हावा. नवीन कोणतीही कामे या अनुदानातून करण्यांत येऊ नये.

श्री.अफसर खॉन : ३ ते ४ कोटी रुपयाची कामे निधी अभावी पेडींग आहेत. ती तात्काळ करण्यांत यावी अशी सर्वांचीच मागणी आहे.

श्रीमती अलका पाटील : गेल्या ५ वर्षात जे शासनाकडून अनुदान प्राप्त झालेले आहेत. त्यापैकी माझ्या वार्डात ड्रेनेन शिवाय कुठे ही पैसा शासकीय अनुदानाचा वापरला गेला नाही. आता ५ कोटी शासनाकडून आल्यावर पूर्ण ८२ वार्डात जी अत्यावश्यक विकास कामे थांबलेली आहेत ती त्यातून करण्यांत यावी.

सौ.तळेकर राधाबाई : १५ कोटीची मागणी केल्यानुसार ५ कोटी शासनाने घोषित केलेले असून येणारे ५ कोटी रुपये नेमका कोणत्या कामावर खर्च होणार आहे. सर्वच ८२ नगरसेवकांच्या वार्डातील आवश्यक ती सर्व कामे व्हावीत काही संचिका मंजूरीसाठी येतात. परंतू निधी उपलब्ध नसल्यामुळे परत जातात. छोट्या छोट्या कामाबाबतच्या संचिका निकाली निघणार आहेत काय? याचा खुलासा व्हावा. माझ्या वार्डामध्ये १९९७-९८ पासून एक ६० हजार रुपयाची संचिका पेडींग असून एक १४ हजाराच्या कामाबाबतची संचिका पेडींग आहे. अशा कमी रक्कमेच्या कामाबाबत या ५ कोटी रुपयामधून कार्यवाही होण्याचा विचार व्हावा. जवाहर कॉलनी येथील १० ते १५ घरांना पाणी पुरवठा योग्य

त्याप्रमाणे होत नसून यासाठी संबंधित अधिकारी यांनी खूप प्रयत्न केलेले असून त्या प्रभागात पाण्याची पाईप लाईन टाकणे गरजेचे असून त्यांचे अंदाजपत्रक तयार असून निधी अभावी कार्यवाही झालेली नाही सन १९९७-९८ पासून २ लाख रुपयाचे डांबरीकरण करण्या संदर्भात संचिका पेडींग असून इतर ठिकाणी गरज नसतांना २५-२५ हजार रुपये पर्यंतची कामे झालेली आहे. जी अत्यावश्यक कामे बाकी आहेत ती व्हावीत एवढेच म्हणणे आहे.

सौ.रजनी जोशी : मा.महापौरांचे मागणीनुसार रु.१५ कोटी ऐवजी फक्त ५ कोटी देण्याचे मान्य केलेले असून त्याबद्दल धन्यवाद सदर रक्कम महानगरपालिकेकडे सिडको हस्तांतर झालेले असून सिडकोच्या विकास कामासाठीच खर्च करावे अशी विनंती आहे.

श्री.विखारोद्दीन : माझ्या वार्डातील विकास कामे थांबून आहेत. ५ ते ६ कामाबाबतचे इस्टिमेंट तयार होऊन पडलेले असून सर्वच वार्डामध्ये अर्धवट विकास कामे झालेली असून येणारे ५ कोटीमधून पेंडींग राहिलेली सर्व विकास कामे निकाली काढावी अशी विनंती आहे.

श्री.कोकाटे काशिनाथ : कालची सभा कोणत्या कारणाने तहकुब केली होती त्या संबंधिताची माहिती द्यावी.

श्री.गिरजाराम हाळनोर : सभागृहात ५ कोटी रुपये शासनाकडून येणारे या संदर्भात चर्चा चालू असून याबाबत योग्य तो निर्णय व्हावा नंतर इतर विषयावर चर्चा व्हावी.

सौ.पदमा शिंदे : माझ्या वार्डामध्ये काही कामाबाबतचे अंदाजपत्रक तयार झालेले असून निधी अभावी कामे बाकी आहेत. एक डांबरीकरणाचे काम येणाऱ्या ५ कोटी रुपयातून करण्यांत यावे. त्याप्रमाणे प्रत्येक वार्डामध्ये इंधन विहीरी घेणार होते. आता गेल्या २० तारखेला उद्‌घाटन होणार होते. त्या संबंधिचाही खुलासा व्हावा.

श्री.स.अली मिरा : शासनाकडून ५ कोटी रुपये येणार असून आत सध्याच जवळ जवळ ९.५० कोटीच्या कामाबाबतचे इस्टिमेटस तयार असून निधी अभावी पुढील कार्यवाही झालेली नाही. माझ्या वार्डामध्ये एका शाळेच्या इमारतीचे कामाचे १८ लाखाचे इस्टिमेट तयार असून कार्यवाही झालेली नाही. त्याप्रमाणे ३८ लाखाचे चिकलठाणा येथील वार्डातील इस्टिमेंटस तयार आहे. ५ कोटी रुपये आपल्या कार्यकाळात खर्च व्हावे अशी आमची भावना असून तात्काळ याबाबत निर्णय घेण्यांत यावा व अपूर्ण असलेली सर्व विकास कामे करण्यांत यावी.

श्री.सुर्यवंशी महादेव, श्री.बारवाल गजानन, श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.गजानन बारवाल : महानगरपालिकाकडे अनेक विकास कामे निधी अभावी थांबलेली असून पैशाची अत्यंत गरज आहे. आरोग्य पाणी पुरवठा, डांबरीकरण कामासाठी निधीची आवश्यकता आहे. प्रशासनाला माहिति असेल कोणकोणत्या कामावर हा पैसा खर्च करु शकतो. आणि खर्च होऊ शकत नसेल तर शासनाने मुद्दामहून हा ५ कोटी रुपयाचा निधी घोषित केलेले आहे असे माझे मत असून तो आपण मार्च अखेर खर्चच करु शकत नाही अशी शंका निर्माण होते.

मा. महापौर : शासनाने ५ कोटीची घोषणा फक्त केलेली आहेत. सदर रक्कम मार्च अखेर खर्च करावी अशी माहिती दर्शविण्यात आलेली आहे. परंतु अद्याप शासनाकडून रक्कम प्राप्त नसून कोणत्या कामासाठी सदर रक्कम वापराव यासाठी शासनाचे निर्देश नसल्यामुळे आपण आजच या संबंधी तसा ठराव देऊन निर्णय घेणे यात आपणा सर्वाचीच तसेच सभागृहाची बदनामी होईल. करिता प्रशासन त्यांच्या नियमाप्रमाणे आवश्यक कामासाठी सर्व करतील तसा सविस्तर खुलासा करण्यात यावा.

मुख्यलेखाधिकारी : या अगोदर महानगरपालिकेने ॲन्टी शिपी ग्रॅट म्हणून ३.२५ कोटीचा कृती आराखडा तयार केलेला होता. आणि अनुदान प्राप्त होईल या आशेवर माहे नोव्हे-डिसेंबर सदरील कामे प्रस्तावित करून मा. आयुक्तांची मंजुरी घेतलेली घेतलेली आहे. उर्वरित १.७५ कोटीचा कृती आराखडा तयार करावा लागणार आहे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : आताच मुख्यलेखाधिकारी यांनी सांगितले की, मा. आयुक्तांशी चर्चा करूनच निर्णय घेता येईल. आपण मा. आयुक्तांशी चर्चा करून मागील बाकी असलेली काम यानिधिमधून करू शकतो.

श्री. महादेव सुर्यवंशी : आताच संबंधित अधिकारी यांनी सांगितले की, ३.२५ कोटीचे अगोदरच इस्टिमेंट तयार असून उर्वरित १.७५ कोटीचे इस्टिमेट तयार करण्याबाबत कार्यवाही करावी लागेल. शासनाचे या अगोदरचे जे अनुदान मिळाले त्या अपेक्षेवर ३.२५ कोटीचे इस्टिमेट तयार होते. परंतु सदर ५ कोटी येणारी रक्कम ही वेगळी असून आपल्याकडे जे पेडींग वर्क आहेत ती कामे आपण या रक्कमेतून करू शकतो काय याचा खुलासा करावा.

मुख्यलेखाधिकारी : ३.२५ कोटीचा जो आराखडा आपण तयार केलेला होता तो या पाच कोटीमध्ये समाविष्ट राहणार आहे. परंतु आपण अन्टीसिपी ग्रॅट ३.२५ कोटी केलेले होते. शासनाने ५ कोटी मंजूर केले. अतिरिक्त आता १.७५ कोटीचा कृती आराखड तयार करावा लागणार आहे.

श्री. अफसरखॉन : आपण जे ३.२५ कोटीचा खर्च कशाच्याआधाराव खर्च केलेला आहे. शासनाकडून आताच अनुदान देण्याबाबत घोषणा झाली. खर्च करण्या संदर्भात शासन ठरवते की आपण याचाही खुलासा व्हावा.

मुख्यलेखाधिकारी : शासनाकडून दिलेले अनुदान हे या ठराविक काळात म्हणजे ३१ मार्च पर्यंत खर्च करावे असे निर्देश नेहमीच दिलेले असताता. व पुढील जे कामे आपण करतो जे की, स. सदस्यांची जी कामे प्रलंबित असतात अशीच कामे वॉर्डवाईज आपण अनुदान प्राप्त होईल. या आशेवर उदा. रोडची कामे, दोन हायमस्टची कामे काही गार्डनची कामे आणि काही विद्युतीकरणाची कामे इ. कामे आपण ३.२५ कोटीची माहे नोव्हें-डिसेंबर मध्ये आपण हे पारीत केलेले आहे. कोणती कामे घ्यावयाची हे आपण डिसाईड करतो असता. तसा आराखडा करतो व तसा आराखडा शासनाच्या मंजुरीस्तव आपण पाठवता.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : ५ कोटी अनुदान मिळेल या अपेक्षेवर गृहित धरून ३.२५ कोटीचे इस्टिमेंट तयार झाली व उर्वरित ५ कोटीमधील १.७५ कोटीची इस्टिमेंटच आपण तयार करू शकतो असे मुख्यलेखाधिकारी यांनी आताच सांगिते. १ तारखेला शासनाने ५ कोटी  रुपये देण्याची घोषणा केलेली असतांना संबंधित अधिकारी यांनी १.७५ कोटीची इस्टिमेंटस त्या संबंधित कृती आराखडा का तयार केलेला नाही याची माहिती द्यावी.

श्री. प्रदिप जैस्वाल : शासनाने ५ कोटीची अनुदान मंजूर करून आपली दिशाभूल केलेली आहे. कारण येत्या ५ तारखेला महापालिकेची आचार संहिता लागणार असून ती १० एप्रिलपर्यंत असणार आहे. आणि ५ कोटी रुपये हे ३१ मार्च पर्यंतच खर्च करावे असे निर्देश दिलेले असून एवढा निधी आपण आचारसंहितेच्या काळात खर्चच करू शकत नाही असे माझे मत आहे. आचारसंहितेच्या काळामध्ये मा. आयुक्त तसेच इतर कुण्याही अधिकाऱ्यांना विकास कामा संदर्भाने मान्यता देता येणार नाही याचाच अर्थ मिळणार नाही.

श्री. अफसरखॉन : मुख्यलेखाधिकारी यांनी आताच खुलासा केलेला आहे. यातील ३.२५ कोटीची कामे झालेली आहे. आता फक्त १.७५ कोटीची कृती आराखडा तयार करावयाचा बाकी असून त्यानुसार कार्यवाही व्हावी.

श्री. कराड भागवत : शासनाने ५ कोटी मंजूर केलेले असून ३१ मार्चपर्यंत खर्च करावे असे निर्देश दिले. ५ तारखेपासून आचार संहिता असून ५ दिवसामध्ये कसे खर्च होणार त्यासाठी येणारी ५ कोटीची रक्कम व पुढील वर्षाचे १० कोटी रुपये असे एकूण १५ कोटी रुपये शासनाकडून आल्यावर पुढील वर्षासाठी सर्व खर्च करण्यात यावे.

श्री. प्रदिप जैस्वाल : शासनाने ५ कोटी मंजूर केले परंतु ३१ मार्च पर्यंत खर्च करणे शक्य नाही कारण उद्यापासून ते १० एप्रिलपर्यंत आचारसंहितेचा कालावधी आहे. या ५ कोटीचा फायदा या शहरातील जनतेला होणार आहे काय? आचारसंहितोच्या कालावधी मध्ये अशी कामे करता येईल काय? याचा संबंधित अधिकारी यांनी खुलासा द्यावा. आचारसंहितेचा फायदा घेऊन शासनाने ५ कोटी मंजूर केलेल आहे असे वाटते म्हणजे ती ५ कोटी रक्कम आपणांस मिळणार नाही.

मा. महापौर : आजची सभा १० मिनिटासाठी तहकूब करण्यातयेते. (वेळ १.२० वाजता सभेला सुरुवात २.२० वाजता)

मा. महापौर : आता कालच्या तहकूब सभेविषयी माहिती घ्यावयाची की, विषय क्र. १ वर चर्चा करावयाची आपण निर्णय घ्यावा.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : ३.२५ कोटीची कामे झालेली असून उर्वरित १.७५ कोटीची कामे होण्याबाबत प्रशासनामार्फत ठराव आजच्या आज घेवून मंजूर करण्यात यावा अशी विनंती आहे व या ठरावास आजच स्विकृती देण्यात यावी. १.७५ कोटीचे कामे करण्या संदर्भात मा. महापौर, व प्रशासन यांना सभागृहातर्फे पावरस देण्यात येते. अशी या ठरावात नमूद करावे.

श्री. हमीदोद्दिन ताबा : त्यात ड्रेनेज व देखभाल दुरुस्तीच्या कामाचा समावेश करावा.

**विषय क्र. १८९/१ :**

दिनांक २०-०१-२००० ची तहकूब सभा व २५-०१-२००० रोजी ंसपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री. गिरजाराम हाळनोर : दि. २५-०१-२००० च्या इतिवृत्तातील पृष्ठ क्र. २७ वर विषय क्र. १८२/७ ज्योतीनगर बॅडमिंटन हॉल संदर्भात प्रस्ताव प्रशासनामार्फत सादर करावा असे सांगितलेले असतांना प्रशासनामार्फत सादर करावा असे

सांगितलेले असतांना प्रशासनामार्फत प्रस्ताव आलेला नाही. ऑलरेटी प्रशासनाने हा प्रस्ताव मंजूर केलेला आहे. म्हणून या प्रस्तावास मंजुरी देण्यात यावी.

श्री. अफसरखॉन : प्राव्हेट संस्थेला आपण अशा प्रकराचे हॉल चालविण्यास देऊ शकत नाही. निर्णय घेण्यात येऊ नये. रद्द करण्यात यावा.

श्री. गिरजाराम हाळनोर : या अगोदर प्रशासनाकडून आलेला होता मंजूर झालेला आहे. नगरसेवकांनी टाकलेला नव्हता या संदर्भात प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

मा. महापौर : प्रशासनाच्या नियमाप्रमाणे कार्यवाही झाली असेल तर योग्य आहे. नसेता सर्वसाधारण सभेमध्ये याबाबत ठरावयाचे असते.

श्री. गिरजाराम हाळनोर : दि. २०-०३-९९ च्या बैठकीमध्ये विषय क्र. २१४/५ नुसार अशा प्रकारचा ठराव मंजूर झालेला आहे. प्रशासनामार्फत प्रस्ताव आलेला होता त्यामध्ये अट दर्शविलेली आहे की, स्थानिक संस्थाना अशा प्रकारचे हॉल भाडे तत्वावर देण्यातयावे. प्रशासनामार्फत प्रस्ताव होत. त्याप्रमाणे प्रशासनाने कार्यवाही करावी. नियमाच्या बाहेर यामध्ये काहीही नाही.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : या संदर्भात निर्णय घेण्यात येऊ नये. सदर संस्थावर भ्रष्टाचाराचा आरोप आहेत. करिता देण्यात येऊ नये.

श्री. रशिदखॉन (मामू) : या प्रस्तावास माझा विरोध नाही. या अगोदर हॉल चालविण्यात दिलेले आहे ते सध्या बंद स्थितीत असू यात महानगरपालिकाचे नुकसान होते. शादीखाना हॉल देण्यात आला होता. तो सद्यस्थितीत बंद असून या अगोदर जे हॉल देण्यात आलेले आहेत ते महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यातयावे व यापुढे अशा प्रकारचे हॉल कोणत्याही संस्थेला देण्यात येऊ नये अशी विनंती आहे या संदर्भात प्रशासनाचे मत घ्यावे. नंतर निर्णय घेण्यात यावा.

श्री. अफसरखॉन : अशा प्रकारचे हॉल इतर संस्थेला देण्याबाबत निर्णय घेण्यात येऊ नये. महानगरपालिकेच्या कामासाठी उपयोग करावा. संस्थेला हॉल देवून त्या ठिकाणी दुरुपयोग होत आहेत.

श्री. गिरजाराम हाळनोर : महानगरपालिकेच्या कामासाठी उपयोगात आणल्यास प्रत्येक ठिकाणी वॉचमन व इतर कर्मचारी महानगरपालिका देणार आहे काय? जातीवादातून या प्रस्तावास विरोध होत आहे. असे वाटते. प्रशासनातर्फे प्रस्ताव आलेला होता त्यातील अटी व शर्ती नुसार आपण हॉल देऊ शकतो.

श्री. अफसरखॉन : जीवाद शब्द बोललेले असून ते मागे घेण्यात यावे.

मा. महापौर : स. सभासदाच्या भावना दुखावतील असे शब्द सभासद बोलले ते काढून टाकावे या प्रस्तावाच्या संदर्भाने प्रशासनाने पूर्वी ज्या पध्दतीने कार्यवाही केलेली आहे. जे की, आताच स. विरोधी पक्षनेता यांनी सांगितले की, काही हॉलचा सध्या स्थितीत दुरुपयोग होतो काही लोक त्या हॉलमध्ये विविध धंदे करतात या संबंधी प्रशासनाच्या माध्यमातून कार्यवाही करण्यात यावी. या प्रस्तावास प्रशासनाच्या नियमानुसार मान्यता देण्यात यावी.

श्री. अफसरखॉन : या अगोदर जे हॉल देण्यात आलेले आहे ते कशा प्रकारे दिले कोणत्या अटीवर व किती हॉल देण्यात आले याचा खुलासा करावा.

श्री. अ. रशिदखॉन (मामू) : यास माझा विरोध नोंदवावा. शासनाकडून मंजुरी घ्यावी आपण बनवलेले हॉल भाड्याने दिले जाते. हॉल ताब्यात दिल्यानंतर गरीब लोकांना त्याचा उपयोग होत नाही.

शहर अभियंता : महानगरपालिकातर्फे महापालिकाफंडातून किंवा आमादार फंडातून स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत जे सांस्कृतिक हॉल, व्यायामशाळा वगैरे बांधण्यात येतात ते बांधल्यानंतर आमच्या विभागाकडून त्याची सर्व कार्यवाही मालमत्ता विभागाकडे जाते. आणि त्या विभागाचे त्या संबंधिचे काही नियम तयार केलेले आहेत त्या बाबतची माहिती संबंधित मालमत्ता अधिकारी सांगू शकतील.

श्री. गिरजाराम हाळनोर : ठराव क्र. २१४ १/५ आपण मंजूर केलेला असून त्यात नियम क्र. ८ मध्ये दिलेले आहे. इमारतीचा दुरुपयोग होत असल्याने आढळून आल्यास संबंधितावर दंडात्मक ती कार्यवाही करावी व पुन्हा इमारत महापालिका आपल्या ताब्यात घेईल. अर्जामध्ये निश्चित केलेल्या वेळानुसार इमारतीचा वापर करण्यात येईल याची काळजी संस्थेने घ्यावी.

श्री. अफसरखॉन : या अगोदरचे जे हॉल चालवण्यासाठी दिलेले आहेत. ते परत घेवून आजच्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही झाली पाहिजे अशी विनंती आहे.

मा. महापौर : प्रशासनाने या अगोदरचे जे जे हॉल संस्थेला चालविण्यासाठी दिलेले आहे जर त्या हॉलचा दुरुपयोग होत असेल तर तात्काळ त्या संबंधी कार्यवाही करण्यात यावी.

श्री. प्रदिप जैस्वाल : पृष्ठ क्र. २७ वर विषय क्र. १७९/४ प्रस्ताव प्रशासनमार्फत ठेवण्यात यावा असे निर्णय झालेला होता प्रशासनामार्फत का प्रस्ताव ठेवण्यात आलेला नाही. ठेवता येत नसेल तर का ठेवता येत नाही याचा खुलासा करण्यात यावा.

उपसंचालक नगररचना : आमच्या विभागाकडे ज्या ज्या प्रस्ताव आलेले होते त्यासंबंधी कार्यवाही केलेली आहे या संबंधी माहिती घ्यावयाची होती. अद्याप मालमत्ता अधिकारी यांनी अभिप्राय दिलेला नसून ते आज सभागृहात उपस्थित नाही.

श्री. कराड भागवत : मालमत्ता अधिकारी तसेच अन्य किती अधिकारी आजच्या सभेला उपस्थित नाही याची माहिती घेण्यात यावी.

श्री. प्रदिप जैस्वाल : जागा देण्याच्या प्रस्तावा संबंधी जास्त चर्चा न होता सदर प्रस्ताव प्रशासनाच्या माध्यमातून येवू द्यावे म्हणून करिता असा निर्णय घेतला होता. परंतु प्रशासनाने प्रस्ताव ठेवलेला नाही. जागा लिजवर देता येत नसेल तर तसा खुलासा करण्यात यावा.

डॉ. कु. माया लाडवाणी : इतिवृत्त पान क्र. २६ ठराव क्र. १७८/३ मध्ये बसैयेनगरच्या पूर्व बाजूस असलेली व्यंकटेशनगर येथील खुली जागा ऐवजी बसैय्येनगर येथील खुली जागा अशी दुरुस्ती करून ठराव मंजूर करावा.

सौ. तळेकर राधाबाई : इतिवृत्त पान क्र. २६ विषय क्र. १७७/२ मंजूर करण्यात यावा.

मा. महापौर : बरेच अधिकारी / कर्मचारी निवडणूकीच्या कामासाठी आहेत हे प्रस्ताव प्रशासनाच्या नियमात बसत असेल तर मंजूरी देण्यात येते.

श्री. विखारोद्दिन : पृष्ठ क्र. २८ वर विषय क्र. १८५/१० आर्थिक मदत देण्या संदर्भात प्रस्ताव आहेत. मंजुरी देण्यात यावी.

मा. महापौर : नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतून आर्थिक मदत देण्याबाबत प्रशासनातर्फे स्वतंत्र प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. त्यावर निर्णय घेण्यात येईल.

सौ. विमलबाई मुंडलिक : पान क्र. २५ वर १९८५ ते १९९० ऐवजी १९८५ ते १९९३ अशी दुरुस्ती करावी व एन-११, एफ-१७-१८ ते २२ एकूण २८३ गाळे अशी दुरुस्ती करावी.

मा. महापौर : मंजूर

सौ. नुरजहाँ बेगम : पृष्ठ क्र. २८ वर विषय क्र. १८६/११ नुसार बालाजी मंदिर मोठ्या प्रमाणावर जागा असून ती जागा विकसित करणे शक्य होत नाही. करिता संरक्षित भिंत विद्युत व्यवस्था महानगरपालिकातर्फे व्हावीत म्हणून प्रस्ताव सादर केलेला होता मंजूर करण्यात यावा.

मा. महापौर : प्रशासनाच्या माध्यमातून या प्रस्तावावर योग्य ती कार्यवाही करावी.

श्री. महादेव सुर्यवंशी : पृष्ठ क्र. ३४ वर आपण रुलींग दिलेली आहे की, लक्ष्मी एजन्सीच्या मशीनची प्रत्यक्ष पाहणी करून किंमत काढण्यात येईल अशी कार्यवाही अधिकाऱ्यांवर करण्यांत येईल असे सांगितले होते. तर जी कमिटी नेमण्यात आली त्या कमिटीने पाहणी केलेली आहे का? काय कार्यवाही झाली.

श्री. अफसरखॉन : जकात विभागातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या संदर्भात खुलासा करावा. अद्याप बदल्या करण्यात आलेल्या नाहीत.

मा. महापौर : या संबंधी प्रशासन कार्यवाही करणार आहे. विषय क्र. १ मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

दिनांक २०-०१-२००० रोजी व दिनांक २५-०१-२०० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण स्भेच्या इतिवृत्तातील.

१) ठराव क्र. १८२/७ मंजूर करण्यात येतो ज्योतीनगर येथे नुकतेच बांधण्यात आलेल्या बॅडमिंटन हॉलचा यापूर्वी महानगरपालिकेने अशा इमारती स्थानिक नागरिकांच्या नोंदणीकृत संस्थांना चालविण्यासाठी देण्याचा निर्णय घेतलेला असल्याने ज्योतीनगर भागातील ज्योतीनगर डेव्हलपमेंट फाऊंडेशन या नोंदणीकृत संस्थेस चालविण्यासाठी देण्यांस मंजुरी देण्यात येते. सदर इमारतीचा दुरुपयोग होणार नाही याची काळजी प्रशासनाने घ्यावी. इतर प्रस्तावास नियमाच्या अधिन राहून सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

२) ठराव क्र. १७८/३ ला मंजुरी देण्यात येते. सार्थक बहुउद्देशीय कल्याण संस्था औरंगाबाद या संस्थेस बसैय्येनगरच्या पूर्वेस आलेली अनुज्ञेय होणारे क्षेत्राची बसैय्येनगर येथील खुली जागा प्रशासकीय नियमास अधिन राहून लिजवर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

३) ठराव क्र. १७७/२ ला मंजुरी देण्यात येते जवाहर कॉलनी येथील जवाहर गृह निर्माण संस्थेच्या रेखांकनातील खुली जागा तेथील सेवानिवृत्त संघटनेस अनुज्ञेय होणाऱ्या वापरासाठीचा विकास करण्यास प्रशासकीय नियमास अनुसरून लिजवर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

४) ठराव क्र. १७९/४ ला मंजुरी देण्यात येते. दृष्टी प्रतिष्ठान ही नोंदणीकृत संस्था असून सदर संस्थेस कार्यालयासाठी समर्थनगर येथील हेरीटेज अपार्टमेंटच्या बाजूला असलेली जागा प्रशासकीय नियमास अनुसरून लिजवर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

५) ठराव क्र. १७५/४ मध्ये एन-११ एफ१२ ते २२ या एकूण २८२ ऐवजी एन-१२ एफ १७ ते २२ या एकूण २८३ आणि १९८५ ते ९० या कालावधी ऐवजी १९८५ ते ९३ अशी दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

६) ठराव क्र. १८६/११ सदर प्रस्ताव प्रशासनातर्फे मांडण्यात यावा असे सर्वानुमते ठरले सदर प्रस्ताव बाबत प्रशासनाच्या माध्यमातून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी अशी दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

दिनांक २०-०१-२००० रोजी व दिनाक २५-०१-२००० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तास वरील दुरुस्तीसह इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

मा. महापौर : सभागृहात स. सभासदांचे जे ऐनवेळी प्रस्ताव सादर झालेले असून सर्वानुमते सर्व ऐनवेळचे प्रस्ताव मंजूर करण्यात येतात. व याच सभेत या प्रस्तावास स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १९०/१ :**

बन्सीलालनगर येथील सांस्कृतिक क्रीडा संकूल चे नियमावली, वेळापत्रक, शुल्क, आकारणी, प्रवेश अर्ज ई. साठी मंजुरी देणे बाबत.

**औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद**
**सांस्कृतिक क्रीडा संकूल**
**बन्सीलालनगर**

**<u>सर्वसाधारण नियम व अटी</u>**

१) खेळांसाठी विहित नमुन्यात अर्ज करावा लागेल.

२) हॉलमध्ये प्रवेश करण्यापूर्वी आरक्षण पावती अथवा ओळखपत्रे दाखविणे बंधनकारक आहे.

३) सभासदाने सरावासाठी स्वत: चे आवश्यक ते क्रीडा साहित्य सोबत आणणे आवश्यक आहे.

४) सभासदाने / खाजगी / सरकारी संस्था यांनी स्पर्धेकरिता आरक्षण करतांना किमान एक महिना अगोदर आरक्षण करणे आवश्यक आहे.

५) सभासद होण्यासाठी किमान दोन (२) अथवा चार (४) अशी नेमकी संस्था नेमक्या खेळासाठी सभासद संख्या असणे आवश्यक आहे.

६) सभासदांना महानगरपालिकेने नेमून दिलेल्या निर्धारित वेळीच सराव करणे बंधनकारक राहील.

७) कोणत्याही सभासदास खेळा दरम्यान अपघात दुखापत अथवा जिवीत हानी झाल्यास त्याची जबाबदारीऔरंगाबाद महानगरपालिकेवर राहणार नाही.

८) हॉलमध्ये प्रवेश करतांना व्यक्तीने मौल्यवान वस्तु सोबत आणू नयेत अशा वस्तु चोरीस गेल्यास त्याची जबाबदारी औरंगाबाद महानगरपालिकेवर राहणार नाही.

९) सभासदाचा निर्धारित कालावधी संपल्यानंतर पुढील कालावधीचे शुल्क संबंधित महिन्याच्या ५ तारखेच्यापूर्वी जमा करणे आवश्यक राहील.

१०) हॉलमध्ये मद्यापान, धुम्रपान आदींना बंदी आहे.

११) हॉलमधील साहित्याची नासधूस व मोडतोडे झाल्यास त्याची संपूर्ण भरपाई स्वखर्चाने सभासदास करून द्यावी लागेल.
१२) फ्लोअर तर खेळतांना "स्पोर्टचे शुज" वापरणे व स्वच्छ ठेवणे बंधनकारक आहे.
१३) गैरवर्तन वा याची सभासदाने दक्षता घ्यावी.
१४) ज्यांचे नावांवर आरक्षण आहे त्यांनाच सराव करण्याची परवानगी देणेत येईल.
१५) बॅडमिंटन / टेबल टेनिस व हतर बाबींसाठी एका तासाची परवानगी असेल.
१६) साप्ताहिक सुटीच्या कारणास्तव आठवड्यातून एक दिवस हॉल बंद राहील.
१७) मनपा अधिकारी व कर्मचारी यांना निम्मे शुल्क आकारले जाईल.
१८) वेळा निश्चितीचे अधिकार व्यवस्थापनास राहतील.
१९) वाचनालय इमारतीतील सभागृहातील दालने देणे बाबत व शुल्क आकारणे बाबत (सभा, चर्च परिसंवाद इ. सांस्कृतिक अधिकारी मनपा यांचेशी संपर्क साधावा. परवानगी शिवाय जागेचा वापर करता येणार नाही.)
२०) वाचनालय इमारतीतील दालनातील होणाऱ्या उपक्रमांमुळे इतरांना त्रास होणार नाही याची दक्षता होणे आवश्यक आहे.
२१) औरंगाबाद महानगरपालिकेने दिलेल्या सूचना अथवा नियम, अटींचा भंग केल्यास सभासदत्व त्या वेळी रद्द होईल.
२२) अटी, नियम यामध्ये बदल करण्याचे तसेच अपरीहार्य कारणास्तव हॉल बंद ठेवण्याचे व आरक्षण रद्द करण्याचे अधिकार मा. आयुक्त महानगरपालिका अथवा प्रधिकृत अधिकारी यांना राहतील.

**औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद**
**बन्सीलालनगर, सांस्कृतिक क्रीडा संकूल**
**"वेळापत्रक"**

वेळ : सकाळी ६ ते १० दुपारी २.०० ते ४.३०
सायंकाळी ४.३० ते १०.००

प्रवेश : प्रत्येक वर्गणीदार सभासदास प्रवेश पत्रिकाकार्ड देण्यात येईल त्याशिवाय हॉलमध्ये प्रवेश मिळणार नाही.

प्रवेश कार्ड शुल्क : रु. १०/-

| बॅडमिंटन / टेबल टेनिस | | |
|---|---|---|
| सकाळी | ६:०० ते ८:०० | वार्षिक वर्गणीदार |
| सकाळी | ८:३० ते १०:३० | मासिक वर्गणीदार |
| दुपारी | २:०० ते ४:३० | महिलांसाठी (वार्षिक मासिक) |
| सायंकाळी | ४:३० ते ६:३० | जिल्हा (प्रशिक्षण) |

| फॅमिली / बॅडमिंटन | | |
|---|---|---|
| सायंकाळी | ६:३० ते रात्री ८:३० | वार्षिक वर्गणीदार |
| रात्री | ८:३० ते १०:०० | मासिक वर्गणीदार |

| बॅडमिंटन / टेबल टेनिस | | |
|---|---|---|
| वार्षिक | एका संचास सहा | रु. ४०००/- |
| मासिक | एका संचास सहा | रु. ४५०/- |

| महिला व विद्यार्थ्यांसाठी केवळ | | |
|---|---|---|
| वार्षिक | एका संचास सहा | रु. २५००/- |
| मासिक | एका संचास सहा | रु. २५०/- |

इतर विभागातील सरावासाठी वापरण्यात येणाऱ्या जागेचे दैनिक / मासिक शुल्क परवानगी घेतांना भरण्यात यावे.

**टिप :-** असोसिएशन / संस्था यांचेमाफ्रत मोठ्या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी हॉलचे भाडे एका दिवसासाठी रु. ५००/- राहील.
अनामत रु. १०००/-
साफसफाई शुल्क रु. २५०/-
वेळेबाबत वा शुल्काबाबत प्रासंगिक बदल करण्याचे अधिकार मा. आयुकत महानगरपालिका अथवा प्राधिकृत अधिकारी यांना असतील.

**औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद**
**सांस्कृतिक - क्रीडा संकूल**
**बन्सीलालनगर**
**औरंगाबाद**

**: प्रवेश अर्ज :**

अर्जदाराचे नांव :
स्थानिक पत्ता :
दूरध्वनी :
कोणत्या विभागासाठी प्रवेश घेऊ इच्छितो : बॅडमिंटन / टेबल टेनिस / वाचनालय
किती व्यक्तींसाठी :
किती व्यक्तींसाठी :
वेळ : सकाळी : संध्याकाळी

या बाबतचे सर्व नियम मी वाचलेले असून मला ते मान्य आहेत.

नांव व स्वाक्षरी/-

**कार्यालयीन उपयोगासाठी**

श्री. / श्रीमती -------------- यांना यावेळेसाठी बॅडमिंटन / टेबल टेनिस / वाचनालय परवानगी देणेत येते.

दिनांक : / /

सांस्कृतिक अधिकारी / शिक्षणाधिकारी
महानगरपालिका, औंरगाबाद.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेचे बन्सीलालनगर येथील क्रिया संकुलासाठी तयार केलेली नियमावली अ.क्र. १ ते २२ बॅडमिंटन / टेबल टेनिस खेळासाठी प्रवेशकार्ड शुल्क आकारणीस त्यांचे वेळापत्रकास, संच शुल्क आकारणीस, असोसिएशनस व संस्थांना भाडे आकारणी व प्रवेश अर्ज नमुन्यास प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९१/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नागसेननगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासाठी कॉलम व आर.सी.सी. छत (घुमट) बांधणेसाठी स. नगरसेवक श्री. गंगाधरजी गाडे यांनी त्यांचे पत्र दि. ०१-०१-२००० अन्वये त्यांचे स्वेच्छा निधी मधून पिलर व घुमट बांधण्यासाठी विनंती पत्र दिले आहे.

तथापी सदरील ओटा व पुतळा मनपातर्फे बांधलेला नाही. स्थानिक नागरिकांनी तो बसविलेला आहे. सदर ठिकाणी स. नगरसेवक यांचे स्वेच्छानिधी मधून काम होणार असल्याने सदर प्रस्तावा बाबत काम करणे करिता धोरणात्मक निर्णय घेणेस्तव मा. सर्व साधारण सभेपुढे ठेवणे बाबत मा. आयुक्त महोदय यांनी आदेशित केले आहे.

त्यानुसार उपरोक्त कामास्तव धोरणात्मक निर्णय घेणे बाबत प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपुढे विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नागसेननगर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासाठी कॉलम व आर.सी.सी. चे छत (घुमट) बांधणेसाठी स. स. नगरसेवक श्री. गंगाधरजी गाडे यांच्या स्वेच्छा निधीतून बांधण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९२/३ :**

मा. आयुक्तांचे मंजुरीनुसार मालमत्ता अधिकारी प्रस्ताव सादर करीत आहे की, जिल्हा दुध संघ व्यवस्थापकीय संचालक ह्यांनी महानगरपालिका हद्दिमध्ये विविध ठिकाणी महानंदा दुध विकीय केंद्रासाठी ६x६ या आकाराचे स्टॉल्स लावण्याबाबत परवानगी मागितली आहे. सदरील प्रकरणास मा. पोलिस आयुक्त, मा. अति. शहर अभियंताव मा. उपसंचालक नगर रचना यांचे अभिप्राय प्राप्त झाले आहेत. त्यानुसार तीनही विभागाचे अभिप्रायातील अटी शर्तीचे अधिन राहून व्यवस्थापकीय संचालक, जिल्हा दूध संघ ह्यांना १६ स्टॉल्स साठी परवानगी देणे करिता प्रकरण सर्व साधारण सभे समोर मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका हद्दितील विविध ठिकाणी महानंदा दूध विक्री केंद्रासाठी ६x६ = ३६ चौ. फुट आकाराचे स्टॉल लावण्यास पोलिस आयुक्त, उपसंचालक नगर रचना महानगरपालिका औरंगाबाद व अतिरिक्त शहर अभियंता यांचे अभिप्रायातील व नेहमीच्या अटी व शर्तीस अधिन राहून व्यवस्थापकीय संचालक जिल्हा दूध संघ यांना १६ स्टॉलसाठी परवानगी देण्यास सर्वानुमत स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९३/४ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सर्वसाधारण सभा ठराव क्र. १९५/१० दिनांक २१-०१-२००० व २५-०१-२००० अन्वये पुरवणी विषय पत्रिकेतील विषय प्रशासनातर्फे मांडण्यात यावा असे निर्णय झाल्याने त्या निर्णयानुसार खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येते आहे.

श्रीमती मेहरुनिसा बेगम भ्र. वाजेदखॉन (रुग्ण), रा. सिल्कमिल्क कॉलनी, औरंगाबाद यांना ब्रेन ट्युमर असून त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची असून महानगरपालिका स्वेच्छानिधी नियमावलीप्रमाणे त्यांना ब्रेन ट्युमर या आजारासाठी आर्थिक मदत देण्याची तरतूद नाही. सदर नियमावली सुट देवून विषेश बाब म्हणून सदर रुग्णास १५०००/- रु. (रुपये पंधरा हजार फक्त) पर्यंत अर्थ सहाय्य करण्यास नियमात शिथिलता देण्यात यावे असे. मा. नगरसेवक श्री. विखारोद्दिन यांनी सुचविले आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रुग्ण श्रीमती मेहरुनिसा बेगम भ्र. जावेददखॉन रा. सिल्कमिल्क कॉलनी, औरंगाबाद यांना ब्रेन ट्युमर या आजाराच्या उपचारासाठी महानगरपालिका स्वेच्छानिधी नियमात शिथिलता देवून व विशेष बाब म्हणून स. स. यांच्या स्वेच्छानिधीतून त्यांना रु. १५,०००/- आर्थिक सहाय्य देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

व त्यास अनुमोदक म्हणुन स. नगरसेवक मी. हमीदोद्दीन ताबा व मा.स.श्री. अजीजखॉन नगरसेवक व श्री. त्र्यंबक तुपे, स. नगरसेवक यांनी केले आहे.

स्वेच्छाता निधी नियमावलीत ब्रेन टयुमर या आजारासाठी स. नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतुन आर्थिक मदत देण्याची तरतुद नाही. शिवाय संबंधीताने जे.जे. हॉस्पीटल मुंबई येथुन सद्याचे स्थितीचे उपचाराकरिता व शस्त्रक्रियेसाठी लागणाऱ्या खर्चाची वेद्याकिय प्रमाणपत्र सादर केलेले नाही. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**विषय क्र. १९४/५ :**

आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सर्वसाधारण सभा ठराव क्र. १८७/१२ दि. २१/१-२००० व २५-१-२००० अन्वये पुरवणी विषय पत्रिकेतील विषय प्रशासनातर्फे मांडण्यात यावा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

महापालिकेचे शाखा अभियंता श्री. के. आर. कुलकर्णी यांना महानगरपालिकेचे कामाची देखरेख करीत असतांना दि. २-०९-९६ रोजी अपघात होऊन त्यांच्या उपचारासाठी झालेल्या खर्चाच्या ८०% रक्कम परतावा म्हणुन अदा करण्यात आली आहे. औषधोपचारासाठी ८०% रक्कम परतावा उदा. करण्याचा नियम असला तरी श्री. के. आर. कुलकर्णी शाखा अभियंता यांना व मनपाच्या इतर सर्व कर्मचाऱ्यांना महापालिकेचे कामाचे देखरेख करताना अपघात झाल्यास उपचारासाठी येणाऱ्या खर्चाची १००% रक्कम अदा करण्यात यावी, असे श्री. नरसिंग ढगे, मा. सभापती स्थायी समिती यांनी सुचविले व श्री. संजय केनेकर मा. उप महापौर व श्री. संजय जोशी स. नगरसेवक यांनी अनुमोदन केले आहे.

वैद्यकिय देयक परतावा अधिनियमात अपघात झाल्यास मनपाच्या कर्मचाऱ्यांस १००% खर्चाची प्रतिपुर्ती करण्याची तरतुद नाही. फक्त कर्क रोगावर टाटा मेमोरियल मुंबई येथे झालेल्या खर्चास १००% परतावा देता येते. अपघातासाठी झालेला १००% खर्च एका

कर्मचाऱ्यास दिल्यास इतर कर्मचाऱ्यांनाही द्यावा लागेल याचा आर्थिक बोजा मनपाच्या प्रशासनावर पडेल तथापी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेचे शाखा अभियंता श्री.के.आर. कुलकर्णी यांना महानगरपालिका कामावर देखरेख करित असतांना अपघात होऊन त्यांना वैद्यकिय परताव्याची रक्कम ८०% ऐवजी नियमात शिथिलता देवुन विशेष बाब म्हणुन परताव्याची रक्कम १००% खर्चाची प्रतीपुर्ती करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९५/६ :**

उपसंचालक नगररचना यांचे कडुन प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अध्यक्षा जागृती महिला मंडळ, औरंगाबाद यांनी मो. औरंगपुरा येथील नाला जमिनृ त्यांचे संस्थेच्या विविध विकास उपक्रमाकरिता शहरात संस्थेची इमारत नसल्याचे समाजपयोगी उपक्रमा करिता जागा उपलब्ध व्हावी म्हणुन भाडेपट्टयावर मिळावी यासाठी मागणी केली आहे.

मो. औरंगपुरा मधुन वाहणाऱ्या नाल्याचे पुर्वे कडील भागात नाथसुपर मार्केट महानगरपालिकेने विकसीत कलेले असुन, उर्वरित नाला जमिनीसाठीचे प्रस्ताव पाहता आता २४.०० मी. वि.यो. रस्ता औरंगपुरा ते निरालाबाजार या रस्त्या चे पश्चिमेस गणपती विसर्जन विहीरी कडे जाणाऱ्या रस्त्यास लागुन रस्त्याचे उत्तरेकडील नाला जमिन उपलब्ध असुन तो नालाजमीन हया संस्थेस देता येईल मंजुर व वि.यो. या मध्ये हया नालाजमिनीचा नैसर्गिक पाणी प्रवाह म्हणुन निर्देश केलेला आहे. तर प्रारुप वि.यो. आरक्षण क्र. ६८ ने "खेळाचे मैदान" करिता आरक्षित आहे.

महापालिकेचे प्रचलित धोरणानुसार, शहर अभियंता यांचेकडुन या नालाजमिनी करिता सध्या कोणतेही नियोजन नसल्याचे विचारात घेता नालाजमिन प्रदान करण्याचे कार्यवाही अंतर्गत इतर अटी व शर्तीस पात्र राहुन शासन मान्यता घेऊन सदरील नाला जमिन संस्थेस दिर्घमुदतीवर भाडैपट्टयाने देण्यात येईल.

करिता वर नमुद नालाजमिन संस्थेस भाडेपट्टयावर देण्याचे कार्यवाहीना प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मंजुर वि.यो. नुसार हया नालाजमिनीचे वापरात किरकोळ फेरबदल प्रस्तावित करुन हया नालाजमिनीच्या भागाचा वापर "जागृती महिला मंडळ" करिता म्हणुन दर्शवावा लागेल यापुर्वीचे नालाजमिनी प्रदान करण्याचे प्रकरणी शासनाने दिलेल्या निर्देशनुसार वरील प्रमाणे मंजुर वि.यो. मध्ये किरकोळ फेरबदल करणे. आवश्यक असुन त्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदलाची कार्यवाही करावी लागेल.

वर प्रस्तावित केल्याप्रमाणे नालाजमिन भाडे पट्टयावर देण्याचे प्रस्तावास सर्वसाधारण सभेत मान्यता दिल्यास त्यानुंषगाने सदरील नालाजमिनीचे वापरात फेरबदल प्रस्तावित करुन मंजुर वि.यो. मध्ये नैसर्गिक पाणी प्रवाहचे वापराऐवजी "जागृती महिला मंडळ औरंगाबाद" करिता म्हणुन हया नालाजमिनीचा निर्देश करणे बाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदलाचे कार्यवाहीचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

प्रस्ताव मान्यतेनंतर प्रस्ताव संबंधाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वयेच्या कार्यवाहीतंर्गत प्राप्त सुचना/ हरकतीचा विचार करुन प्रस्ताव

अंतिम मान्यतेसाठी शासनास सादर करण्याचे सर्व अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात येतील.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगपुरा निराला बाजार या २४.०० मी.रुंद विकास योजना रस्त्याचे पश्चिमेस गणपती विसर्जन कडे जाणाऱ्या रस्त्याला लागुन रस्त्यास उत्तरेकडील नाला जमिनीवर मंजुर विकास योजनामध्ये नाला जमिनीच्या नैसर्गिक पाणी प्रवाह आणि प्रारुप विकास योजनामध्ये आरक्षण क्र. ६८ खेलाचे मैदानाकरिता आरक्षित आहे सदर जमिन जागृती महिला मंडळ औरंगाबाद यांना प्रदान करण्यासाठी मंजुर विकास योजनेनुसार या नाला जमिनीच्या वापरात महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदल करुन सदर नाला जमिनीच्या भागाचा वापर "जागृती महिला, मंडळ औरंगाबाद" असा दर्शवुन सदर नाला जमिन त्यांना भाडेपट्टयाने नेहमीच्या अटी व शर्तीस पात्र राहुन प्रदान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच सदर नाला जमिनीच्या संदर्भात महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदलाच्या कार्यवाही अंतर्गत प्राप्त सुचना/ हरकतीचा विचार करुन प्रस्ताव अंतिम कार्यवाहीसाठी शासनाकडे सादर करण्याचे सर्व अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९६/७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रारुप विकास योजनेमध्ये आ.क्र. ६८ खेळाचे मैदान या शिर्षकाखाली आरक्षित असलेला गणेश विसर्जन विहीर मैदानाच्या पुर्वेस व पुलाच्या दक्षिणेस असलेल्या नाल्याची जागा मंगल कार्यालय म्हणुन विकसित करावी व नाल्याचा खेळाचे मैदान म्हणुन उपयोगी होणार नसल्याने प्रारुप वि.यो. मधुन नाल्याचा भाग वगळुन मंगल कार्यालय बांधण्यात यावे येणे करुन जनतेला, मंगलकार्यालयाची मापक दरात सुविधा उपलब्ध होईल. व मनपाचे उत्पन्नाचे साधन कायमचे होईल. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : सौ. लता दलाल
अनुमोदक : श्री. नरसिंग ढगे
दि. १८-०१-२०००

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रारुप विकास योजनेमध्ये गणेश विसर्जन विहीर मैदानाच्या पुर्वेस व पुलाच्या दक्षिणेस असलेली नाल्याची जागा आरक्षण क्रमांक ६८ खेळाचे मैदान यासाठी आरक्षित केलेली असुन याच आरक्षणापैकी जागृती महिला मंडळास जागा प्रदान करण्यास व मा.प्रा.व.न.र. अधि १९६६ चे कलम ३७ अन्वये गौण फेरबदल करण्यास मान्यता दिलेली असल्याने जागृती महिला मंडळ यांना प्रदान करण्यात येणाऱ्या जागे व्यतिरिक्त उर्वरित आरक्षणाच्या जागेत आरक्षण क्र. ६८ खेळाचे मैदान ऐवजी महानगरपालिकेचे मंगल कार्यालय बांधण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदल करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९७/८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहर हे ऐतिहासिक शहर आहे. या शहरात पानचक्की बिबिका मकबरा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय, मौलाना अब्दुल कलाम आझाद रिसर्च सेन्टर वेरुळ, आणि अजिंठा लेण्या आहेत हे पाहण्यासाठी देशी आणि विदेशी पर्यटक येतात. जिल्हा अधिकारी कार्यालय समोरिल साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांचा भव्य पुर्णकृती पुतळा महानगरपालिकेने बसविलेला आहे. याच चौकातुन विभागीय कार्यालय गेस्ट हाऊस वरिल सर्व प्रेक्षणीय ठिकाणी जाण्यासाठी हा एकच मार्ग आहे. या चौकात शासकीय अनुदानातुन १०० फुट उंच हायमास्ट पोल उभा करुन या भागात रोषनाई करण्यात यावी. प्रस्ताव सर्व साधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. महादेव सुर्यवंशी
अुनमोदक : सौ. लता दलाल
दिनांक : १-२-२०००

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जिल्हा अधिकारी कार्यालय समोरिल साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या पुर्णकृती पुतळयाजवळील चौकात शासकीय अनुदानातुन १०० फुट उंच हायमास्ट पोल उभा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९८/९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, विशेष भु.संपादन अधिकारी विशेष घटक औरंगाबाद यांनी मंजुर विकास योजना औरंगाबाद मधील आरक्षण क्र. ६४ वाचनालय व आरक्षण क्र. ६५ भागशः आरोग्य केंद्र या आरक्षणाचा भुसंपादन प्रकरणी त्यांचा विभाग क्र. एस.एल.अे.ओ./२अे/१/८३ दि. १०-३-९५ नुसार अंतिम निवाडा जाहिर केला. हया निवाडयामध्ये नगर भुमापन क्रमांक १७६८४/पी ज्याचे क्षेत्र १३१३१.४ चौ.मी. असुन त्याचे मालक श्री. उत्तमराव नारायणराव जाधव व इतर असुन त्यांच्या बाधीत मिळकतीची किंमत निवाडयाप्रमाणे रु. ६५,७२,२६६/- ठरविण्यात आली असुन ही किंमत जमीन मालकास अदा करुन ताबा घेणे आवश्यक आहे. सदरील मोबदल्याची रक्कम ही संबंधीत जमिन मालकांना दिल्यानंतर संबंधीतांनी महानगरपालिकेस ताबा द्यावा श्री. उत्तमराव नारायणराव जाधव हे मयत असल्याने त्यांचे कायदेशीर वारसाची नगर भुमापन कार्यालयाच्या आखीव पत्रिकेत नोंद झाली आहे. त्यांनाच मोबदल्याची रक्कम सर्व वारसाचे सम्मतीने अदा करावी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.मो. अब्दुल रऊफ
अनुमोदक : श्री. हमीदोद्यीन ताबा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद मंजुर विकास योजनेनुसार आरक्षण क्र. ६४ वाचनालय व आरक्षण क्र. ६५ भाग आरोग्य केंद्र या आरक्षणाचा भुसंपादन प्रकरणी विशेष भुसंपादन आधिकारी विशेष घटक औरंगाबाद यांनी अंतिम निवाडा जाहिर केलेला असल्याने त्या जमिनीचे मालक मयत झालेले असल्यामुळे सदर आरक्षणात बाधित झालेल्या संपुर्ण निळकतीचे अंतिम निवाडयाप्रमाणे निश्चित करण्यात आलेली व प्रस्तावात नमुद केलेली

मोबदल्याची रक्कम नगर भुमापन कार्यालयाचे आखीव पत्रिकेतील नोंदी तपासुन सदर मिळकत धारकांनी आरक्षणाने बाधीत जागा ताब्यात घेवुन नियमाप्रमाणे मोबदल्याचे रक्कम एक रक्कमी हयांचे कायदेशीर वारस यांना अदा करण्यास सर्वानुमते मंजरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९९/१० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, बीड येथे सार्वजनिक जनहिताचा सामजिक प्रबोधन मेळावा होणार आहे. त्याठिकाणी आरोग्य व स्वच्छता यासाठी व्यवस्था व्हावी. म्हणुन व तेथे सहा लाखाचा जनसमुदाय जमणार असल्याने आपल्याकडील व्हॅक्युम एम.टी.आर. तीन ते चार दिवसासाठी रु. ५०००/- नाममात्र भाडयावर देण्यास प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. अफसरखॉन यासीनखॉन
श्री. गौतम खरात
अनुमोदक : श्री. महादेव सुर्यवंशी, श्री. अजीजखॉन गणीखाँन,
श्री. गौतम लांडगे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बीड येथे सपन्न होणाऱ्या सार्वजनिक जनहित सामाजिक प्रबोधन मेळाव्यात हजर राहण्यासाठी जमनाऱ्या जनसमुदायासाठी आरोग्य व स्वच्छता ही बाब लक्षात घेवुन औरंगाबाद महानगरपालिकेचे व्हॅकुम एम्टीअर बिड येथे ३-४ दिवसासाठी रु. ५०००/- नाममात्र भाडे आकारुन पाठविण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २००/११ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, फुलेनगर (उस्मानपुरा) भागातुन वेदांन्त कडुन येणारा विकास योजनेतील रस्त्यामुळे बाधीत होणाऱ्या सर्व कुटुंबाचे पुनर्वसन व्हावे म्हणुन समाज मंदिरा जवळील जागेवर बहुमजली इमारत बांधुन प्लॉटस स्वरुपात त्यांच्या निवासाची सोय करुन देण्यात यावी. या रहिवाशीयांची सहकारी गृ.सं. स्थापन करुन तळमजल्यावर दुकाने उभारुन येणाऱ्या उत्पन्नातुन स.गृ. निर्माण संस्थेची देखभाल करणे योग्य राहील. सदर घरे दिर्घ मुदतीच्या लिजवर देण्यात यावीत. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्रीमती अलका पाटील
श्री. प्रकाश निकाळजे
अनुमोदक : श्री. अभिमन्यु भालेराव
सौ. शंकुतलाबाई धांडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, फुलेनगर (उस्मानपुरा) भागात वेदांन्त कडुन येणाऱ्या विकास योजना रस्त्यामुळे बाधीत होणाऱ्या सर्व कुटुंबाचे पुनर्वसन होणाऱ्यासाठी समाजमंदिराच्या जवळील जागेवर बहुमजली इमारत बांधण्यास व तळमजल्यावर दुकाने आणि वरच्या मजल्यावर निवासाची सोय करुन तेथील रहिवाशांना गृहनिर्माण संस्था स्थापनकरुन त्यांना सदर घरे दिर्घ मुदतीच्या लिजवर देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०१/१२ :**

गेल्या १० ते १५ वर्षा पासुन काम करणारे हंगामी कामगारांना अद्याप कायम स्वरुपी गेलेले नाही. त्यांना मिळणारे दैनिक वेतन फारच कमी आहे.

तसेच ५ वा वेतन आयोग लागु झाल्यामुळे कायम कामागाराच्या पगारात १२०० रु. वाढ झाल्यामुळे मासीक पगार ४५०० रुपये झाला आहे.

पंरतु हंगामी कामगारांना मासीक वेतनापोटी १७०० रुपये मिळतात यात प्रचंड तफावत आहे तरी हंगामी कामगारांना ६५ रु. ऐवजी ९० रु. दैनिक वेतन १ एप्रिल २००० पासुन लागु करावे कार्यवाही व्हावी.

सुचक : श्री. महादेव सुर्यवंशी, श्री. संजय केनेकर, श्री. संजय जोशी,
श्री. भगवान घडामोडे

अनुमोदक : श्री. गौतम लांडगे, श्री. नरसिंग ढगे, श्री. अफसरखॉन
श्री. विकास जैन सौ. शिलाबाई गुंजाळे,
श्री. प्रभाकर विधाते, श्री. अब्दुल रऊफ

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हंगामी कामगारांना दैनिक वेतन रु. ६६५ ऐवजी ९० देण्यांस व हे दैनिक वेतन रुपये १ एप्रिल २००० देण्यांस व स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०२/१३ :**

महानगरपालिकेतील शिक्षण विभागातील/प्रकल्प विभागातील/बालवाडी/आंगणवाडी शिक्षिकांना ७००/-रु मानधन दिले जाते राज्य शासनाच्या आंगणवाडी/बालवाडी शिक्षिकांना १५००/- मानधन देण्यात येते आहे. म्हणुन राज्य शासनाच्या शर्तीवर महानगरपालिकेतील आंगणवाडी/ बालवाडी शिक्षिकांना १५००/- रु. मानधन दिनांक १ एप्रिल २००० पासुन लागु करावे.

सुचक : श्री. महादेव सुर्यवंशी, श्री. अफसरखॉन, श्री. संजय जोशी,
श्री. संजय केनेकर, श्री. भगावन घडामोडे, श्री. प्रभाकर विधाते

अुनमोदक : श्री. गौतम खरात, श्री. नरसिंग ढगे, श्री. विकास जैन,
सौ. शिलाबाई गुंजाळे, श्री. अब्दुल रऊफ, श्री. गौतम लांडगे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकातील आंगणवाडी/बालवाडी-शिक्षिकांना राज्य शासनाच्या अंगणवाडी/बालवाडी शिक्षिका प्रमाणे रु. १५००/- मानधन प्रतिमहा दिनांक १ एप्रिल २००० पासुन लागु करण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०३/१४ :**

बारापुल्ला गेट लगत उत्तरेकडील नदीवरील १००X२०० ची जागा ही धोबी घाट वापरासाठी आरक्षित केलेली आहे. मंजुर रेखांकनानुसार जिम्नेशियम हॉल, व्यायाम शाळा वाचनालय किंवा खुल्या जागे संदर्भातील तत्सम वापरासाठी उपयोगात आणता येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर नागरी सहकारी बँक(मर्यादित) औरंगाबाद हि बँक मागास वर्गीयांची मागास वर्गीयांनसाठी असलेली बॅक आहे. बॅकेजवळ स्वत:हाची जागा घेण्यासाठी पुरेसे

आर्थिक बजट नाही. ज्याप्रकारे औरंगपुरा येथील दिलेली आहे. तसेच सिटी चौक येथील बॉम्बे मर्कन्टाल बॅकेला नाल्यावरील जागा दिलेली आहे. त्याच प्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर नागरी सहकारी सहकार बॅक (मर्यादित) औरंगाबाद. या बॅकेसाठी वरील जागा देण्यांत यावी. ही विनंती.

सुचक : श्री. सौ. शकुंतला धांडे, श्री. गौतमभाई खरात

अनुमोदक : श्री. रशिदखॉन (मामु), श्री. अफसरखॉन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बारापुल्ला गेट लगत उत्तरेकडील नदीवरील १००X२०० फुट धोबीघाटसाठी आरक्षित असलेली जागा प्रस्तावात नमुद केल्या प्रमाणे इतर बॅकांना ज्या धर्तीवर जागा दिली त्याच धरर्तीवर डॉ. बाबासाहेब आबेंडकर नागरी सहकारी बॅक (मर्यादित औरंगाबाद) या बॅकेस देवुन व प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०४/१५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येते की, मिलिंदनगर (आर्धे) उस्मापुरा हे नाल्याच्या शेजारी असल्याने दरवर्षी नाल्यात पुर येतो पुर असल्यामुळे त्या ठिकाणी घरामध्ये पुराचे पाणी शिरते त्यामुळे त्या लोकांचे आर्थिक नुकसान होते. यापुर्वी महानगरपालिकेच्या वतीने सदरील वतीने सदरील लोकांना महानगरपालिकेने त्यांना आर्थिक मदत केलेली आहे. परंतु त्यांचे कायम पुर्नवसन व्हावे म्हणुन त्यांच्या झोपडपट्टीचे रुपांतर आदर्श स्लम म्हणु करण्यांत यावे. कारण हे लोक दारीद्र रेषेखाली जीवन जगणारे लोक आहेत. त्यांच्याकडे घर बांधण्याची कुव्वत नाही. म्हणुन सर्वाना एक खोली एक स्वच्छता गृह उदा. नळ पाणी, विद्युतकरण, जलगृहनिसारण इत्यादी सर्व सोयीयुक्त पुढील आर्थिक वर्षात त्याची तरतुद करण्यांत यावे.

सदरील खर्च महानगरपालिकेच्या फंडातुन विशेष बाब म्हणुन करण्यांत यावा म्हणुन प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. प्रकाश निकाळजे, श्री. हमीद ताबा

अनुमोदक : श्री. गौतम लांडगे, श्री. अब्दुल रऊफ

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मिलिंदनगर भागशः उस्मानपुरा ही वसाहत नाल्याच्या शेजारी असल्याने व दर वर्षी या नाल्यास पुर येत असल्याने त्या ठिकाणी लोकांच्या पुनर्वसनाच्या दृष्टीकोनांतुन या झोपडपट्टीमध्ये रुपांतर करण्यास व त्यांना एक घर स्वच्छतागृह व सार्वजनिक सुखसोयी उपलब्ध करुन देण्यांस पुढील आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकास महानगरपालिकेच्या फंडातुन तरतुद करण्यांसबंधी प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०५/१६ :**

औरंगाबाद महानगरपालिके दिनांक ३१-५-९७ च्या सर्वसाधारण सभेत ठराव क्र. ३१/२९ नुसार औरंपुरा येथील आरक्षण क्रमांक २७९ दुकान केंद्र मधील नाला जमीन श्री.

शिताई सेवा ट्रस्ट मुंबई यांना देण्यांचा ठराव पारित केला. ज्या वेळी सदरचा ठराव पारित केला तेव्हा या आरक्षणासाठी "समुचित प्राकिरण" म्हणुन औरंगाबाद महानगरपालिका होती त्यामुळे या जागेचा विकास करतांना शासन निर्णय क्रमांक टी.पी.एम-१०९४/सि.आर.-१४/९४ नवि-९ दिनांक ७-४-१९९४ नुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १५४ चे निर्देशातील अटी बंधनकारक ठेवण्यात आल्या. आता शासनाचे आरक्षण क्रमांक २७९ दुकान केंद्रा बाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदल शासन निपोवि क्रमांक टी.पी.एम-३० ९९/१ प्र.क्र. ३/९९ नवि-३० दिनांक ८ जुलै १९९९ नुसार मंजुर केला असुन त्यामध्ये स्वतः श्री. शिवाई सेवा ट्रस्ट मुंबई "यांना" समुचित प्राधिकरण" म्हणुन निश्चित केले आहे. आता सदरील जागेबाबत सुमुचित प्राधिकरण महानगरपालिकेच्या ऐवजी स्वतः श्री. शिवाई ट्रस्ट असल्याने त्यांना उपरोक्त दिनांक ७-४-१९९४ च्या शासन निर्णयातील अटी व शर्ति बंधनकारक नाहीत. तरी कायदेशी चौकटीत समुचित निर्णयातील अटी व शर्ती बंधनकारक नाहीत. तरी कायदेशी चौकटीत समुचित प्राधिकरणात झालेल्या बदलामुळे दिनांक ३१-५-९७ च्या ठरावातील अटी वगळण्यात याव्यांत व ज्या प्रमाणे औरंगाबाद जिल्हा मराठी पत्रकार संघास " "पत्रकार भवन" करिता ज्या दराने नाला जमीन भाडेपट्टयाने देण्याचा ठराव पारित केला त्याच दराने "शिवाई सेवा ट्रस्ट मुंबई" यांना भाडयाची रक्कम आकारण्यात यावी.

सुचक : श्री. गिरजाराम हाळनोर
अनुमोदक : श्री. महादेव सुर्यवंशी, श्री. गजानन बारवाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, योजनेनुसार आरक्षण क्र. २८० दुकाने केंद्रसाठी आरक्षित असलेली नाला जमिन श्री. शिवाई सेवा ट्रस्ट मुंबई यांना यांना देण्याबाबत निर्णय झाला असुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदलांचा प्रस्ताव शासनाने मंजुरी दिलेली आहे. व त्यामध्ये समुचित प्राधिकरण श्री. शिवाई सेवा ट्रस्ट यांना निश्चित करण्यात आले असल्याने दिनांक ३१-५-९७ चा ठराव क्र. ३१/२९ मध्ये केलेल्या अटी वगळयास आणि औरंगाबाद जिल्हा पत्रकार संघास ज्या दराने जागा भाडयाने देण्याचा ठराव मंजुर झाला आहे. त्याच दराने श्री. शिवाई ट्रस्ट मुंबई यांना भांडे आकारणी करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०६/१७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जे.जे. स्कुल ऑफ परफॉर्मिंग आर्टस संस्थेच्या वतीने औरंगाबाद येथे प्रथमच अखिल भारतीय भरनाट्टय फेस्टीवल संत एकनाथ रंगमंदिरमध्ये दिनांक ११,१२, व १३ जानेवारी आयोजित करण्यात आला आहे. या फेस्टीवल मध्ये देशातील प्रसिध्द नृत्य कलाकार व संगीतकार भाग घेणार आहेत. त्यासाठी रक्कम रु. ३.०० रुपये ३.५ लाख खर्च अपेक्षीत आहेत. त्यासाठी करिता महानगरपालिकेतर्फे रक्कम रु. ५०,०००/- (पन्नास हजार) आर्थिक मदत करण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : डॉ. श्री. भागवत कराड
श्री. भगवान घडामोडे
अनुमोदक : श्री. सुभाष टाकळकर
श्री. राजकुमार बचाटे, श्री. संजय जोशी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जे.जे. स्कुल ऑफ परफॉर्मिंग आर्टस संस्थेच्या वतीने औरंगाबाद येथे अखिल भारतीय भरनाट्यम् फेस्टीवल कार्यक्रम आयोजित करण्यांत आला होता. यासाठी सदर संस्थेस महानगरपालिका तर्फे रुपये ५० हजार आर्थिक मदत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०७/१८ :**

औरंगाबाद शहर हे सांस्कृतिक व ऐतिहासीक वारसा लाभलेले शहर आहे तसेच जागतिक नामवंत किर्तीचे शहर आहे. त्या निमित्याने औरंगाबाद महोत्सव समितीतर्फे औरंगाबाद महोत्स हा कार्यक्रम घेवुन आणखी भर घालणे आहे तरी या कार्यक्रमाचे प्रायोजकता महानगरपालिकेने स्विकाराने करिता प्रस्ताव सादर.

सुचक : श्री. विकास जैन, श्री. संजय जोशी

अनुमोदक : श्री. संजय केनेकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर हे सांस्कृतिक व ऐतिहासीक वारसा लाभलेले शहर असल्याने औरंगाबाद महोत्सव समिती तर्फे औरंगाबाद महोत्सव हा कार्यक्रम घेण्यासाठी औरंगाबाद महापालिकेने या कार्याक्रमाची प्रयोजकता स्विकारण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०८/१९ :**

मंजुर विकास योजना औरंगाबाद मध्ये नगर भुमापन क्रमांक १७३५२ व १७३५२/३ हया मिळकती आरक्षण क्र. ८७ (उस्मापुरा) दुकान केंद्र हया आरक्षणाने बांधीत होतात. हया आरक्षित जागे बाबत रितसर जमीन मालकाने दिलेल्या खरेदी सुचने बाबत सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन भुसंपादन कार्यवाही सुरु केली आहे. संबंधीत जमिन मालकाने दिलेल्या महानगरपालिकेस हया आरक्षणाचा विकास शासन निर्णय क्र. व्ही. पी.एस/१०९४/सी.आर.१४/९४ न.वि.-९ दिनांक ७-४-१९९४ अन्वये आरक्षणाचा खाजगी रितीने विकास करणे बाबतच्या शासन निर्णयानुसार परवानगी देण्यांची विनंती केली आहे. सदरील आरक्षणाला "दुकान केंद्र हया आरक्षणाबाबत उपरोक्त शासन निर्णयानुसार परवानगी देण्यांची विनंती केली आहे. देण्यांत यावी.

प्रारुप विकास योजन(सुधारणा) मध्ये हया जागेवर विकास योजना प्रकाशित करतांना ("गार्डन" हे आरक्षण प्रस्तावित होते. परंतु हरकती व सुचना हयाचा विचार करुन शासनाला प्रारुप विकास योजना सादर करतांना ("वाहनतळ" हे आरक्षण दुरुस्त सादर करण्यांत आले तथापी जमीन मालकाने मुळ मंजुर विकास योजनेतील "दुकान केंद्र" आरक्षणासाठी रितसर कायदेशीर खरेदी सुचना दिली व त्याच उद्देशासाठी भुसंपादन कार्यवाही चालु असल्याने समावेश आरक्षणांचा विकास करणेबाबत चालु असल्याने समावेश आरक्षणांचा विकास करणेबाबत उपरोक्त शासनाने निर्णयानुसार मुळ मंजुर विकास योजनेच्या आरक्षणाचा विकास करण्यांत यावा व त्याप्रमाणे विकास योजनेस शासन स्तरावर मंजुरी देतांना योग्य तो बदल अंतिम मंजुरीत करुन घेणे बाबत शासनास कळविण्यात यावे.

सुचक : श्री. नरसिंग मु. ढगे

अनुमोदक : श्री. विठ्ठल जाधव

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मंजुर विकास योजनानुसार आरक्षण क्र. ८७ दुकान केंद्र या आरक्षणाचे बांधीत मिळकत नगर भु.मापन क्रमांक १७३५२ व १७३५२/३ या मिळकतीच्या संदर्भात भु. संपादनाची कार्यवाही चालु असुन प्रारुप विकास योजना प्रसिध्द केली त्यामध्ये या जागेत उदयानाचे आरक्षण प्रस्तावित केले होते. आणि शासनास सदर प्रारुप विकास योजना सादर करतांना वाहन तळ हे ठेवलेले आहे. मंजुर विकास योजनामध्ये सदर आरक्षण दुकाने केंद्र योजनेसाठी आरक्षीत असतांना प्रस्ताव दर्शविल्या प्रमाणे दिनांक ७-४-९४ च्या शासन निर्णय प्रमाणे समावेश आरक्षणाचा माध्यमातुन दुकाने केंद्राचे आरक्षणाचा विकास करण्यास अर्जदारास परवानगी देणे व त्या अनुषंगाने प्रारुप विकास योजनेत बदल करण्यासाठी शासनास कळविण्यास सर्वानुनमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०९/२० :**

अंकुर शिक्षण प्रसारक संस्थेची शासन मान्य शाळा शिवाजीनगर गारखेडा परिसरात चालु आहे. सदर संस्थेच्या मालकीची इतरत्र कोठेही जागा नाही. सदर परिसरात शाळेसाठी जागेची अत्यंत आवश्यकता आहे. कारण त्या परिसरात ही एकमेव कन्याशाळा आहे. सध्या गारखेडा परिसरातील सर्वे नं. ५१ मधील आरक्षण क्र. १६२ महानगरपालिकेच्या मालकीची जागा शाळेसाठी आरक्षित व ताब्यात घेतलेली आहे.

तरी आपणास विनंती की आपण सदर वर्षासाठी नाममात्र भाडे पट्टेवर (लिजवर) देण्यासाठी सर्वसाधारण सभेत प्रस्ताव ठेवावा.

अंकुर शिक्षण प्रसारक संस्था औरंगाबाद या संस्थेची ध्येय आणि उद्दीष्टे हे साध्य विकासासाठी व शैक्षणिक विकासासाठी आहेत. करिता ही जागा देण्यात यावी ही विनंती.

सुचक : श्री. विठ्ठल जाधव, श्री. ज्योत्सना हिवराळे
श्री. गणेश वानखेडे श्री. अश्पाक सलामी
श्री. गिरजाराम हाळनोर

अनुमोदक : श्री. कचरु नवपुते, श्री. गजानन बारवाल,
श्री. संजय जोशी श्री. विकास जैन,
श्री. जयवंत ओक

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. गारखेडा येथील स.नं ५१ मधील आरक्षण क्रमांक १६२ या शाळेसाठी आरक्षीत असलेल्या जागेपैकी १५५१ चौ.मी. जागा ९९ वर्षासाठी अंकुर शिक्षण प्रसारक मंडळ यांना भाडेपट्टयाने देणे बाबत प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१०/२१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, श्री. गजानन महाराज मंदिर समोरिल श्री. गजानन महाराज मंदिर ते पुंडलिक नगर या रस्त्यावर भाजी विक्रेत्यांना भाजीपाला विक्री करण्यासाठी या भागात भाजी मंडई नसल्यामुळे या भागातील सर्व भाजी विक्रेते रोडवर हातगाडी लावतात. त्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना त्रास होतो. या भागातील भाजी

विक्रेत्यांची गैरसोय होते. परिसरातील नागरिकांना भाजीपाला खरेदी करण्यासाठी भाजी मंडईची अत्यंत आवश्यकता आहे.

या भागातील रहिवाशांची व भाजी विक्रेत्यांची अडचण विचारात घेता पुंडलिकनगर प्रभागात महापालिकेमार्फत भाजी विक्रेत्यांना भाडे तत्वावर जागा देणे बाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. विठ्ठलराव जाधव
अनुमोदक : श्री. नरसिंग ढगे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकातर्फे भाजी विक्रेत्यांना भाडे तत्वावर जागा देणे बाबत प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २११/२२ :**

औरंगाबाद शहराचे विकास योजनेमधील लक्ष्मणचावडी ते स्मशानमारोती पर्यंतचा कैलास स्मशान भुमी पर्यंतचा ८० रुंद रस्ता भुसंपादन करुन विकसित करण्यासाठी येणाऱ्या अति अडचणीमुळे अद्याप पावतो विकसित होऊ शकला नाही व हा रस्ता महत्वाचा असुन दिवसातुन ८-१० अंतयात्रा या रस्त्याने जात असतात सद्याचा रुंदीचा रस्ता अपुरा पडतो तरी या भागातील नागरिकांनी या बाबत सहकार्याची भुमिका घेऊन दोन्ही बाजुकडुन प्रत्येकी १० जागा देण्याची तयारी दाखविली आहे. त्यामुळे हा रस्ता सद्याची रुंदी विचारात घेता किमान ५० ते ६० रुंदीचा रस्ता उपलब्ध होऊ शकता शासनाकडे सादर केलेल्या विकास योजने मध्ये ही हा रस्ता ६० चा आहे.

करिता प्रस्तावानुसार महानगरपालिकेस व जनतेस खालील फायदे होऊ शकतील.

१) अस्तित्वातील ३० रुंदीचे रस्त्यामुळे तेवढया क्षेत्राच्या जागेस मोबदला द्यावा लागणार नाही.
२) संबंधीत निवेदन देणारे जागा देतांना १०-१० दोन्ही बाजुने विना मोबदला देणार असल्याने २० रुंदीचा मोबदलाची द्यावा लागणार नाही.
३) रस्त्याची जागा मिळकत धारक स्वत:हुन रिकामी करुन देणार असलेले जागा रिकामी करुन घेणेचा खर्च महानगरपालिकेस द्यावा लागणार नाही.

तरी सदर प्रस्ताव सर्वसाधारण सभेने मंजुर करावा.

सुचक : श्री. व्ही.व्ही. देशमुख
अनुमोदक : श्री. भगवान घडामोडे, श्री. मोहसीन अहमद

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहराच्या विकास योजनेमधील लक्ष्मणचावडी ते स्मशानमारोती पर्यंत ८० फुट रुंद विकास रस्त्याचे प्रारुप विकास योजनेमध्ये हा ६० फुट ठेवलेला आहे. व या भागातुन लोक दोन्हीही बाजुने १०-१० फुट जागा विना मोबदल देण्यांस तयार असल्याने सदर विदयमान रस्त्याचे दोन्ही बाजुने १०-१० फुट जागा विना मोबदल जमिन घेवुन रस्ता रुंदीकरण करण्याच्या कामास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१२/२३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, गोपालनगर निपट निरंजन पहाडसिंग पुरा येथे जी महानगरपालिकेची जागा आहे. ती खुल्या जागेवर नागरिकासाठी बहुद्देशिय हॉल बांधण्यात यावा करिता प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पहाडसिंग पुरा निपट निरंजन येथे गोपालनगर या रेखांकनाच्या खुल्या जागेवर बहुउद्देशिय हॉल बांधणेस सर्वानुमते मंजुरी स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१३/२४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, दिनांक ६ डिसेंबर -९९ च्या प्रकरणात ज्या तीन छायाचित्रकारांचे कॅमेऱ्याचे नुकसान झाले आहे. त्यांना नगर सेवक स्वेच्छानिधीतुन १५ हजार रुपये पर्यंत आर्थिक मदत करावी विशेष बाब म्हणुन यास मंजुरी दयावी.

सुचक : श्री. गिरजाराम हाळनोर

अनुमोदक : श्री. अफसरखाँन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ६ डिसेंबर -९९ च्या प्रकरणात ज्या तीन कॅमेऱ्याचे नुकसान झाले आहे. त्यांना नगर सेवकांच्या स्वेच्छानिधीमधुन विशेष बाब म्हणुन रुपये १५,०००/-रु.(पंधरा हजार रु.) आर्थिक मदत देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१४/२५ :**

औरंगाबाद शहर मंजुर विकास योजनेतील सुत गिरणी ते शिवाजीनगर मार्गे जानकी हॉटेल या ८० फुट रुंदीच्या रस्त्यात श्री. राजेंद्र पवार व इतर यांची जागा बाधीत झाली आहे. या रस्त्याच्या बाधीत जागेचा मोबदला त्यांनी घेतला नाही. तरी त्याच्या विनंतीनुसार रस्त्याने बाधीत जागेच्या बदल्यात महानगरपालिकेच्या मालकीची सर्व्हे नं. ५२ गारखेडा येथील जागा जमिन मालकास देण्यांत यावी व प्रस्ताव मंजुरीनुसार आयुक्त महानगरपलिका, औरंगाबाद यांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

सुचक : श्री. प्रफुल्ल मालानी

अनुमोदक : श्री. नरसिंग ढगे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद मंजुर विकास योजनेनुसार सुतगिरणी ते शिवाजीनगर मार्गे जानकी हॉटेल रस्त्यास श्री. राजेंद्र पवार यांची जागा बाधीत होत त्यांनी या बाधीत जागेचा मोबदला घेतला नसल्याने त्यांना बाधीत जागेच्या मोबदल्यात महानगरपालिकाच्या मालकीची स.नं. ५३ गारखेडा मधील जमीन देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१५/२६**

स.न.९ मौजे जाधववाडी ता.जि. औरंगाबाद मध्ये आंबेडकरनगर नावाने झोपडपट्टी वस्ती झाली आहे.सदरच्या वस्तीत येथील काही नागरिकांनी अतिक्रमण करुन स्मशानभूमीही

बनवलेली आहे.औरंगाबाद महानगरपालिकेची ही घोषित झोपडपट्टी आहे.सदर झोपडपट्टीला स्लम कर लावलेला आहे.झोपडपट्टी बरोबरच स्मशानभूमी म्हणूनही जाहीर केलेली आहे.या झोपडपट्टीत स्मशानभूमी म्हणून जी जागा जाहीर केलेली आहे.(स.न.१०) मौजे जावधवाडी ता.जि.औरंगाबाद ही जागा शेख झैनोझीन ऊर्फ पाशु पिता महमंद शफी यांची आहे.या स्मशानभूमी मध्ये स.न. १० ची जागा आहे.या वस्तीचे मृतदेहाकरीता देण्यात आली आहे.करीता या जागा मोबदल्याची रक्कम संबंधितांस महानगरपालिकेतर्फे अदा करण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.अजीज खाँन.

अनुमोदक : श्री.विकास जैन.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स.न.१० मौजे जाधववाडी ही जागा स्मशानभूमीच्या वापरासाठी असल्याने सदर जमिनीच्या मालकास मोबदल्याची रक्कम महानगरपालिका तर्फे देण्यासंबंधी कार्यवाही करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१६/२७**

प्रभाग क्र. ६६ क्रांतीचौक,दक्षिण श्रेयनगर विभागात कित्येक वर्षापासून सिटी सर्व्हे नंबर १६०३१ /१/ ७ प्लॉट नं. १२ मध्ये सार्वजनिक विहीर आहे.सदरील विहीरीत श्री. गणेश विसर्जन आणि देवी विसर्जन केले जाते आहे.हया भागात ही एकमेव विहीर आहे.

सदर विहीरीची जागा महानगरपालिकाने ताब्यात घेवून देखभाल करावी अशी मागणी तेथील रहिवाश्यांनी माझ्याकडे केली आहे.

करीता महानगरपालिका सर्वसाधारण सभेत ठराव मांडून दक्षिण श्रेयनगर मधील सर्व्हे नंबर १६०३१ /१/७ प्लॉट नं. १२ ही जागा आपल्या ताब्यात घ्यावी ही विनंती.

सुचक : श्री.गजानन बारवाल

अनुमोदक : श्री.अविनाश कुमावत.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.६६ क्रांतीचौक दक्षिण श्रेयनगर भागात सि.स.नं. १६०३१ / १/ ७ प्लॉट नं. १२ मध्ये असलेली सार्वजनिक विहीर महानगरपालिकेने ताब्यात घेण्याची कार्यवाही करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१७/२८**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,मुकुंदवाडी गृहनिर्माण सहकारी संस्था औरंगाबाद ही संस्था नोंदणीकृत असून संस्थने केशरसिंगपुरा येथील सर्व्हे नं. १५ साईट नं. ८९ मधून २ एक्कर ६ गुंठे जमीन १९७२-७३ मध्ये घेतली आहे.

संस्थेने ही जागा शहराचा विकास आराखडा (डेव्हलपमेंट प्लॅन) मंजुर होण्याची घेतलेली आहे.ही जागा आरक्षणात दाखविली असून आरक्षणा मधून वगळून घेण्याकरीता संस्था ७६-७७ पासून प्रयत्न करीत आहे.शासनाचे पत्र क्र. २टी. पी.एस.३०७७ / २७० यु.डी.-७ अर्बन डेव्हलपमेंट ॲण्ड पब्लीक हेल्थ डिपार्टमेन्ट मंत्रालय ४०००३२ दिनांक ४ जानेवारी १९७८अन्वये त्या वेळच्या नगर परिषद औरंगाबाद यांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत

की,संस्थेस आयुक्त कार्यालयाजवळील रोशन गेट मधील जी जमीन विकसित करण्यात येत आहे.त्या जमीनीमधून म्णजे सी.टी.एन ११ ३१३ (सर्व्हे नं.५६) मधून पर्यायी जागा देण्यात यावी असे शासनाचे पत्र सोबत जोडले आहे.

महानगरपालिकेकडे आज सर्व्हे नं. ५६ मधून देण्याकरीता जागा उपलब्ध नाही.संस्थेची जी जागा आरक्षणात आहे व महानगरपालिकाने जी जागा संपादन करण्याचे ठरविले आहे ती जागा आरक्षणामधुन वगळण्यात यावी.

सुचक : श्री. विठ्ठलराव पाटील जाधव.

अनुमोदक : श्री.नरसिंग ढगे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुकुंदवाडी गृहनिर्माण संस्था औरंगाबाद या संस्थेस महानगरपालिकाकडे सं.न.५६ मधून पर्यायी जागा देण्याकरीता उपलब्ध नसल्याने संस्थेची जागा आरक्षणातून वगळण्या बाबत योग्य ती कार्यवाही करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१८/२९**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र. ४८ अजबनगर,मिलिंदनगर विभागात महानगरपालिकेचे अभ्यासिका केंद्र आहे.सदरील विभागात तेथील रहिवाश्यांची नोंदणीकृत मातृभूमी प्रतिष्ठान ही सेवाभावी संस्था कार्यरत आहे.सदरील अभ्यासिका केंद्र चांगल्या पध्दतीने चालविण्यास व नागरिकांना सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यास तेथील मातृभूमी प्रतिष्ठान ही संस्था तत्पर आहे.करीता मिलिंदनगर येथील महानगरपालिकेचे अभ्यासिका केंद्र मातृभूमी प्रतिष्ठान सेवाभावी संस्थेच्या ताब्यात नाममात्र दराने देण्यात यावी ही नम्र विनंती.

सुचक : श्री.गिरजाराम हाळनोर.<br>
श्री. महादेव सुर्यवंशी<br>
श्री.प्रभाकर विधाते

अनुमोदक : श्री.गजानन बारवाल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.४८ अजबनगर,मिलिंदनगर भागात महानगरपालिकाचे अभ्यासिका केंद्र मातृभूमी प्रतिष्ठान सेवा भावी संस्थेस चालवण्यास नाममात्र भाडयाने देण्यास सर्वानुमते स्विकृतीसही मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१९/३०**

गुलाबवाडी घाटी ही वसाहत आदर्श स्लम म्हणून घोषित केली आहे.त्याप्रमाणे तेथे आवश्यक ती कामे पूर्ण होऊन त्या वसाहतीचे उद्‌घाटन झाले आहे.

सदर गुलाबवाडी या वसाहतीस "भैय्यासाहेब आंबेडकर आदर्श वसाहत "असे नामकरण करावे करीता प्रस्ताव सादर.

सुचक : श्री.गौतम खरात<br>
श्री.प्रदीप जैस्वाल

अनुमोदक : श्री.अफसरखाँन<br>
श्री.अशपाक सलामी

**ठराव :**

सदरचा प्रस्ताव नामांतर कमिटीकडे पाठवण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२०/३१**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,भडकलगेट ते जुना बाजार या रस्त्याला "स्व रफिक शहबाज " (पत्रकार) यांचे नाव देण्यात यावे.

सुचक : श्री.अफसरखाँन<br>
श्री.यासीन खाँन

अनुमोदक : श्री.गौतम लांडगे.

**ठराव :**

सदरचा प्रस्ताव नामांतर कमिटीकडे पाठवण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

श्री.हमीदउद्दीन ताबा : वार्डातील छोटे-छोटे विकास कामे होण्याबाबत आदेशीत करावे.

मा.महापौर : आजच्या बैठकीत ज्या ज्या स.सभासदांनी सुचना मांडल्या आहेत.उदा.ड्रेनेज,पाणी इतर आवश्यक सोयी सुविधा तात्काळ पुरविण्यात यावे तसेच महापौर कार्यालयात स्वीय सहाय्यक हे पद शासनाच्या धोरणाप्रमाणे ३३% आरक्षणातून भरण्याबाबत विचार व्हावा.

याच बरोबर जण गण मन या राष्ट्र गिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत /- | स्वाक्षरीत /- |
| नगरसचिव | महापौर |
| महानगरपालिका,औरंगाबाद. | महानगरपालिका,औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १८-३-२००० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त. शनिवार दिनांक १८-३-२००० रोजी मा.महापौर श्री.सुदाम रामदास सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "कै.प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह "येथे सकाळी ११.४५ वाजता वंदेमातरम् या गीताने सुरु झाली. सभेला अधिकारी वर्ग तसेच खालील स.सभासद उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १) स.स.सौ.लोखंडे रुख्मनबाई खंडेराव | स.सदस्य |
| २) स.स.सौ.विमलबाई नंदकुमार मुंडलिक | --//-- |
| ३) स.स.सौ.शिलाताई सिताराम गुंजाळे | --//-- |
| ४) स.स.श्री.लांडगे गौतम लिंबाजी | --//-- |
| ५) स.स.श्री.बैनाडे कवरसिंग किसनसिंग | --//-- |
| ६) स.स.सौ.पद्मा बाबुराव शिंदे | --//-- |
| ७) स.स.श्रीमती पांचाळ चंपाबाई | --//-- |
| ८) स.स.श्री. फजलउल्लाखान अजमत उल्लाखान | --//-- |
| ९) स.स.सौ.नुरजहाँ बेगम अ.रहेमानखान | --//-- |
| १०) स.स.सौ.मोहासिना बिल्कीस विखारोद्दीन | --//-- |
| ११) स.स.श्रीमती जाहेदा बेगम म. जमीर | --//-- |
| १२) स.स.सौ.यशोदा धनंजय वाडेकर | --//-- |
| १३) स.स.श्री.स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतुबोद्दीन | --//-- |
| १४) स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल | --//-- |
| १५) स.स.श्रीमती अलका रमेश पाटील | --//-- |
| १६) स.स.श्री. रशिदखान (मामू) | --//-- |
| १७) स.स.सौ.सविता संजय आव्हाड | --//-- |
| १८) स.स.श्री.विखारोद्दीन पि खुद्बोद्यीन | --//-- |
| १९) स.स.श्री. राजकुमार बचाटे (मामा) | --//-- |
| २०) स.स.सौ.राधाबाई तळेकर | --//-- |

सौ.लता दलाल : केबल ऑपरेटर स्व.श्री.विठ्ठल सपकाळ यांचा नुकताच मागील आठवडयात निर्घुन खून करण्यात आला त्यांना सभागृहातर्फे ०२ मिनिटे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी तसेच या घटनेबद्दल निषेध म्हणून तसा ठराव करण्यात यावा.

श्री.रशिद खाँन (मामू) : यास माझे अनुमोदन आहे.तसेच श्री. सालम हिलाबी यांचाही खून झाला असून त्यांनाही श्रध्दांजली अर्पण करावी.

मा.महापौर : स्व.श्री.विठ्ठल सपकाळ व श्री.सालम हिलाबी यांचा निर्घुन खून झाला त्याबद्दल सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात येते.
(याचवेळी स्व.श्री.विठ्ठल सपकाळ व श्री.सालम हिलाबी यांना सभागृहातर्फे ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

श्री.रशिदखान (मामू) : ईद व होळी सणानिमित्त सर्व शहर वासीयांना शुभेच्छा तसा भावबंधकीचा ठराव सभागृहात संमत करण्यात यावा.शहरात तणाव निर्माण

होईल अशा चुकीच्या अफवा येत असून त्यामुळे निवडणुकीच्या कामकाजावर परिणाम होणार नाही याची दक्षता घ्यावी.योग्य प्रकारे निवडणूका पार पडेल याकडे प्रशासनाने लक्ष दयावे.

श्रीमती अलका पाटील : यास माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर : प्रथमतः सर्व जनतेला ईद तसेच होळी सणा निमित्त हार्दिक शुभेच्छा शहरातील वातावरण शांततामय राहील व योग्य प्रकारे निवडणूका पार पडतील याची प्रशासनाने काळजी घ्यावी.व कोरम अभावी आजची सभा तहकुब करण्यात येत आहे.

याच बरोबर जण गण मन या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत /- | स्वाक्षरीत /- |
| नगरसचिव | महापौर |
| महानगरपालिका,औरंगाबाद. | महानगरपालिका,औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २० एप्रिल,२००० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त. गुरुवार दिनांक २० एप्रिल,२००० रोजी मा.महापौर,श्री.सुदाम रामदास सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील "कै.प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे "येथे सकाळी ११.३० वाजता "वंदेमातरम्" या गिताने सुरु झाले.सभेस अधिकारी वर्ग तसेच खालीलप्रमाणे स.सभासद उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १) स.स.श्री.संजय किसनराव केनेकर | उप-महापौर |
| २) स.स.श्री.ढगे नरसिंग मुरलीधर | स.सदस्य |
| ३) स.स.श्री.सुर्यवंशी महादेव पुंडलिकराव | --//-- |
| ४) स.स.श्री.अफसरखाँन यासिनखाँन | --//-- |
| ५) स.स.सौ.लोखंडे रुखमिनीबाई खंडेराव | --//-- |
| ६) स.स.श्री.विधाते प्रभाकर सिताराम | --//-- |
| ७) स.स.सौ.साजेदा बेगम | --//-- |
| ८) स.स.श्री.म.सलिम म.हनिफ | --//-- |
| ९) स.स.श्री.गौतम भागाजी खरात | --//-- |
| १०) स.स.ॲड.श्री.गणेश किसनराव वानखेडे | --//-- |
| ११) स.स.सौ.जोशी रजनी रमेश | --//-- |
| १२) स.स.सौ.उषाताई दिलीप गायकवाड | --//-- |
| १३) स.स.सौ.विमलबाई नंदकुमार मुंडलिक | --//-- |
| १४) स.स.श्री.लांडगे गौतम लिंबाजी | --//-- |
| १५) स.स.श्री.भालेराव अभिमन्यु रामभाऊ | --//-- |
| १६) स.स.श्री.नरेंद्र यादवराव पाटील | --//-- |
| १७) स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | --//-- |
| १८) स.स.श्री.बैनाडे कंवरसिंग किसनसिंग | --//-- |
| १९) स.स.सौ.पद्मा बाबुराव शिंदे | --//-- |
| २०) स.स.श्री.मालानी प्रफुल्ल लालचंद | --//-- |
| २१) स.स.श्रीमती पांचाळ चंपाबाई विश्वनाथ | --//-- |
| २२) स.स.सौ.विसपुते धनश्री अशोक | --//-- |
| २३) स.स.श्री.फजलउल्ला खाँन अजमतउल्लाखाँन | --//-- |
| २४) स.स.श्री.अजीजखाँ गणीखाँ | --//-- |
| २५) स.स.श्रीमती आबेदा बेगम मो.मुस्तफा | --//-- |
| २६) स.स.श्री.महंमद मुश्ताक अहेमद | --//-- |
| २७) स.स.सौ.नुरलहाँ बेगम अ.रहेमानखाँन | --//-- |
| २८) स.स.सौ.मोहसिना बिल्कीस विखारोद्दीन | --//-- |
| २९) स.स.श्रीमती जाहेदा बेगम म.जमिर | --//-- |
| ३०) स.स.श्री.तुपे त्र्यंबक गणपतराव | --//-- |
| ३१) स.स.सौ.वाडेकर यशोदा धनंजय | --//-- |
| ३२) स.स.श्री.तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | --//-- |
| ३३) स.स.श्रीमती पुष्पाताई सुरेशचंद्र गंगवाल | --//-- |

३४) स.स.श्री.हमीदोद्दीन ताबा फसियोद्दीन --//--
३५) स.स.श्री.म.अ.रऊफ म.अ.माबुद --//--
३६) स.स.श्री.स.अ.एकबालोद्दीन स.मो.कुतुबोद्दीन --//--
३७) स.स.श्री.जैस्वाल प्रदीप शिवनारायण --//--
३८) स.स.श्री.स.अली मिरा सलामी --//--
३९) स.स.सौ.दलाल लता श्रीनिवास --//--
४०) स.स.श्री.ओक जयवंत केशवराव --//--
४१) स.स.श्रीमती अलका रमेश पाटील --//--
४२) स.स.सौ.धांडे शकुंतला हरिदास --//--
४३) स.स.श्री.अ.रशिदखॉंन (मामू) --//--
४४) स.स.श्री.सुभाष लक्ष्मीनाराण कच्छवाह --//--
४५) स.स.कु.डॉ.लाडवाणी माया लिंबाजी --//--
४६) स.स.श्री.डॉ.कराड भागवत किसनराव --//--
४७) स.स.सौ.आव्हाड सविता संजय --//--
४८) स.स.सौ.निर्मला विठ्ठल कांबळे --//--
४९) स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग --//--
५०) स.स.श्री.विखारोद्दीन पि.खुदबोद्दीन --//--
५१) स.स.श्री.जैन विकास रतनलाल --//--
५२) स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन --//--
५३) स.स.श्री.जोशी संजय रामदास --//--
५४) स.स.श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर --//--
५५) स.स.श्री.कुमावत अविनाश लक्ष्मणराव --//--
५६) स.स.सौ.ज्योत्स्ना दौलतराव हिवराळे --//--
५७) स.स.श्री.राजकुमार बचाटे (मामा) --//--
५८) स.स.सौ.राधाबाई तळेकर --//--
५९) स.स.श्री.विठ्ठल किसन जाधव --//--
६०) स.स.सौ.काळुसे मंदा धनंजय --//--
६१) स.स.सौ.सुनंदा उत्तम कोल्हे --//--
६२) स.स.श्री.गांगवे बन्सी तुळशीराम --//--
६३) स.स.श्री.घडामोडे भगवान देविदास --//--
६४) स.स.श्री.नवपुते कचरु चंद्रभान --//--

**संवाद :**

अफसरखॉंन :शहरातील किराडपूरा भागातील विटभटटया काढण्यात आल्या त्यात संबंधित विटभटटया मालकाचे नुकसान झालेले असून त्यांना पर्यायी जागा महानगरपालिकेच्या सोयीनुसार देण्यात यावी किंवा मा जिल्हाधिकारी यांच्याकडे संपर्क साधून सरकारी,गायरान,शहराच्या बाहेर पर्यायी जागा देण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.तसेच वसंत भुवन येथील इमारतीमध्ये एक लाईनमन कर्मचारी विद्युत लाईनचे काम करीत असतांना त्यांचा हात फक्चर झाला संबंधितास महापालिकेतर्फे औषधोपचारासाठी आर्थिक मदत नियमाने तात्काळ देण्यात यावी. या अगोदर कर्मचाऱ्यांना आर्थिक मदत देण्यात आलेली आहे.

अविनाश कुमावत : मा.आयुक्त या सभेस उपस्थित नाही याचा खुलासा व्हावा.

श्री.अफसरखाँन : महापालिका अस्थापनेवर ११ इंजिनियर ८-१० वर्षापासून काम करत होते.त्यांना मा.आयुक्तांनी कामावरुन कमी केलेले आहे त्यांना पुन्हा कामावर घेण्यात यावे.त्यांचे वय जास्त झाल्याने त्यांना इतरत्र नोकरी मिळणार नाही.

श्री.गिरजाराम हाळनोर : १०-१२ वर्षा पासून ११ अभियंते कार्यालयीन सेवा करत आलेले असून आजच्या परिस्थितीत या कार्यालयामध्ये त्यांची आवश्यकता आहे.मेकॅनिकल विभागात एक ज्युनिअर इंजिनिअर नाहीत.संबंधित कर्मचाऱ्यांनी एक दिवस महापालिका कार्यालयासमोर उपोषणही केलेले आहे.त्यांना पुन्हा कामावर घेण्यात यावे.

श्री.हमीद ताबा : स्वेच्छा निधीतून होणारे विकास कामाच्या व इतरही काही संचिका संदर्भात मा.उप-आयुक्त शिंदे साहेब निर्णय घेणार होते अद्याप पर्यंत त्या संचिका जशाच्या तशा थांबवून आहेत.याबाबत प्रशासनातर्फे खुलासा व्हावा.

सौ.लता दलाल : मा.आयुक्तांनी आचार संहितेच्या नावाखाली विकास कामाच्या संचिकेस मंजुरी न देता थांबवून ठेवल्या व काही ठराविक वार्डातील संचिका मंजुरी दिलेली असून असे राजकारण करणाऱ्या आयुक्तांना सभागृहात बदलीचा प्रस्ताव ठेवून कार्यवाही करावी.३५ अवेक्षक,कनिष्ठ अभियंता पदावर बऱ्याच दिवसापासून कर्मचारी काम करत होते.विभाग प्रमुखांनी कळविल्या नंतर त्यांना घेण्यात येते.त्यांचेवर दबाव टाकून गरज नाही असा अभिप्राय घेण्यात आला या संदर्भात चौकशी व्हावी.

श्री.विधाते प्रभाकर : बेगमपुरा येथील स्मशानभुमीच्या ६ एकर जागेवर विटभट्या असून नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातून विचार केल्यास हया विटभटटया तात्काळ काढण्यात याव्यात.याबाबत मी सतत ५ ते ६ वर्षापासून पाठपुरावा करत असून अद्याप प्रशासनाने कार्यवाही केलेली नाही.प्रशासनाने तात्काळ विटभटटया काढाव्यात.

श्री.गजानन बारवाल : प्रशासनामार्फत विटभटटया काढण्याबाबत जी कार्यवाही झाली त्याबद्दल अभिनंदन.शहरात बऱ्याच ठिकाणी विटभटटया आहेत.त्यांच्या बाबतीतही अशाच प्रकारची कार्यवाही करण्यात यावी.

श्री.अफसरखाँन : या अगोदर हर्सुल येथे विटभटटी चालवणाऱ्यांना जागा देण्याबाबत निश्चित केले होते.त्याबाबत काय झाले माहिती दयावी.

श्री.कोकाटे काशीनाथ : सभागृहाने आजारपणासाठी रंगनाथ तरटे नावाच्या व्यक्तीला नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतून आर्थिक मदत देण्यात यावी असा निर्णय झालेला असतांना अदयाप त्या व्यक्तीला आर्थिक मदत देण्यात आलेली नाही.४ महने झालेले असून मुद्दामहून अडवणूक करण्यात येते.जे अधिकारी अशा प्रकरणात अडवणूक करत असतील त्यांच्यावर प्रशासनाने कार्यवाही करावी.

२) गेल्या दोन महिन्यामध्ये सिडको-हडको भागामध्ये पुरेसे पाणी येत नाही.२ दिवसाआड पाणी येते.प्रशासन या बाबत जाणिव पूर्वक दुर्लक्ष करत आहेत.याबाबत सविस्तर खुलासा व्हावा.

श्री.महादेव सुर्यवंशी : विविध विकास कामा बाबतच्या एकूण १८२ संचिकेवर उपआयुक्त यांनी सहया केल्या व स्वेच्छा निधितून होणारी कामे रद्द करण्यात यावी अशाही एक बातमी आजच्या वर्तमान पत्रात आलेली आहे.प्रशासनाने असा खुलासा करावा की,स्वेच्छा निधिच्या ज्या संचिका आहेत त्या निकाली

काढल्या आहेत काय?प्रशासनातर्फे अगोदर असे सांगण्यात आले होते की,स्वेच्छा निधीतील जी कामे आहे ती महापालिका फंडातून करण्यात येईल.परंतु जी कामे मंजुर झाली आहे,ती तातडीच्या दृष्टीकोनातून करावयाची असते,अशी कामे होणार किंवा कसे याबाबत खुलासा व्हावा ही विनंती.

श्री.ओक जयवंत : एक लाईनमन रफिक नावाचा डयुटीवर असतांना अपघात झाला असून सध्या ते घाटी दवाखान्यात औषधोपचार घेत असून सेवेत काम करत असतांना एखादया कर्मचाऱ्यांचा अपघात झाल्यास अशा कर्मचाऱ्यांना तात्काळ मदत उपलब्ध करुन देण्यात आली पाहीजे.या अगोदर ही बऱ्याच कर्मचाऱ्यास डयुटीवर असतांना अपघात झालेला आहे.त्यांना आर्थिक मदत वेळेवर मिळालेली नाही.

२) ज्या संचिका स्वेच्छा निधी संदर्भात थांबवून आहेत त्या तात्काळ निकाली काढण्या बाबत तसे आदेश प्रशासनास दयावे त्यानुसार प्रशासनाने कार्यवाही करावी.

श्री.रशिदखॉंन (मामू) : सर्व नवनिर्वाचित स.सदस्यांचे मी सभागृहातर्फे व माझ्या वतीने हार्दिक अभिनंदन करतो.श्री.बंडू ओक,श्री.कुमावत व मा.महापौर पुन्हा निवडून आले.स्वेच्छा निधी संदर्भात ज्या संचिका थांबवून आहेत त्या सर्व निकाली काढाव्यात.सध्याचे आयुक्त यांनी एकही संचिका निकाली काढलेली दिसत नाही.

श्री.गजानन बारवाल : उन्हाळा सुरु झालेला असून शहरात पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.गेल्या ८ दिवसांपासून वेळेवर पाणी येत नसून पुरेपुर पाणी पुरवठा होत नाही.यासाठी तातडीची एक बैठक घेऊन पाणी प्रश्न मार्गी लावावा.

श्रीमती अलका पाटील : स्वेच्छा निधीतून होणाऱ्या कामाबाबतच्या सर्व संचिका निकाली काढून एक आठवडयात कामास सुरुवात होईल अशी कार्यवाही प्रशासनाने करावी.

श्री.नरसिंग ढगे : महापालिका सार्वत्रिक निवडणूक २००० च्या अगोदर लेखा अनुदान मंजुर करण्याबाबत स्थायी समिती मध्ये निर्णय दयावा किंवा कसे संदर्भात निवडणूक आयोगास विचारण्यात आले व त्या नुसार मा.आयुक्त यांनी ४ महिन्याचे लेखा अनुदान मंजुर केले आहे काय? तसेच स्वेच्छा निधीच्या माध्यमातून होणारे विकास कामे थांबवून आहे सर्व संचिका मंजूर कराव्यात व विकास कामे व्हावीत या दृष्टीने कार्यवाही व्हावी.

श्री.बैनाडे कवरसिंग : सिडको-हडको भागामध्ये ८ दिवासांपासून पाण्याची टंचाई आहे.बऱ्याच दिवसांपासून सिडको-हडको भागा करिता एक संप (जलसाठा) बांधण्यात यावे असे ठरले असतांना अद्याप कार्यवाही झालेली नाही.पाणी वेळेवर व भरपूर कसे मिळेल यासाठी प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी.

श्री.जोशी संजय : गेल्या ५ वर्षात सर्व अधिकारी कर्मचारी यांनी विकास कामे करण्यास मदत केली,सहकार्य केले त्यांचे आभार मानने मी माझे कर्तव्य समजतो.विदयमान (आताचे) आयुक्त यांनी एकही नगरसेवकाचे कामे केली नाही.स्वेच्छा निधीसंबंधीच्या संचिका आहे त्या निकाली काढण्यात येईल असे उपआयुक्त (म) यांनी सांगितले होते.परंतु अदयाप सर्व संचिका सही विना थांबवून आहे.या कारणावरुन मी मागे सदस्य पदाचा राजीनामा जाहीर केला होता.सर्वच्या सर्व १८१ संचिका निकाली काढण्यात येतील असे सांगितले

होते.परंतु अदयाप पर्यंत कार्यवाही झाली नसून स्वेच्छा निधीच्या संचिका मंजुर करुन कार्यवाही करता येत नसेल तर इतर विकास कामामधून उर्वरीत कामे करण्यात यावी.

श्री.नरेंद्र पाटील : गेल्या १० वर्षापासून मला प्रेम मिळाले,मागच्या ६० व आताच्या ८२ सहकाऱ्यांनी मला साथ देवून विकास कामे करण्याची संधी दिली त्याबद्दल मी सर्वांचे अभिनंदन करतो कारण आजची सभा ही या स.सदस्यांसाठी शेवटची सभा आहे असे वाटते.तसेच सभागृहातील सर्व स.सभासदांनी मला ५ वर्ष विकास कामे करण्यास प्रोत्साहन केले त्याबद्दल मी सर्वांचे आभार मानतो तसेच या कालावधीत पत्रकार व सिटीचॅनलच्या माध्यमातून फार मोठे मोलाचे सहकार्य या शहरासाठी व माझ्यासाठी केलेले असल्याने त्यांचेही आभार व्यक्त करतो व नवनिर्वाचित स.सदस्यांनी या शहरातील चांगल्या प्रकारे काम करण्याची अपेक्षा व्यक्त करतो.

मा.महापौर : आजची सभा ही शेवटची सभा नसून येत्या २७ तारखेला आपण मागील ज्या स.सदस्यांचा कालावधी संपलेला आहे अशा सर्व सभासदांचा आभार व्यक्त करुन निरोप समारंभाचा कार्यक्रम व जे नवनियुक्त स.सदस्य आहेत अशा सर्व स.सदस्यांचा स्वागत समारंभाचा कार्यक्रम आयोजित करणार आहोत.यात ८२ जुने स.सभासद उपस्थित असतील.

श्रीमती रुख्मीनीबाई लोखंडे : माझ्या वार्डात ५७ लाख रु. खर्चून पाण्याची मोठी पाईप लाईन टाकली परंतू वार्डात गल्ल्यामध्ये छोटया छोटया पाईप लाईन टाकलेली आहेत.पाण्याचा दाब जास्त असल्यामुळे छोटया छोटया पाईप लाईन फुटत असून हया लाईन ३ इंची असून त्या ठिकाणी ६ इंची पाईप लाईन टाकण्यात यावीत. यासाठी मी प्रशासनाकडे पत्र दिलेले असून त्या कामाकरीता इस्टिमेंट तयार झालेले आहे किंवा काया या बाबत माहिती देऊन त्वरीत कार्यवाही करावी.

मा.महापौर : स.सदस्यांनी मांडलेल्या सूचना योग्य असून मा.आयुक्त आजच्या सभेस उपस्थित नाही.त्यांनी नेहमी सर्वसाधारण सभेच्या वेळी पत्र देवून सभेस उपस्थित राहण्याची टाळाटाळ केली त्याबद्दल अशा आयुक्तांचे मी सभागृहाच्या वतीने निषेध करतो.त्यांच्या जागी प्र.आयुक्त म्हणून उप-आयुक्त (म) उपस्थित आहे.त्यांनी स.सदस्य यांनी केलेल्या सूचना बाबत व्यवस्थित खुलासा करता येत असेल तर करावा नसता ही सभा १० मिनिटांसाठी तहकुब करण्यात येते.व तो पर्यंत मा.आयुक्तांशी उप-आयुक्त यांनी यांनी संपर्क सांधून त्यांना सभेस बोलावून घ्यावे.

सौ.लता दलाल : मा.आयुक्त यांची या महानगरपालिकेत काम करण्याची इच्छा नसून आतापर्यंत त्यांनी एकही सर्वसाधारण सभेला हजर राहिलेले नाही.त्यांच्या बदली बाबत एक ठराव पास करुन तात्काळ बदली होण्याबाबत कार्यवाही व्हावी,आजच्या बैठकीत ते का उपस्थित नाही खुलसा व्हावा.

श्री.कोकाटे काशीनाथ : उप आयुक्त (म) उपस्थित असून मा.आयुक्तांच्या जागेवर प्र.आयुक्त म्हणून ते सभेस उपस्थित आहे त्यांना सर्व विकास कामावरच्या संचिकेवर सहया करण्याबाबत निर्णय घेण्याचे आदेश करावेत त्यानुसार त्यांनी अंमलबजावणी करावी.

प्र.आयुक्त (उप-आयुक्त (म)) : मा.आयुक्तांनी मला पत्र दिले होते व ते विभागीय आयुक्त कार्यालयात एका महत्वाच्या बैठकीत उपस्थित आहेत त्यामुळे त्यांनी मला

कळविले की,आपण सभेचे कामकाज पार पाडण्यासाठी उपस्थित रहावे.सभागृहात उपस्थित केलेल्या सुचनेच्या अनुषंगाने सांगू इच्छितो की,किराडपूरा भागात कार्यान्वित असलेल्या विटभटटया संदर्भात मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी केली आहे व संबंधित लोकांना पर्यायी जागा देणे हे महानगरपालिकेच्या कक्षेत येत नाही असे मला वाटते या संबंधी मा.जिल्हाधिकारी यांचेकडे ते कार्यवाही करु शकतात.

२) जखमी कर्मचारी यांची भेट आज मी स्वतः घेणार आहे.

३) पाणी प्रश्ना बाबत कार्यकारी अभियंता (पा.पु) हे सभागृहात उपस्थित आहे ते या बाबतीत उत्तरे देऊ शकतील.

४) लेखा अनुदानाचा प्रश्न उपस्थित झाला त्या बाबत शासनाचे आदेशा नुसार ४ महिन्याचा लेखा अनुदान मा.आयुक्तांनी सादर करावा त्यानुसार ४ महिन्याचा लेखा अनुदानास मंजुरी मिळालेली आहे.

श्री.काशीनाथ कोकाटे : संबंधित जखमी व्यक्तीला अदयाप पर्यंत का मदत करण्यात आलेली नाही याचा खुलासा व्हावा.पाणी प्रश्नाबाबत कार्यकारी अभियंता यांनी खुलासा करु शकत नाही.मा.आयुक्तांनीच याबाबतचा खुलासा करावा.

श्री.अविनाश कुमावत : स्वेच्छा निधीच्या संचिका बाबत खुलासा केलेला नाही.

मा.महापौर : लेखा अनुदान कोणत्या नियमानुसार मंजुरी मिळाली त्याचे स्पष्टीकरण करावे.

आयुक्त (उप आयुक्त (म)) : ४ महिन्याचे लेखा अनुदान मंजुर करण्यात आलेले आहे.निधीच्या ज्या संचिका आहेत व ज्या कामाच्या वर्क ऑर्डर झालेल्या आहेत ती सर्व कामे पूर्ण होतील ती कामे थांबविण्याचे कुठेही आदेश निघालेले नाहीत.

सौ.लता दलाल : डिसेंबरमध्ये पत्र दिले होते.स्वेच्छा निधीतील कामाबाबत अद्याप कार्यवाही झालेली नाही.

श्री.संजय जोशी : ५ ते ६ महिन्यापूर्वी पत्र देऊन ५,१० हजार रुपयाची कामे झाली नाही.

श्री.जयवंत ओक : ज्या स.सदस्यांनी १ वर्ष,६ महिन्यांपूर्वी पत्र दिलेले आहे.व त्याची अद्याप संचिका तयार नाही अशा पत्राबाबत प्रशासन काय कार्यवाही करणार याबाबत कुणाला दोषी ठरवणार जो कुणी अधिकारी प्रशासनाच्या कामात हलगर्जीपणा करत असेल अशा अधिकाऱ्यावर कार्यवाही व्हावी.

जैस्वाल प्रदीपकुमार : स्वेच्छा निधीच्या कामाचा खुलासा केला.कोठेही अडवणूक होणार नाही.लेखा विभागाचा खुलासा घ्यावा प्रस्ताव मंजुर आहेत.कार्यादेश झालेले आहे असे मागचे मंजुर कामांना पुन्हा मंजुरी लागेल का खालच्या अधिकाऱ्यांनी सांगितले म्हणून गैरसमज होत आहे.वस्तुस्थिती सांगावी.

श्री.गौतम खरात : शहराला पाणी पुरवठा होणार नाही अशी बातमी वर्तमान पत्रात प्रसिध्द झाली व अशी एक बातमी आली की,महापालिकेचे संबंधित अधिकारी त्या ठिकाणी वेळेवर पोहोचले नाहीत.नेमकी १४०० की ७०० एम.एम.ची पाईप लाईन फुटलेली आहे.याचा स्पष्ट खुलासा प्रशासनाने केलेला नाही.शहरात पाणी पुरवठा करण्यासाठी पर्यायी काय व्यवस्था करण्यात आलेली असून १४०० एम.एम.ची लाईन फुटल्या नंतर ७०० एम.एम.लाईनवर शहरास पाणी पुरवठा होऊ शकतो काय ? कोणकोणत्या ठिकाणी टँकरद्वारे पाणी पुरवठा पुरविण्यात व्यवस्था करण्यात आलेली आहे किंवा दिवसभरामध्ये कोणत्या भागांमध्ये पाणी मिळणार नाही याबाबत अधिकारी स्पष्ट खुलासा करु शकले

नाही व पाणी प्रश्ना संबंधी संबंधित अधिकारी यांनी जातीने लक्ष दिले पाहीजे,नसता महापालिकेची पाणी पुरवठयाची योजना कोलमडून पडल्या शिवाय राहणार नाही.पर्यायी खुलासा व्हावा.अधिकारी कामचुकारपणा करत असतील तर प्रशासन मार्फत अशा अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात यावी.

श्री.मुश्ताक अहेमद : सर्व नवनिर्वाचित स.सदस्यांना हार्दीक शुभेच्छा येत्या ५ वर्षामध्ये ज्या ज्या वेळी कमिटया करण्यात आल्या त्याबाबतचे रिपोर्ट येत्या २७ तारखेपर्यंत द्यावेत.तसेच ज्यांनी स्वेच्छा निधितून विकास कामे घेण्याबाबत पत्र दिलेले आहेत त्या संबंधी कार्यवाही व्हावी.

मा.महापौर : कार्यकारी अभियंता (पा.पु) यांनी खुलासा करावा.

कार्य.अभियंता(पा.पु) : काल रात्री ११.४० वाजता १४०० एम.एम.ची पाईप लाईन नाथ सिड जवळ फुटली.त्यामुळे शहराला पाणी पुरवठा ११.४० पासून बंद झाला,रात्री सर्व यंत्रणा उभी करुन सकाळी ५.०० वाजेपासून कामास सुरुवात केलेली आहे.फुटलेली १४०० एम.एम.ची लाईन बाजूला करुन दुसरा पाईप त्याठिकाणी टाकून रात्री १२ वाजेपर्यंत वेल्डींगचे काम पूर्ण होईल सध्या ७०० एमएमच्या पाईप लाईपमधून पाणी पुरवठा चालू आहे.

सौ.लता दलाल : बऱ्याच भागामध्ये पाणी पुरवठा झालेला नाही.

कार्य.अभियंता(पा.पु) : या वाहिनीमधून २८ एमएलडी पाणी घेऊ शकतो.त्यामध्ये क्रांतीचौक पर्यंत पाणी घेतले जाते व सिडकोला यातून ९ एमएलडी पाणी पुरवठा केला जातो.रहिलेला जो भाग खोकडपूरा व इतर भागात बाकीचे पाणी पुरवठा होत असून ज्या भागात पाणी पुरवठा होऊ शकला नाही त्या भागात मागणी नुसार टँकरद्वारे पाणी पुरवठा होतो आहे.

श्री.काशीनाथ कोकाटे : १ १/२ते २ महिन्यापासून पाणीपुरवठा का विस्कळीत होत आहे त्याचा खुलासा व्हावा.

श्री.गौतम खरात : ज्या भागात पाणी पुरवठा होत नाही त्याबाबतची माहिती अधिकारी यांना नसते काय?

श्री.गजानन बारवाल : महापालिकेकडे १० टँकर असून संपूर्ण शहराला याद्वारे पाणी पुरवठा होणे शक्य नाही त्यासाठी प्रायव्हेट टँकर मागवून व्यवस्था करावी.

सौ.लता दलाल : या अगोदर अनेक वेळा पाईप लाईन फुटलेल्या होत्या परंतु आजच्या परिस्थितीप्रमाणे एवढी पाण्याची टंचाई भासली नाही.नविन काही बदल करण्यात आलेले आहेत काय याचा खुलासा व्हावा.

मा.महापौर : सिडको-हडको भागामध्ये पाणी पुरवठा का व्यवस्थित होत नाही याची कारणे सभागृहाला सांगावी.डिसेंबरच्या सर्वसाधारण सभेमध्ये २ कोटी ५ लाख रुपयाच्या कामास मंजुरी दिली होती त्या बाबत काय झाले तसेच सिडकोमध्ये हापसे बसवायची योजना होती त्याबाबतही काय झाले याची सविस्तर माहिती द्यावी.

कार्य.अभियंता(पा.पु) : मागील सर्वसाधारण सभेत हापसे बसवण्या बाबत मंजुरी झालेली आहे त्या बाबत ट्रेंडर काढण्यात आले असून शेवटच्या स्थायी समितीमध्ये मंजुरी मिळाली आहे.नंतर आचार संहिता लागलेली असल्याने काम थांबवून होते,आता संबंधिताला अनामत रक्कम भरावयास पत्र दिले आहे.

श्री.काशीनाथ कोकाटे : पाणी प्रश्नाच्या संदर्भात मा.आयुक्तांच्या मंजुरीने कार्यवाही होते.२ कोटी ५ लाखाचे काम थांबले असावे असे वाटते.त्यासाठी मा.आयुक्तानीच खुलासा करावयास पाहीजे.

कार्य.अभियंता (पा.पु) : सिडको भागासाठी २ कोटी ५ लाखाची योजना आपण तयार केलेली होती व त्यापैकी १ कोटी ३ लाखाचे निविदा काढण्यात आल्या त्यामध्ये २६ लाख लिटर क्षमतेचे टाकी बांधणे व पाणी पुरवठा करण्यासाठी एक जलवाहीनी टाकणे या संबंधीच्या निविदा होत्या.त्या निविदा जास्त दराने प्राप्त झाल्याने फेर निविदा करावी असे ठरले.व संचिकेवर वाटाघाटी करण्याचा निर्णय आज घेतला जाईल व नंतर पुढील कार्यवाही करता येईल.

श्री.कोकाटे काशीनाथ : या अगोदर २० लाख रुपयाचे टेंडर टाकी बांधण्यासाठी गेलेले असून ते काम का थांबून आहेत याचा खुलासा करावा.

मा.महापौर : पाणी पुरवठा संदर्भात सभागृहात व्यवस्थित उत्तर मिळाले नसून उप आयुक्त (म) यांनी मा.आयुक्त यांना कळवून या सभेस बोलवावे व आजची सभा ही ३० मिनिटांसाठी तहकुब करण्यात येते.(वेळ १२.३० वाजता)
(सभेला सुरुवात १.३० वाजता)

श्री.लांडगे गौतम : ज्या कारणाने सभा तहकुब करण्यात आली त्याचा खुलासा व्हावा.

मा.महापौर : मा.आयुक्त रजेवर गेलेले असून त्यांनी त्यांचा चार्ज माननिय जिल्हाधिकारी यांचेकडे दिलेला आहे.उप आयुक्त (म) यांनी स्वेच्छानिधितील जी कामे आहेत त्या संबंधी संचिका मंजूर करुन वर्क ऑर्डर तात्काळ काढून कार्यवाही करावी.

श्री.प्रदीप जैस्वाल : स्वेच्छा निधी मधील कामाबाबत खुलासा करावा.

उप आयुक्त(म) : ती कामे तात्काळ सुरु होतील.

श्री.काशीनाथ कोकाटे : या अगोदर मा.आयुक्त,विभागीय आयुक्त कार्यालयात बैठकीसाठी गेलेले आहे असे सांगण्यात आले व आता रजेवर गेले असे सांगण्यात येते.अधिकारी सभगृहाची दिशाभूल करतात व शहरातील जनतेशी हे प्रशासन खेळत असून चुकीची माहिती सभागृहात पुरविली जाते.आयुक्त सुट्टीवर गेले असले तरी त्यांचा चार्ज कुणाकडे आहे व ते सभागृहात उपस्थित आहे काय?

आयुक्त(उप आयुक्त(म)) : मा.आयुक्त हे विभागीय आयुक्त कार्यालयात बैठकीला गेले होते.परंतु आताच माहिती घेतल्या नुसार त्यांची आज दुपारनंतर २० दिवसाची रजा मंजुर झालेली असून त्यांचा चार्ज माननीय जिल्हाधिकारी यांचेकडे दिलेला आहे.

श्री.कोकाटे काशीनाथ : मा.आयुक्त महापालिकेमध्ये आल्या पासून त्यांनी किती वेळा सर्वसाधारण सभेला उपस्थित होते.

मा.महापौर : मा.आयुक्त यांनी आता पर्यंत एकही सर्वसाधारण सभेला हजर नव्हते.त्यांनी मला पत्र दिले होते मी बैठकीस उपस्थित राहणार आहे.आता असे सांगण्यात येते की,ते रजेवर गेले.

श्री.कोकाटे काशीनाथ : पाणी प्रश्नाबाबत सविस्तर खुलासा करावा.

कार्य.अभियंता(पा.पु.) : गेल्या १५ दिवसापुर्वी सिडको-हडको भागामध्ये पाणी पुरवठा विस्कळीत झाला होत.दि.१३,१६,१८ तारखेला विज पुरवठा कमी असल्यामुळे तसेच १६ तारखेला ढोरकीन व १७ तारखेला नक्षत्रवाडी येथे विद्युत पुरवठा कमी झाल्यामुळे योग्य तो पाणी पुरवठा होऊ शकला नाही व सिडको-हडको भाग उंच असल्यामुळे काही प्रमाणात पाणी आलेले नाही. आज पासून पाणी पुरवठा पुन्हा सुरळीत करण्यात येईल.

श्री.सुर्यवंशी महादेव : नारेगांवसाठी एन-५,एन-७ येथील पाण्याच्या टाकीमधून पाणी पुरवठा होत होता आता डायरेक्ट लाईन टाकण्यात आलेली असल्याने पाणी पुरवठा व्यवस्थित होत नाही.२० लाख लिटर क्षमतेच्या टाकी मध्ये पाणी सोडतांना इकडील भागात पाण्याची टंचाई होणार नाही याची दक्षता घ्यावी.

कार्य.अभियंता(पा.पु) : आता बदल केला आहे.एन-७ संप मध्ये रात्री पाणी व सरळ टाकीत पाणी घेण्यात येते.दिवसभर पाणी घेणार नाही त्यामुळे पाणी चालू राहील वोखार्ड ते नारेगांव पर्यंत जलवाहीनी टाकण्याचे आराखडा (डीलाईन) तयार करणार व व्यास तपासून घ्यावा लागेल.

मा.महापौर : शहरात पाणी पुरवठा बाबत संबंधित अधिकारी यांनी लक्ष द्यावे विषय क्र.१ वर चर्चा करावी.

**विषय क्र. २२१/१ :**

दिनांक ३-२-२०००,दि.४-२-२०००व दि.१८-३-२००० रोजी संपन्न झालेल्या सर्व साधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

मा.महापौर : मागील एका ठरावात दुरुस्ती करावयाची ती सचिव यांनी वाचावी.(मा.महापौर लिहलेले पत्र सचिव यांना वाचायला देतात.)

नगरसचिव : ठराव क्र.११७ मध्ये महापौर कार्यालयात स्वीय सहाय्यक हे पद मंजुर करण्यात येते.त्याऐवजी महापौर कार्यालयात स्विय सहाय्यक जे पद ३३% महिला राखीव म्हणून मंजुर करण्यात येते.

श्री.गजानन बारवाल : दि. ३-२-२००० च्या इतिवृत्तात पान क्र.६ वर माझ्या वाक्यात एस.टी.पी.प्लॅन्ट अशी दुरुस्ती करण्यात यावी.तसेच दि.४-२-२०००च्या इतिवृत्तातील पृष्ठ क्र.३० वर विषय क्र. २१६ मध्ये सदर विहीरीची जागा महापालिकेने ताब्यात घेवून देखभाल करावी अशी दुरुस्ती करण्यात यावी.

श्री.अ.रशिदखाँ : दिनांक ११-१-२००० च्या सभेतील ठराव क्र. १५१/४ प्रमाणे नामांतर समितीकडे पाठविण्यास मंजुरी झाली.परंतु रस्त्याला नांव द्यायचे नाही.नविन इमारतीला नाव द्यायचे असल्याने सादीया टाकीजच्या पाठीमागील व्यापारी संकुलनावर बांधण्यात येणाऱ्या बहुउद्देशीय हॉलचे नाव क्रामेट सय्यद मिरा सलामी असे देण्याबाबत आदेश व्हावेत.

मा.महापौर : प्रास्तावित केल्याप्रमाणे नांव देण्यात यावे.तसेच दि.४-२-२००० ला स.सदस्य श्री.मोहसीन अहमद यांचे वार्डात प्रसुतीगृहाचे उद्घाटन माझ्या अध्यक्षतेखाली झाले आहे.जानेवारी मध्ये या दवाखान्यास मगवलन्नीसा खानम प्रसुतीगृह नांव देण्याचा प्रस्ताव नामांतर कमेटीकडे पाठविला आहे.ही नविन वास्तु असल्याने त्यांस नाव देण्यात यावे.

मा.महापौर : दिनांक ३-२-२००० च्या इतिवृत्तातील पान क्र. ६ वर एस.टी.पी.प्लॅन्ट ऐवजी ए.टी.पी.प्लॅन्ट असे वाचण्यात यावे. तसेच विषय क्र. २१६/२७ दि.४-२-२००० मध्ये विहीरीची जागा महानगरपालिकेने ताब्यात घेवून देखभाल करावी अशी दुरुस्ती करण्यास मंजुरी देण्यात येते.विषय क्र.१ मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

दि.४-२-२००० च्या सर्वसाधारण सभेतील विषय क्र.२१६ / २७ मध्ये विहरीची जागा महानगरपालिकेने ताब्यात घेवून देखभाल करावी अशी ठरावात दुरुस्ती करण्यास मंजुरी देण्यात येते.

तसेच वरील दुरुस्त्यासह दिनांक ३-२-२०००,दिनांक ४-२-२००० व १८-३-२००० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

मा.महापौर : ऐनवेळी पाणी पुरवठा संबंधीचा ठराव आलेला आहे.त्यास मंजुरी देण्यात येते.तसेच प्रशासनातर्फे "प्रशासकीय अधिकारी" पदासंबंधीच्या प्रस्तावास तसेच सन्माननीय सदस्यांचे सभागृहातील ऐनवेळी सादर झालेले सर्व प्रस्तावास या सभेत मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २२२/२ :**

कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम क्रमांक २, औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र क्र.मजीप्राबांवि-२ औरंगाबाद / ताशा /३०१४ दिनांक १५-१२-९९ द्वारे औरंगाबाद पाणी पुरवठा योजना (नाथसागर उद्‌भव) सिडको व विस्तारीत भागासाठी स्वतंत्र पाईपलाईन टाकणे,या योजनेसाठी आयुर्विमा महामंडळाकडून कर्ज मिळण्याची शक्यता कमी नसल्यामुळे हडकोकडून कर्ज घेण्यासंबंधीचा प्रस्ताव मान्यतेसाठी पाठविला असून त्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेचा ठराव पारीत करण्याबाबत व्यवस्था करण्यासाठी सूचना केली आहे.या संदर्भात मंडळाकडून सतत पाठपुरावा केला जात आहे.

उपरोक्त योजना रुपये ६७,३०४९,०००/- ढोबळ किंमतीची असून सदर योजना मान्य करणे व निधी आयुर्विमा महामंडळ व खुल्या बाजारातून उपलब्ध करुन देणे याबाबतचा महानगरपालिकेचा ठराव क्र. १८६ /७ दिनांक १९-१२-९८ पारित झालेला आहे.ही योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविली जात आहे.

या योजनेस अद्यापही आयुर्विमा महामंडळाचे तसेच खुल्या बाजारातील कर्ज उपलब्ध झालेली नाही व ते मिळण्याची शक्यता कमी आहे.असे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत कळविण्यात आलेले आहे.निधी उपलब्ध होत नसल्याकारणाने योजनेचे काम धिम्या गतीने चालू आहे.कामाची गती वाढविणे अत्यंत आवश्यक आहे.कारण योजना शक्य तितक्या लवकर पूर्ण करावयाची आहे.यासाठी हडको कडून कर्ज उपलब्ध करणे हा पर्याय दिसतो.

हडकोच्या नियमानुसार योजनेच्या किंमतीच्या ७०% म्हणजे ४७११.३४ लक्ष इतके कर्ज त्यांचेकडून मिळू शकते.त्यांची परतफेड १५ वर्षात १५ १/२%दराने त्रैमासिक हप्त्याने करावयाची आहे.

तरी योजनेसाठी हे कर्ज उपलब्ध होण्यासाठीचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सर्वसाधारण सभेस सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको व विस्तारीत भागांासाठी स्वतंत्र पाईपलाईन टाकणेच्या कामासाठी सर्वसाधारण सभा ठराव क्र. १८६ / ७ दिनांक १९-१२-९८ अन्वये आयुर्विमा महामंडळाकडून निधी उपलब्ध करण्यासाठी मंजूरी मिळाली असली तरी आयुर्विमा महामंडळाकडून या कामासाठी अद्याप पावेतो आवश्यक ते कर्ज उपलब्ध न झाल्यामुळे उक्त कामाला गती प्राप्त व्हावी व कामासाठी एकूण रकमेच्या ७०% म्हणजेच रुपये ४७११.३४ लक्ष इतके कर्ज हडको,मुंबई या संस्थेकडून १५ १/२%व्याज दराने १५ वर्षाच्या मुदतीत परतफेड करावयाचे कर्ज घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.या कर्जाची परतफेड ही त्रैमासिक हप्त्यात करण्यात यावी,असे सर्वानुमते ठरले.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२३/२ :**

उप आयुक्त (प्र) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,दिनांक १६-१२-९७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत अशासकीय ठराव क्र. १५८ / २२ अन्वये प्रशासकीय अधिकारी या पदाचे रुपांतर तांत्रिक संवर्गातील पदात करण्याचा ठराव पारीत करण्यात आला.सदर पदाचे रुपांतर तांत्रिक पदात करतांना महानगरपालिकेच्या जमिनिवरील अतिक्रमणे हटविणे,मनपा हद्दीतील विना परवानगी बांधकामे हटविणे तसेच महाराष्ट्र व नगररचना अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे,प्रशासकीय अधिकारी यांना त्यांचे स्तरावर स्वतंत्रपणे निर्णय घेऊन कार्यालयीन कामे करता यावीत, तसेच नगररचना विभागातील प्रशासकीय कामाचा व्याप कमी व्हावा,या बाबींचे निकष लावण्यात आले होते.

तथापि सद्यस्थितीत नगररचना विभागातील कामाचा व्याप वाढलेला आहे.त्यामुळे प्रशासकीय अधिकारी या विभागातील कामांवर नियंत्रण व देखरेख ठेवणे कार्यालयीन दृष्टीने अशक्य आहे.तसेच प्रशासकीय अधिकारी पद तांत्रिक संदर्भात रुपांतर केल्यानंतरही नगररचना विभागातील त्या अनुषंगाने असलेला कामाचा व्याप कमी झालेला नाही.आणि सदर पदाच्या कामाचे स्वरुप हे तांत्रिक संवर्गातील पदापेक्षा भिन्न आहे आणि सदर पदाची कार्यालयीन कामे व कर्तव्ये भिन्न आहेत.

महानगरपालिकेने तयार केलेले सेवा भरती नियमामधील परिशिष्ट "अ" अ.क्र. १ नुसार सदर पदाची शैक्षणिक आर्हता ही पदवीधर आहे आणि कार्यालय अधिक्षक प्रवर्गातूर पदोन्नतीने नियुक्ती आणि महानगरपालिकेमध्ये आधी पासून सेवेत असल्यास ते खेरीज करुन ३० वर्षाहून जास्त वय नसावे,अशा पध्दतीने नियुकतीची पध्दत दिलेली आहे.

वरील सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन असे प्रस्तावित करण्यात येते की,प्रशासकीय अधिकारी हे पद प्रशासकीय अधिकारी संवर्गातून भरण्यात यावे,जेणे करुन प्रशासकीय दृष्टीकोनातून कार्यालयीन कामे पार पाडण्यास सुलभ होईल. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रशासकीय अधिकारी पद तांत्रिक संवर्गात रुपांतर केल्यानंतरही नगररचना विभागातील त्या अनुषंगाने असलेला कामाचा व्याप कमी झालेली नसून सदर पदाच्या कामाचे स्वरुप हे तांत्रिक संवर्गातील पदापेक्षा भिन्न आणि सदर पदाची कार्यायीन कामे व कर्तव्ये भिन्न असल्यामुळे प्रशासकीय दृष्टीकोनातून कामे पार पाडल्यास सुलभ व्हावे याकरीता म.न.पा.सेवा भरती नियमावलीतील परिशिष्ट "अ" अ.क्र.१ नुसार खालील अटी व शर्तीनुसार प्रशासकीय अधिकारी हे पद प्रशासकीय अधिकारी संवर्गातून भरण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१) प्रशासकीय अधिकारी या पदाकरीता शैक्षणिक आर्हता पदवीधर राहील.
२) कार्यालय अधिक्षक प्रवर्गातून पदोन्नतीद्वारे नियुक्ती १००% या गुणोत्तरात पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येईल.
३) म.न.पा.सेवेत असल्यास ते खेरीज करुन ३० वर्षाहून अधिक वय नसावे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## :-ऐनवेळचे विषय :-

**विषय क्र. २२४/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,रस्त्यांचे भूसंपादन करतांना अतिक्रमण होऊ नये म्हणून फुटपाथ व गरजेप्रमाणे गटार बांधण्याचे काम मा.आयुक्तांनी त्यांच्या अधिकारात सुरु करावे.त्यासाठी आवश्यक ते अंदाजपत्रक तयार करुन त्वरीत काम सुरु करावे.त्यामुळे अतिक्रमण होणार नाही व अनधिकृत कामांना आळा बसेल.रुपये ३ लाखाचे अधिकार आयुक्तांना आहेत.त्यामुळे त्यांच्या अधिकारातील रु.३ लाखांची कामे त्यांनी विना निविदा करावी.तसेच रोडमध्ये येणाऱ्या टपऱ्या हटविण्यात याव्यात.करिता प्रस्ताव मंजुरीस्त सादर.

सुचक : श्री.अविनाश कुमावत.
श्री.अब्दुल रशिद खान (मामू)
श्री.जयवंत (बंडू) ओक

अनुमोदक : श्री.प्रदीपकुमार जैस्वाल,अफसरखाँन यासीन खाँन,गौतम खरात,गिरजाराम हाळनोर,महादेव सुर्यवंशी,किशोर तुळशीबागवाले,हमीद ताबा,भगवान घडामोडे,प्रभाकर विधाते,प्रफुल्ल मालानी,संजय केनेकर,गौतम लांडगे,नरसिंग ढगे,काशीनाथ कोकाटे,नरेंद्र पाटील,सुभाष कच्छवाह,संजय जोशी,विकास जैन,डॉ.भागवत कराड,सौ लता दलाल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रस्त्याचे भूसंपादन करतांना अतिक्रमाणे होऊ नये म्हणून फुटपाथ तसेच गरजेप्रमाणे गटार बांधण्याचे काम मा.आयुक्तांनी त्यांना असलेल्या रक्कम रु. ३ लाखापर्यंतची कामे विना निविदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२५/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,श्री.म.इम्रान म.शफी हे गेल्या ८ ते १० वर्षापासून रोजंदारीवर लाईनमन म्हणून विविध विभागात काम करीत आहेत.तसेच ५ ते ६ वर्षापासून सिध्दार्थ उद्यान येथील पाण्याच्या टाकीवर लाईनमन म्हणून काम करीत आहे.संबंधिततास सदरील कामाची संपूर्ण माहिती आहे.त्यांचे घर दुरवर (गारखेडा परिसरात) असल्यामुळे व ते कायमस्वरुपी सेवेत येणार असल्यामुळे त्यांचेसाठी सिध्दार्थ उद्यान परिसरातील पाण्याच्या टाकीच्या कंपाऊंड वॉलमध्ये क्वार्टर बांधण्यात आले आहे.हे क्वार्टर श्री.म.इम्रान म.शफी यांचेकरीताच बांधण्यात आले आहे.करीता प्रशासनाने सदरील क्वार्टर दुसऱ्या कर्मचाऱ्यांना न देता श्री.म.इम्रान म.शफी यांनाच देण्यात यावे. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.अब्दुल रशिदखाँन (मामू)
श्री.अशफाक सलामी

अनुमोदक : श्री.एकबाल मुजाहेद
श्री.अफसरखान यासीनखान.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.म.इम्रान म.शफी हे मनपामध्ये ८ ते १० वर्षापासून रोजंदारीवर लाईनमन म्हणून कार्यरत असून सध्या ते ५ ते ६ वर्षापासून सिध्दार्थ उद्यानातील पाण्याच्या टाकीवर लाईनमन म्हणून काम करीत आहेत.सिध्दार्थ उद्यान परिसरातील पाण्याच्या टाकीच्या कंपाऊंडमध्ये बांधण्यात आलेले क्वार्टर हे इतर कर्मचाऱ्यांना न देता श्री.म.इम्रान म.शफी यांना देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२६/३ :**

महानगरपालिकेच्या वतीने जुना मोंढा भवानीनगर भागात विभागीय कार्यालय व व्यापारी संकुलासाठी इमारत बांधण्यात येते आहे.सदर इमारतीस "छत्रपती शिवाजी राजे

व्यापारी संकुल,जुना मोंढा भवानीनगर" असे नांव देणे बाबत येथील रहिवाशांनी मागणी केली आहे.रहिवाशांची मागणी विचारात घेता सदर इमारतीस "छत्रपती शिवाजी राजे व्यापारी संकुल,जुना मोंढा भवानीनगर"असे नांव देणेबाबत प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

सुचक : श्री.त्र्यंबक तुपे,श्री.प्रफुल्ल मालानी.

अनुमोदक : श्री.प्रदीपकुमार जैस्वाल,श्री.नरसिंग ढगे,श्री.सुभाष कच्छवाह,श्री.संजय केनेकर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या वतीने जुना मोंढा,भवानीनगर भागात बांधण्यात येत असलेल्या विभागीय कार्यालय व व्यापारी संकुल या इमारतीस "छत्रपती शिवाजी राजे व्यापारी संकुल,जुना मोंढा भवानीनगर"असे नांव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२७/४ :**

बायजीपुरा या प्रभागातील खालील नमुद केलेल्या इमारत,क्रिडा संकुल व रस्त्यांना नांव देण्यात यावेत.

१)रोशनगेट ते जकात नाकारोड - अलतमश रोड

२) बारी कॉलनी येथील बांधण्यात आलेल्या - मलिक अंबर स्पोर्ट स्टेडीयम,औरंगाबाद.
मिनी स्टेडीयमला.

३) बारी कॉ.(जसवंतपुरा) भागात बांधण्यात - मौलाना अली मिया नदवी फंक्शन हॉल
आलेल्या फंक्शन हॉलला.

४) बारी कॉ.जसवंतपुरा भागात फंक्शन हॉलच्या - मोहम्मद हफिजोद्दीन हेल्थ क्लब.
वरच्या भागात बांधण्यात येणाऱ्या हेल्थ क्लबला

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रस्ते व इमारती क्रिडा संकुल यांस खालीलप्रमाणे नांवे देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१)रोशनगेट ते जकात नाकारोड - अलतमश रोड

२) बारी कॉलनी येथील बांधण्यात आलेल्या - मलिक अंबर स्पोर्ट स्टेडीयम,औरंगाबाद.
मिनी स्टेडीयमला.

३)बारी कॉ.(जसवंतपुरा) भागात बांधण्यात - मौलाना अली मिया नदवी फंक्शन हॉल
आलेल्या फंक्शन हॉलला.

४) बारी कॉ.जसवंतपुरा भागात फंक्शन हॉलच्या - मोहम्मद हफिजोद्दीन हेल्थ क्लब.
वरच्या भागात बांधण्यात येणाऱ्या हेल्थ क्लबला

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२८/५ :**

मे.वतन टेक्साईल लिमिटेड,पैठणरोड,औरंगाबाद हे शहरातील प्रथम मोमीन जमातीतील युनिट आहे.सदरील युनिटला मा.केंद्र सरकार तर्फे परवानगी मिळालेली आहे.त्या परवानगीसह केंद्र सरकारनी राज्य सरकारला पण जास्तीत जास्त फॅसिलिटीज द्यावे म्हणून कळविले आहे.

तसेच सदरील युनिटला औरंगाबाद शहरात प्रथम ग्रीन कार्ड ही सरकारनी दिलेले आहे.त्यांना कस्टम व एक्साईज डयुटीही माफ करण्यात आलेली आहे.

तसेच त्यांना जकात डयुटीही माफ करण्यात आलेली आहे.त्याबाबत मा.श्री.एस.एस.यादवाडकर जॉईन्ट डेव्हलपमेंट कमिशनर यांनी आपले पत्र मा.श्री.डी.एन.वैद्य आयुक्त,महानगरपालिका यांना देवून विनंती केलेली आहे की,जकात कर माफ करण्यात यावे.तरी वरीलप्रमाणे प्रस्तावावर सहानुभुतीपूर्वक विचार करुन सदरील युनिटला १००% एक्स्पोर्ट युनिट असल्यामुळे केंद्र सरकार व राज्य सरकारने युनिट असल्यामुळे केंद्र सरकार व राज्य सरकारने दिलेल्या सुटप्रमाणे व इतर महानगरपालिकांनीही दिलेल्या सुटचे अवलोकन करुन सदरील मे.वतन टेक्साईल यांना त्यांचे येणारे मालावर व मशीनरीवर टेक्साईल यांना त्यांचे येणारे मालावर व मशीनरीवर जकात कर माफ करण्यात यावे.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.नरसिंग ढगे

अनुमोदक : श्री.विठ्ठल जाधव.

**ठराव :**

प्रस्तावात नमुद केल्यानुसार मे.वतन टेक्साईल लिमिटेड,पैठण रोड,औरंगाबाद.हे शहरातील मोमीन जमातीतील युनिट असून मा.केंद्र सरकार यांनी परवानगी दिलेली आहे व केंद्र सरकारनी राज्य सरकारलाही जास्तीत जास्त फॅसिलिटीज द्यावी म्हणून कळविले आहे.सदरील युनिटला औरंगाबाद शहरात प्रथम ग्रीन कार्डही केंद्र सरकारने दिले आहे.अशा प्रकारचे शहरात एकमेव युनिट आहे.त्यांना कस्टम व क्साईज डयुटीही माफ करण्यात आलेली आहे.सदरील युनिट बसुन केंद्र सरकार व राज्य सरकारने दिलेल्या सुटप्रमाणे व इतर महानगरपालिकांनीही दिलेली सुट प्रस्तावात सर्व गोष्टींचा विचार करुन मे.वतन टेक्साईल लिमिटेड यांना त्यांचे येणारे मालावर व मशिनरीवर जकात कर माफ करण्यास प्रस्ताव शासनाचे मंजुरीसाठी पाठविण्याकरीता स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२९/६ :**

श्री.संजय पंडीतराव हर्णे कांचनवाडी येथील गट क्र.११ पैकी १०४३५ चौ.मीटर जागा विकास योजनेनुसार आरक्षाणाने बाधीत आहे.हा भाग शहरापासून अत्यंत दूर आहे व आरक्षणाने वापराकरीता संपादीत करतेवेळी पर्यंत बराच कालावधी जाणार आहे.तसेच त्या ठिकाणी तोपर्यंत अनधिकृत वस्ती होण्याची शक्यता नाकारता येत नाही.तसेच या आरक्षणाची जागा संपादन करावयाची झाल्यास महानगरपालिकेवर बराच आर्थिक बोजा पडणार आहे.त्यामुळे जागेवरील सद्यस्थिती पाहता सदरील आरक्षण रद्द करणे योग्य होईल.करीता श्री.संजय पंडीतराव हर्णे,कांचनवाडी येथील गट क्र.११ पैकी १०४३५ चौ.मीटर आरक्षण क्रमांक एस २ ई उद्यानाचे जागेवरील आरक्षण रद्द करणेचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.भगवान घडामोडे.

अनुमोदक : श्री.संजय जोशी,प्रकाश निकाळजे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गट नं. ११ कांचनवाडी पैकी श्री.संजय पंडीतराव हर्णे यांची १०४३५ चौ.मी.आरक्षण क्र.एस २ / ई उद्यान या आरक्षणाने बाधीत असून या भागात अनधिकृत वसाहत होण्याची शक्यता असल्याने व भूसंपादनासाठी देखिल बराच आर्थिक बोजा पडणार असल्यामुळे प्रस्तावित जागेवरील आरक्षण रद्द करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३०/७ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,सिडको परिसरात व जाधववाडी परिसर येथे पाण्याची साठवण क्षमता कमी असून नविन मोंढा व नविन मंजुर ले-आऊट यांची संख्या या परिसरात वाढली आहे व त्यामुळे सिडकोने तयार केलेल्या क्षमतेमध्ये वाढ करणे अत्यंत आवश्यक आहे.करीता एन-११ जवळ मंजुर रेखांकनामध्ये या म.न.पा.च्या मोकळया जागेत २६.०० लाख लिटर क्षमतेची नविन उंच सलोह जलकुंभ (आर.सी.सी.ई.एस.आर.) बांधणे आवश्यक आहे.

अंदाजपत्रक रक्कम रुपये ५३.९१ लाखास सर्वासाधारण सभेने दिनांक १३-१२-१९९९ रोजी मान्यता दिली आहे.निविदा मागवून दर तुलना केली असता न्यु महावीर कन्स्ट्रक्शन यांची निविदा २० % जास्त दराने परंतु तुलनेने कमी असल्याने अंदाजपत्रक रक्कम रु. ५३.९१ लाख हे दरसूची सन १९९७-९८ प्रमाणे असल्याने प्रचलित दरसूची सन १९९८-९९ ची आहे.त्यामुळे दराची तुलना केली असता या कामाची अंदाजित रक्कम रुपये ५७,८६,४६८/- एवढी होत आहे.सध्या हे काम सन २०००-२००१ मध्ये होणार आहे व या वर्षाची दरसुची प्रलित झालेली असल्याने गुत्तेदारास विचारणा केली असता सन १९९८-९९ च्या दरसुचीप्रमाणे व या दरसुचीच्या अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास तयार आहे असे लेखी दिले असल्याने मंजुरी प्राप्त आहे.

तरी सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव सादर करण्यात येतो की,सन १९९८-९९ च्या दरसुचीप्रमाणे अंदाजपत्रक रक्कम रु.५७,८६,४६८/- ला व न्यु महावीर कन्स्ट्रक्शन मार्फत काम करण्याच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको परिसरात व जाधववाडी परिसर येथे पाण्याची साठवण क्षमता कमी असून नविन मोंढा तसेच नविन मंजुर ले-आऊट यांची संख्या या परिसरात वाढल्यामुळे सिडकोने तयार केलेल्या क्षमतेत वाढ करण्याकरीता एन-११ जवळ मंजुर रेखांकनात मोकळया जागेत २६.०० लाख लिटर क्षमतेची नविन उुच सलोह जलकुंभ (आर.सी.सी.ई.एस.आर.) बांधणेच्या कामाकरीता सन १९९८-९९ च्या दरसूचीनुसार रक्कम रु. ५७,८६,४६८/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम न्यु महावीर कन्स्ट्रक्शन यांनी संमती दिल्यानुसार सन १९९८-९९ च्या दरसूचीप्रमाणे अंदाजपत्रकीय दराने त्यांचेकडून करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच "जन गण मन"या राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
महापौर
महानगरपालिका,औरंगाबाद.